
CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १० जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २२२ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की कार्यकर्ता आणि त्याचे कार्यक्षेत्र हे माणूस आणि त्याचे प्रतिबिंब याप्रमाणे आहे. आपले कार्यक्षेत्र सुधारायचे असेल, कार्य वाढवायचे असेल तर प्रथम आपल्याला या दृष्टीने सुधारले पाहिजे. पुढे गेले पाहिजे.

**- स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह



# ऑस्ट्रेलिया करणार युरेनियमचा पुरवठा

## भारत-ऑस्ट्रेलियाने अणू-सागरी क्षेत्रातील संबंध केले दृढ

**मेलबॉर्न, ९ जुलै**

भारत आणि ऑस्ट्रेलियाने गुरुवारी अणुऊर्जा, सागरी सुरक्षा आणि दुर्मिळ खनीज क्षेत्रांमधील विविध ऐतिहासिक करारांवर शिक्कामोर्तब केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी शांततापूर्ण भारत-प्रशांत सुनिश्चित करण्यासाठी द्विपक्षीय भागीदारीच्या महत्त्वपूर्ण भूमिकेला बळकटी दिली.

वाढत्या भूराजकीय अस्थिरतेच्या पृष्ठभूमीवर व्यापार आणि संरक्षण संबंध बळकट करण्याच्या उद्देशाने आयोजित तीन देशांच्या दुसऱ्या टप्प्यात इंडोनेशिया येथून ऑस्ट्रेलियात दाखल झाल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी मोदींनी ऑस्ट्रेलियन नेत्याशी सविस्तर चर्चा केली. या दोन्ही नेत्यांच्या भेटीनंतर दोन्ही बाजूंनी संरक्षण आणि सुरक्षेबाबत भारत-ऑस्ट्रेलिया संयुक्त घोषणा, ऊर्जा संबंधाबाबत संयुक्त निवेदन आणि सायबर, महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान व पुरवठा साखळी या क्षेत्रांतील सहकार्यासाठीचा आराखडा जाहीर केला.

नागरी अणुऊर्जेबाबतचा हा करार ऑस्ट्रेलियाकडून भारताला युरेनियमचा व्यावसायिक पुरवठा सुलभ करेल. यामुळे नवी दिल्लीच्या अणुऊर्जा प्रकल्पांना मदत होईल. दोन्ही बाजूंनी प्रस्तावित सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार तसेच द्विपक्षीय गुंतवणूक संरक्षण करारावर वेगाने काम करण्याचा निर्णयही घेतला आहे.



मेलबॉर्न येथे झालेल्या एका कार्यक्रमात हात उंचावताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अँथनी अल्बानीज

### जहाजबांधणी क्षेत्रातही एकत्र

आम्ही जहाजबांधणी, जहाज दुरुस्ती आणि देखभालीच्या क्षेत्रातही एकत्रितपणे समोर जाऊ, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. दहशतवाद हा केवळ एका देशासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी एक गंभीर आव्हान आहे, हे भारत-ऑस्ट्रेलियाने मान्य केले असल्याचे त्यांनी सांगितले. ■

आज आम्ही अणुऊर्जा क्षेत्रात एका महत्त्वपूर्ण करारावर स्वाक्षरी केली आहे.

यामुळे ऑस्ट्रेलियाकडून भारताला युरेनियमच्या पुरवठ्याचा मार्ग मोकळा होईल आणि आमच्या स्वच्छ ऊर्जेच्या उद्दिष्टांना नवी चालना मिळेल, असे मोदींनी एका निवेदनात म्हटले. दुर्मिळ खनिजांमध्ये आमचे सहकार्य आमच्या धोरणात्मक सुरक्षिततेसाठी आणि स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेऊन, आज आम्ही सायबर, महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीवर ऑस्ट्रेलिया-भारत भागीदारी सुरू केली आहे, असे ते म्हणाले.

दोन्ही बाजू दुर्मिळ खनिजांच्या कॉरिडॉरवरही एकत्रितपणे काम करतील, असे मोदींनी सांगितले. दोन्ही देशांतील संरक्षण क्षेत्रातील वाढत्या सहकार्याचाही उल्लेख केला आणि मुक्त व स्थिर भारत-प्रशांत क्षेत्राच्या महत्त्वावर भर दिला. भारत-प्रशांत हे केवळ दोन महासागरांचे मिलनस्थान नाही, तर भारत आणि ऑस्ट्रेलियासारख्या समान विचारसरणीच्या लोकशाही देशांच्या सामायिक आकांक्षांचेही प्रतीक आहे, असे मोदी म्हणाले.

संरक्षण आणि सुरक्षेच्या क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी आम्ही आज एक महत्त्वाची संयुक्त घोषणा केली आहे. भारत-ऑस्ट्रेलिया डिफेन्स इनोव्हेशन कॉरिडॉरच्या माध्यमातून आम्ही संरक्षण क्षेत्रातील स्टार्टअप्स आणि उद्योगांना परस्परांशी जोडण्याचे काम करू, असे मोदी म्हणाले. भारत-ऑस्ट्रेलिया सागरी सुरक्षा सहकार्य आराखडा भारत-प्रशांत क्षेत्रातील सामायिक प्रयत्नांना चालना देईल. ◂ (वृत्तसंस्था)

### संघर्षाचे निराकरण संवादातूनच

जगाच्या पाठीवर अनेक भागांत धुमसत असलेला तणाव आणि संघर्षाचे निराकरण केवळ संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातूनच होऊ शकते, असे आम्हाला वाटत असल्याचे मोदींनी सांगितले. आम्ही एकत्रितपणे संपूर्ण भारत-प्रशांत क्षेत्रात शांतता, स्थिरता, नौवहनाचे स्वातंत्र्य आणि नियमांवर आधारित व्यवस्था अधिक बळकट करू, असे त्यांनी स्पष्ट केले. ■



संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे गुरुवारी पुणे येथे उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषाने शहर दुमदुमले असून लाखो वारकरी, भाविक आणि पुणेकरांनी पालखीचे दर्शन घेतले

# 'समान नागरी कायदा'साठी समिती

## नागपूर हिवाळी अधिवेशनात येणार कायदा

**मुंबई, ९ जुलै**

महाराष्ट्रात 'समान नागरी कायदा' लागू करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने एक ऐतिहासिक आणि अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. भारताच्या संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांचा (डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स ऑफ स्टेट पॉलिसी) मान राखून राज्यात समान नागरी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्याचा मसुदा तयार करण्यासाठी एका उच्चस्तरीय सात सदस्यीय समितीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधिमंडळात केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार असून, आगामी हिवाळी अधिवेशनापर्यंत हा कायदा दोन्ही सभागृहा समोर आणण्याचा शासनाचा मानस असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले.

विधानसभेत यासंदर्भात अधिकृत निवेदन देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारताच्या संविधानाने प्रत्येक राज्याने 'समान नागरी कायदा' तयार करावा, असे निर्देश दिले आहेत. याच अनुषंगाने २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मी अशा प्रकारची समिती गठीत करण्याची घोषणा केली होती, त्यानुसार या सात सदस्यीय समितीची रचना करण्यात आली आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

# अमरनाथ यात्रेकरूंच्या संख्येत वाढ

**श्रीनगर, ९ जुलै**

मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या अमरनाथ यात्रेला आतापर्यंत अधिक संख्येने भाविक आले आहेत. ही वाढ केंद्रशासित प्रदेशातील पर्यटनासाठी एक सकारात्मक बाब आहे, असे जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी गुरुवारी सांगितले. नायब राज्यपालांनी अधिकाऱ्यांना अशा लोकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले जे नोंदणी प्रक्रियेत फसवणूक करताना आढळतील. सिन्हा यांनी श्रीनगरमधील पंथा चौक येथील यात्रा ट्रान्झिट कॅम्प आणि यात्री विवासाला भेट दिली आणि भाविकांसाठी केलेल्या व्यवस्थेचा आढावा घेतला.

## महत्त्वाचे

### शेअर बाजार सावरला

**मुंबई :** मागील सत्रात झालेल्या मोठ्या घसरणीनंतर, गुरुवारी शेअर बाजाराच्या प्रमुख निर्देशांकांनी जोरदार पुनरागमन केले. ऑटो आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील शेअर्स वगळता इतर सर्वच क्षेत्रांमध्ये झालेल्या चौफेर खरेदीमुळे बाजाराला मोठा पाठिंबा मिळाला. गुरूवारी बाजाराची सुरुवात मजबूत झाली आणि संपूर्ण सत्रात ही घसरण भरून काढण्याचे प्रयत्न सुरू राहिले. व्यवहारादरम्यान 'निफ्टी ५०' ने २४,१३४.७० अंकांची उच्चांकी पातळी गाठली. मात्र, सत्राच्या उत्तरार्धात गुंतवणूकदारांनी केलेल्या नफावसुलीमुळे बाजाराची सुरुवातीची तेजी काहीशी ओसरली. तरीही दोन्ही प्रमुख निर्देशांक चांगल्या वाढीसह बंद झाले. व्यवहाराच्या शेवटी, सेन्सेक्स २३८.२२ अंकांच्या म्हणजेच ०.३१ टक्क्यांच्या वाढीसह ७६,७४१.८२ वर तर निफ्टी ८०.७५ अंकांच्या म्हणजेच ०.३४ टक्क्यांच्या वाढीसह २३,९६२.८० वर बंद झाला. मुख्य निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्ये अधिक तेजी पाहायला मिळाली. यामध्ये 'निफ्टी मिडकॅप १००' १.४ टक्क्यांनी वधारला.

# मराठवाड्यात भूकंपाचे तीव्र धक्के

**छ. संभाजीनगर, ९ जुलै -**

मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये गुरुवारी पहाटे भूकंपाचे तीव्र धक्का जाणवले. गुरुवारी पहाटे पावणे दोन वाजता ४.६ रिश्टर स्केलचा भूकंप झाला.

शिरली (ता. वसमत) हे भूकंपाचे केंद्रबिंदू असून खोली १० किलोमीटर आहे. दुसरा धक्का २.१५ वाजता ३.६ रिश्टर स्केल, २.१७ वाजता ३.९ रिश्टर स्केल, तर ३.२३ वाजता ४.१ रिश्टर स्केल भूकंपाची नोंद झाली. केंद्रबिंदू काकडदाभा (औंढा नागनाथ) असल्याचे स्पष्ट झाले आहे.

हिंगोली, परभणी आणि नांदेड या तिन्ही जिल्ह्यांमधील अनेक भागांत मध्यरात्री १ वाजून ३७ मिनिटांनी भूकंपाचे धक्का जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ४.७ इतकी नोंदवली आहे. हिंगोलीतील शिरळी परिसरात ४.६ रिश्टर स्केलची नोंद झाली आहे. नांदेड शहरातील तरोडा नाका, मालेगाव येथे धक्के जाणवले.

### बोरामणी येथे महाविद्यालयीन युवतीची गळफासाने आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै -**

सोलापूर : अज्ञात कारणावरून एका महाविद्यालयीन युवतीने घरातील लोखंडी पाईपला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गावात बुधवारी सायंकाळी ६.३० च्या सुमारास उघडकीस आली.

रुबिना महिबूब नदाफ (वय १९ वर्ष रा.बोरामणी) असे गळफास घेतलेल्या तरुणीचे नाव आहे. बुधवारी सकाळी रुबीनाचे आई वडील हे नेहमीप्रमाणे शेतावर कामासाठी गेले होते .रुबीना ही देखील कॉलेजला गेली होती . त्यानंतर ती दुपारी साडेतीन चार वाजता घरी परतली .घरात कोणी नसताना तिने स्वतःला गळफास लावून घेतला . सायंकाळी तिचे आई-वडील हे कामावरून घरी परतल्यावर रुबीनाने गळफास घेतला असल्याचे उघडकीस आले.तेव्हा नातेवाईकांनी ही बाब गावच्या पोलीस पाटलाला सांगितली. यानंतर पोलीस पाटील यांनी सोलापूर तालुका पोलीस ठाण्याला ही माहिती दिली.

त्यानंतर पोलीस हवालदार इंगळे यांनी घटनास्थळी पोहचून नातेवाईकांच्या मदतीने तरुणीला गळफासातून सोडवून बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. मयत रुबिना ही सोलापुरातील एका कॉलेजमध्ये शिकण्यास होती. तिच्या पश्चात आई वडील, पाच बहिणी असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.








भारताने चिनाब नदीवरील धरणातून पाणी सोडल्याने पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात आलेला पूर

# भारताने सोडले पाणी; पाकिस्तान जलमय

**। मुसळधार पावसामुळे सलाल धरणाचे दरवाजे उघडले**
**। पूरस्थितीमुळे पंजाब प्रांतात जनजीवन विस्कळीत**

**इस्लामाबाद, ९ जुलै**

जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे चिनाब नदीने धोक्याची पातळी गाठली. या नदीवर बांधण्यात आलेल्या सलाल धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक घरे, रस्ते जलमय झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून, हजारो नागरिकांवर स्थलांतरित होण्याची नामुष्की आली. पाण्यासाठी आकांडतांडव करणाऱ्या पाकिस्तानी नेत्यांच्या धमक्यानंतर भारताने धरणातील अतिरिक्त पाणी सोडले आणि तेथील प्रशासनाची पंचाईत झाली.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू जल करार स्थगित केला. सीमेवरून वाहणाऱ्या नद्यांचे पाणी रोखण्यासाठी भारताने प्रकल्पनिर्मितीचा धडाका लावला. यामुळे पाकिस्तानच्या अनेक भागात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्याने पंतप्रधान शाहबाज शरीफ ते लष्करप्रमुख असीम मुनीरसह अनेकांनी भारताला धमक्या देणे सुरू केले. अलीकडेच मुनीर यांनी पाणी मिळवण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी असल्याचे म्हटले होते. अशातच जम्मू-काश्मीरमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. धरणात क्षमतेपेक्षा अधिक पाणी जमा झाल्याने भारताने धरणातून अतिरिक्त जलसाठा सोडला. पर्यायाने पाण्यासाठी आकांडताडव करणाऱ्या पाकिस्तानात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली.

चिनाब नदीच्या पाणलोट क्षेत्रात सततच्या पावसामुळे पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या वाढली. पुराचा दबाव कमी करण्यासाठी, चिनाब नदीवरील सलाल धरणाचे दरवाजे उघडण्यात आल्याने पाकिस्तानचा पंजाब प्रांत जलमय झाला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### पुरासाठी ठरविले भारताला जबाबदार

चिनाब नदीवर बांधलेले सलाल धरण हे सिंधू पाणी कराराअंतर्गत भारताने बांधलेले पहिले धरण आहे. मुसळधार पावसामुळे सलाल धरणातून अचानक अतिरिक्त पाणी सोडल्यामुळे, पाकिस्तानात पुराचा धोका निर्माण झाला आहे. जम्मू-काश्मीर प्रशासनाने सलाल धरणातून पाणी सोडल्याचा व्हिडीओ शेअर केला. यामुळे पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील नद्यांच्या जलसाठ्यात वाढ झाली. सखल भागात पाणी साचले असून, अनेक भाग जलमय झाले. भारताने पाणी सोडल्याने पाकिस्तानची दाणादाण उडाली आहे. हजारो नागरिकांवर घरे सोडून सुरक्षित स्थळी जाण्याची परिस्थिती उद्भवली. भारताने पाणी सोडताना कुठलीही सूचना दिली नसल्याचा आरोप पाकिस्तानच्या प्रशासनाकडून केला जात आहे. ■

# लष्करप्रमुखांची पूंछमधील आघाडीच्या चौक्यांना भेट

**जम्मू, ९ जुलै**

लष्करप्रमुख धीरज सेठ यांनी गुरुवारी जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील आघाडीच्या चौक्यांना भेट दिली आणि तेथील सुरक्षा परिस्थिती तसेच लष्कराच्या कार्यान्वयनविषयक आणि युद्धसज्जतेचा आढावा घेतला.

पदभार स्वीकारल्यानंतर पूंछमधील आघाडीच्या भागांना दिलेली ही त्यांची पहिलीच भेट आहे. अमरनाथ यात्रेच्या पृष्ठभूमीवर जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा व्यवस्था कठोर करण्यात आली असताना त्यांनी हा दौरा केला. लष्करप्रमुखांनी नगरोटा येथील 'व्हाईट नाईट कॉर्प्स'च्या मुख्यालयाला भेट दिली. तिथे वरिष्ठ कमांडर्सनी त्यांना जम्मू भागातील सुरक्षा परिस्थिती आणि या कॉर्प्सच्या अंतर्गत असलेल्या तुकड्यांच्या कार्यसज्जतेबाबत त्यांना माहिती देण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानंतर जनरल सेठ यांनी पूंछ जिल्ह्यातील आघाडीच्या ठिकाणांना भेट दिली आणि सुरक्षा व्यवस्था व मोहिमेसाठीच्या सज्जतेचा आढावा घेतला, असे सांगण्यात आले.



पुंछ सीमेवर जवानांसोबत संवाद साधताना लष्करप्रमुख

लष्करप्रमुखांनी पूंछ ब्रिगेड मुख्यालयात वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचीही भेट घेतली. तिथे त्यांना लष्कराची तैनाती, सध्याची सुरक्षा स्थिती आणि मोहिमेसाठीची सज्जता याबाबत माहिती देण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लष्करप्रमुखांना एकूणच सुरक्षा परिस्थिती आणि उद्भवणाऱ्या आव्हानांना प्रभावीपणे तोंड देण्यासाठी लष्कराच्या सज्जतेबाबत माहिती दिली. जनरल सेठ मंगळवारपासून जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची भेट घेऊन काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. ◂ (वृत्तसंस्था)

# 'नार्को-टेरर' टोळीचा छडा

**पाकिस्तानशी संबंध; तिघांना अटक**

**चंदीगड, ९ जुलै**

मागील महिन्यात चंदीगडमधील एका फार्मसीमधील कॅशिअरच्या हत्येप्रकरणी सुरू असलेल्या तपासादरम्यान आणखी तिघांना अटक करून, पोलिसांनी सीमापार आणि आंतरराज्यीय स्तरावर चालणारे शस्त्रे, मादकपदार्थ आणि बनावट भारतीय चलनी नोटांचा पुरवठा करणारा नेटवर्क यशस्वीपणे उद्ध्वस्त केल्याचे बुधवारी सांगितले.

चंदीगड पोलिसांनी 'नार्को-टेरर' (मादकपदार्थ आणि दहशतवाद यांचा मिलाफ असलेल्या) नेटवर्कच्या मुख्य सूत्रधारालाही अधिकृतपणे अटक केली आहे. या नेटवर्कचे सदस्य कथितरीत्या कॅशिअरच्या हत्येत सामील होते. चंदीगड पोलिसांच्या गुन्हे विभागाच्या पथकाने केलेल्या कारवाईत तरनतारन येथील आकाश कुमार ऊर्फ मणी, सचिन सिल्वेस्टर आणि गुरमीत सिंग बादशाह यांना अटक केली. ◂ (वृत्तसंस्था)

## गुजरातमध्ये सिंहाच्या हल्ल्यात एकाचा मृत्यू

**अमरेली, ९ जुलै**

गुजरातच्या अमरेली जिल्ह्यात सिंहाच्या हल्ल्यात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती वन अधिकाऱ्याने गुरुवारी दिली. अमरेली येथील रहिवासी असलेल्या सोहेल मुजावर याचा बुधवारी सायंकाळी लुवारिया राखीव वनक्षेत्राजवळील अंतालिया महसूल भागात या वन्यप्राण्याने बळी घेतला, असे उप-वनसंरक्षक चिराग अमीन यांनी सांगितले. हा नर सिंह एका मादी सिंहीणीसोबत असताना या तरुणाने आणि त्याच्या मित्राने त्यात व्यत्यय आणला. ज्यामुळे सिंहाने त्याच्यावर हल्ला केला असावा, असा संशय आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे प्राथमिक तपासाचा हवाला देत अमीन म्हणाले. नंतर, वन विभागाने बचाव मोहिमेअंतर्गत ९ ते १२ वयोगटातील त्या नर सिंहाला पकडले. मृतदेह विच्छेदनासाठी रुग्णालयात हलवण्यात आला. ◂ (वृत्तसंस्था)



# राजा रघुवंशी हत्या प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे?

## अटकेची कारणे दिली नसल्याने सोनमला जामीन

**नवी दिल्ली, ९ जुलै**

मध्यप्रदेशात गाजलेले राजा रघुवंशी हत्या प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपविण्याबाबत विचार केला जाऊ शकतो, असे संकेत सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

अटकेच्या कागदपत्रांमध्ये टंकलेखनाची चूक होती या कारणास्तव मेघालय उच्च न्यायालयाने सोनम रघुवंशीला दिलेला जामीन योग्य होता की नाही, याची ते सखोल तपासणी करतील, असे न्यायमूर्ती मनोज मिश्रा आणि न्यायमूर्ती श्री. चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने सूचित केले. गुरुवारी, राज्य सरकारच्या वतीने बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी या हत्या प्रकरणात 'अरेस्ट मेमो'मध्ये कायद्याच्या चुकीच्या कलमाचा उल्लेख असणे, विशेषतः ती केवळ टंकलेखनातील चूक असणे ही बाब अटक अवैध ठरवण्यासाठी आणि जामीन मंजूर करण्यासाठी पुरेशी ठरू शकते का, हा प्रश्न उपस्थित केला. उच्च न्यायालयाने रघुवंशीचा जामीन कायम ठेवला होता. याचे कारण म्हणजे पोलिसांनी अटकेची योग्य लेखी कारणे दिली नव्हती. न्यायालयाने याला न्यायपूर्ण बुद्धीचा पूर्ण अभाव असे म्हटले आहे.

सॉलिसिटर जनरल यांनी ही चूक केवळ लिपिकीय स्वरूपाची होती, असा युक्तिवाद केला. हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे, जिथे अटकेची कारणे दिली गेली नाहीत या कारणास्तव जामीन मंजूर केला गेला. वास्तविक, अटकेच्या वेळी कारणे दिली गेल्याची नोंद उपलब्ध आहे, असे ते म्हणाले. मात्र, खंडपीठाने अटकेच्या वेळी लेखी स्वरूपात कारणे देण्याच्या आवश्यकतेबाबतच्या परस्परविरोधी निकालांमध्ये सुसूत्रता आणणे किंवा त्यांचा मेळ घालणे न्यायालयासाठी गरजेचे आहे, असे म्हटले. ◂ (वृत्तसंस्था)

### गुन्ह्याचे गांभीर्य अधिक महत्त्वाचे

आम्ही या प्रकरणाचा सविस्तर विचार करू. हे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपवण्याची गरज आहे की नाही, याचा निर्णय आम्ही घेऊ, असे न्यायमूर्ती मिश्रा म्हणाले. तांत्रिक स्वरूपाच्या टंकलेखन चुकीपेक्षा गुन्ह्याचे गांभीर्य अधिक महत्त्वाचे मानले गेले पाहिजे, असे असे मत सर्वोच्च कायदे अधिकाऱ्याने मांडले. हे प्रकरण असे आहे की, ते दोघे मेघालयात हनिमूनसाठी गेले होते. ही पूर्वनियोजित हत्या होती. तिने डोंगरावर पतीची हत्या केली आणि मृतदेह दरीत फेकून दिला. हा अत्यंत गंभीर गुन्हा आहे, असे मेहता म्हणाले. ■

## ट्रक-कारच्या धडकेत सात ठार

**बंगळुरू, ९ जुलै**

कर्नाटकातील उत्तर कन्नड जिल्ह्यात ट्रक आणि कारच्या समोरासमोर धडकेत सात लोकांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे जखमी आहे. या अपघातावर पंतप्रधान मोदी यांनी शोक आणि पीडितांच्या कुटुंबीयांप्रति संवेदना व्यक्त केल्या.

उत्तर कन्नड जिल्ह्यातील यल्लापूर तालुक्यात अरबैल घाटाजवळ गुरुवारी पहाटे कार आणि ट्रकची धडक झाली. या भीषण अपघातात धारवाड येथील सात जणांचा मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. सर्व लोक तीर्थयात्रा साठी धारवाडहून कारने निघाले होते. चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार दुभाजक ओलांडत विरुद्ध बाजूच्या मार्गावर गेली, त्याचवेळी आलेल्या एका ट्रकने जोरदार धडक दिली. माहिती मिळताच पोलिस अपघातस्थळी पोहोचले आणि जखमींना रुग्णालयात हलवले. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'अल्फा'ची कमाई अपेक्षेपेक्षा कमी





**मुंबई :** आलिया भट्ट आणि शर्वरी यांचा 'अल्फा' हा ॲक्शन-थ्रिलर चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपेक्षित कामगिरी करताना दिसता नाही. पहिल्या वीकेंडला चित्रपटाची सुरुवात चांगली झाली आणि त्यातून मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या, मात्र आता त्याच्या कमाईत घट झाली. 'अल्फा'ने सहाव्या दिवशी भारतीय बॉक्स ऑफिसवर २.८५ कोटी रुपयांची कमाई केली. यामुळे चित्रपटाचे भारतातील एकूण निव्वळ कलेक्शन ४४.९५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे, तर देशांतर्गत एकूण कलेक्शन ५३.५९ कोटी रुपये इतके झाले आहे. त्याच दिवशी चित्रपटाने विदेशातही १.५ कोटी रुपयांची कमाई केली, ज्यामुळे त्याची आंतरराष्ट्रीय कमाई २१.३ कोटी रुपयांवर पोहोचली. या आकडेवारीसह, आलिया भट्ट आणि शर्वरी यांची मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट आता ७४.८९ कोटी रुपयांच्या जागतिक कमाईच्या टप्प्यावर पोहोचला आहे. ■

### 'जन नायक'बाबत वितरकाने दिली माहिती

**मुंबई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि अभिनेते विजय यांच्या दीर्घकाळ रखडलेल्या 'जना नायकन' या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. एका कॅनेडियन वितरकाने हा चित्रपट अखेर २४ जुलै रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होऊ शकतो, असा संकेत दिला आहे. सात महिन्यांच्या विलंबानंतर चित्रपटाने सेन्सॉर बोर्डाची प्रक्रिया पूर्ण केली असून आता तो प्रमाणपत्राच्या प्रतीक्षेत आहे. कॅनेडियन वितरक यॉर्क सिनेमाजने बुधवारी 'एक्स'वर एक पोस्ट शेअर केली. अखेरीस, आपला लाडका थलपथी विजय 'जना नायकन' घेऊन मोठ्या पडद्यावर धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज झाला आहे. यॉर्क सिनेमाजद्वारे कॅनडामध्ये २४ जुलै रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. एका अद्भुत चित्रपटगृहातील अनुभवासाठी तयार रहा. तिकिटांसाठी संपर्कात रहा, असे ज्यात लिहिले आहे. ■



### 'दृश्यम ३' चे नवीन कथानक तयार



**मुंबई :** अजय देवगणचे सध्या लक्ष अनेक वेगवेगळ्या प्रोजेक्ट्सवर आहे. यात 'धमाल ४', 'दृश्यम ३', 'गोलमाल' फ्रँचायझीचा पुढील चित्रपट आणि नुकत्याच टीझरनंतर चर्चेत आलेला 'चौहान' यांचा समावेश आहे. मागील काही वर्षांत अजय देवगणने स्वतःला केवळ ॲक्शन चित्रपटांपर्यंत मर्यादित ठेवले नाही. त्यांच्या सध्याच्या चित्रपटांच्या यादीत कॉमेडी, इन्व्हेस्टिगेशन थ्रिलर, हॉरर आणि ड्रामा यांसारख्या वेगवेगळ्या शैलींचे चित्रपट समाविष्ट आहेत, जे एक अभिनेता म्हणून त्याचे विविध प्रयोग दर्शवतात. 'दृश्यम 3' चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले असून, चित्रपट सध्या पोस्ट-प्रॉडक्शन टप्प्यात आहे. एडिटिंग, बॅकग्राउंड स्कोअर आणि इतर तांत्रिक कामे वेगाने सुरू असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, निर्मात्यांनी याबाबत अद्याप कोणतीही घोषणा केलेली नाही. ■



जम्मू विभागातील डोडा जिल्हयात ढगफुटीनंतर आलेल्या जलप्रलयाने डोडा येथे प्रचंड वित्तहानी झाले आहे. पर्वतावरून घरंगळत आलेल्या विशाल दगडांमुळे घरांचे मोठे नुकसान झाले

# पाकिस्तानी गुप्तहेराच्या घरावर एनआयचा छापा

**जयपूर, ९ जुलै**

राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) एका पथकाने राजस्थानमधील जोधपूर येथे पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयचा हँडलर असलेल्या झीशान शेख याच्या घरावर छापा टाकला. भारतीय सुरक्षा दलाची माहिती पाकिस्तानला देणे आणि तरुणांना दहशतवादी संघटनेत भरतीसाठी प्रवृत्त करण्याच्या आरोपात त्याला यापूर्वीच अटक केली होती.



एनआयएचे पथक जोधपूरच्या नई सडक भागातील झीशानच्या घरी पोहोचले आणि त्यांनी शोधमोहीम राबवली. यावेळी त्याच्या कुटुंबीयांची चौकशीही करण्यात आली. या कारवाईत बँक खात्याशी संबंधित तपशील, मोबाईल आणि लॅपटॉप जप्त केले. आरोपी नियमितपणे ज्या लोकांच्या संपर्कात होता त्यांचीही चौकशी करण्यात आली. जोधपूर सदर बाजार पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मानक राम बिश्नोई यांनी सांगितले की, झीशान तरुणांना कट्टरपंथी विचारसरणीशी जोडण्यासाठी इंटरनेटवर 'बेनेक्स' नावाच्या व्हॉट्सॲप ग्रुपचा वापर करत होता. ◂ (वृत्तसंस्था)

## अपघातात एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

**उमरिया, ९ जुलै**

मध्य प्रदेशातील उमरिया जिल्ह्यात गुरुवारी पहाटे एका कुटुंबातील चार जणांचा (दोन महिला आणि एका मुलासह) मृत्यू झाला; ते ज्या कारमधून प्रवास करत होते, ती कार रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला धडकली.

पोलिसांनी मृतांची संख्या पाच असल्याचे सांगितले होते, परंतु एका जखमी महिलेला मृत समजले गेले होते; मात्र जिल्हा रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी तिच्यावर 'सीपीआर' प्रक्रिया केल्यावर ती पुन्हा शुद्धीवर आली आणि तिचे प्राण वाचले, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. हा अपघात पहाटे साडेतीनच्या सुमारास सिव्हिल लाइन्स पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भारुला गावाजवळ झाला. यात कार उभ्या ट्रकला धडकली. ◂ (वृत्तसंस्था)

# नैर्ऋत्य मान्सूनने देश व्यापला

**भारतीय हवामान विभागाची माहिती**

**नवी दिल्ली, ९ जुलै**

नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांनी राजस्थान, हरयाणा आणि पंजाबच्या उर्वरित भागांतही प्रगती केली असून, आता त्याने संपूर्ण देश व्यापला आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने गुरुवारी दिली.

मान्सूनने संपूर्ण देश व्यापण्यास एक दिवसाचा विलंब केला. सामान्यतः ही प्रक्रिया ८ जुलै रोजी देशात पूर्ण होते. यंदा केरळमध्ये मान्सूनचे आगमन ४ जुलै रोजी झाले. यामुळे देशात नैर्ऋत्य मान्सून हंगामाची (जून-सप्टेंबर) सुरुवात झाली. सामान्यतः या राज्यात मान्सूनचे आगमन १ जून रोजी होते. जुलै महिन्यात आतापर्यंत भारतात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त राहिले. महिन्याच्या पहिल्या नऊ दिवसांत ७३.८ मिमी पाऊस पडणे अपेक्षित असताना, संपूर्ण देशात १०१.९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे, ३० जून रोजीच्या मासिक अंदाजात भारतीय हवामान विभागाने महिन्याच्या सात ते १० दिवसांत देशभरात पावसाचा अंदाज वर्तवला होता.

मात्र, जुलै महिना कोरडा असेल, देशभरात दीर्घ काळाच्या सरासरीच्या (एलपीए) ९४ टक्के पाऊस अपेक्षित असेल. एखाद्या विशिष्ट प्रदेशात दिलेल्या कालावधीसाठी नोंदवलेला पावसाला एलपीए म्हटले जाते. दीर्घ कालावधीसाठी सामान्यतः ३० किंवा ५० वर्षांचा विचार केला जातो. जूनमध्ये भारतात पावसाची तूट जवळपास ४० टक्के दिसली आणि मध्य भारत ५०.४ टक्क्यांच्या तुटीचे सर्वात जास्त प्रभावित झाला. देशात १९०१ पासून महिन्यातील पाचव्या क्रमांकाचा ९९.५ मिमी पाऊस पडला. १ जून ते ९ जुलै या कालावधीत देशात एकूण पावसाची तूट सध्या १४ टक्के इतकी आहे. (वृत्तसंस्था)

### मान्सून दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के

एकंदरीत विभागाच्या अंदाजानुसार, या वर्षीचा मान्सून पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के राहण्याची शक्यता आहे आणि यात चार टक्क्यांची त्रुटी मॉडेलमध्ये असू शकते. १९७१ ते २०२० या कालावधीतील आकडेवारीवर आधारित, संपूर्ण देशातील हंगामी पावसाची दीर्घकालीन सरासरी ८७ सेमी इतकी आहे. या तुटीचे एक मुख्य कारण म्हणजे विषुववृत्तीय प्रशांत महासागरात निर्माण होणारी अल-निनोची स्थिती आहे. यामुळे कमी पाऊस पडतो. ■



नवी दिल्लीतील जंगपुरा येथे गुरुवारी सकाळी झालेल्या मुसळधार पावसात पाण्याखाली गेलेल्या अंडरपासमधून वाट काढताना नागरिक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# दोषी कंपन्यांचे परवाने रद्द करणार

## निकृष्ट सोयाबीन बियाणे प्रकरण; अकोला, अमरावतीसह विदर्भातील शेतकऱ्यांची फसवणूक



पावसाळी अधिवेशन



**मुंबई, ९ जुलै**

विदर्भातील अकोला, अमरावती व इतर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना निकृष्ट व बोगस सोयाबीन बियाण्यांमुळे मोठ्या फसवणुकीला सामोरे जावे लागल्याची गंभीर कबुली राज्याच्या कृषिमंत्र्यांनी विधानसभेत दिली असून, दोषी आढळणाऱ्या बियाणे उत्पादक व विक्रेता कंपन्यांचे परवाने रद्द करण्याची घोषणा कृषी मंत्री दत्ता भरणे यांनी विधानसभेत केली आहे.

राज्यातील अकोला आणि अमरावती परिसरात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची पेरणी करूनही बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून सातत्याने येत होत्या. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने संबंधित कंपन्यांच्या बियाण्यांची तपासणी केली असता, अनेक ठिकाणी बियाण्यांचा दर्जा निकषांनुसार नसल्याचे निदर्शनास आले. यावरून कृषिमंत्र्यांनी सभागृहात शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे मान्य करत, बियाणे नियंत्रण कायद्यातील तरतुदींनुसार दोषी कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले. ज्या कंपन्यांचे बियाणे निकृष्ट दर्जाचे आढळेल, त्यांचे बियाणे विक्रीचे परवाने तत्काळ रद्द करण्यात येतील. तसेच बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व दुबार पेरणीसाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आल्याचेही त्यांनी सभागृहात सांगितले. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित करत, अकोला जिल्ह्यातच २०० हून अधिक शेतकऱ्यांनी बियाण्यांबाबत तक्रारी दाखल केल्याचे निदर्शनास आणले. सुमारे २५ हजार हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पेरणी उगवली नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने तातडीने पावले न उचलल्यास हजारो शेतकरी आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होण्याचा इशाराही त्यांनी दिला.

कृषिमंत्र्यांच्या या घोषणेमुळे बाधित शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता असली, तरी प्रत्यक्ष कारवाई किती गतीने होते आणि नुकसान भरपाई कधी मिळते, याकडे संपूर्ण विदर्भाचे लक्ष लागले आहे.


**वृक्षसंपदेच्या गणनेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणणार**

राज्यातील जंगलांमध्ये असलेल्या वृक्षसंपदेची अचूक मोजणी करण्यासाठी तसेच वृक्षलागवडीच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्ययावत तंत्रज्ञान व यंत्रसामग्री वापरण्यात येणार असल्याची घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत केली. याच बरोबर यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येणार असून, विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येतील, अशी माहिती वनमंत्री यांनी विधानसभेत दिली. विधानसभा आमदार संतोष दानवे यांनी वृक्षतोड परवानगी प्रक्रियेसंदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री नाईक बोलत होते. ग्लोबल वॉर्मिंगचा वाढता धोका लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड ही काळाची गरज असून, त्यादृष्टीने राज्यात महसूल, आदिवासी विकास आणि वन विभागाच्या समन्वयातून व्यापक वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येत आहे. कमी पाण्यात होणाऱ्या बांबू लागवडीलाही प्रोत्साहन देण्यात येत असून, बांबूपासून इथेनॉल निर्मितीचाही शासनाचा विचार असल्याचे त्यांनी नमूद केले.

**सिंहस्थ कुंभमेळा रिंगरोड आरेखन बदलण्याची चौकशी होणार**

नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित बाह्य रिंगरोड प्रकल्पाच्या आरेखनात तीन वेळा बदल करण्यात आले असून, या बदलांमागे कोणाला विशेष लाभ मिळवून देण्याचा हेतू होता का, याची चौकशी अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीमार्फत करण्यात येणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून मातोरी आणि मुंगसरे परिसरातील रिंगरोड आरेखनातील बदलांबाबत सभागृहात मुद्दा मांडला होता. यासोबत आमदार सरोज अहिरे यांनीही याबाबत सभागृहात विस्तृत माहिती देत अनेक अधिकारी यांच्या मालकीच्या जमिनी रिंगरोड मध्ये जाण्यासाठी आरेखन बदलन्यात आल्याचे सांगत याची चौकशी करण्याची मागणी केली. त्याच बरोबर शेतकऱ्यांची जोरजबरदस्तीने शेती न घेता त्यांच्या मागणीनुसार सरकारने विचार करावा, असेही यावेळी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### प्रतापगडावर वीर जिवाजी महाले यांचे भव्य स्मारक उभारणार



छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी प्राणार्पण करणारे वीर जिवाजी महाले यांच्या शौर्याला चिरंतन स्वरूप देण्यासाठी किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी त्यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणा पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई यांनी विधानसभेत केली. यासाठी पर्यटन विभागामार्फत पहिल्या टप्प्यात एक कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. दरवर्षी १० नोव्हेंबर रोजी किल्ले प्रतापगडावर शिवप्रताप दिन सोहळा साजरा होतो, ज्यासाठी लाखो पर्यटक, इतिहास संशोधक व शिवप्रेमी भेट देतात. वीर जिवाजी महाले यांच्या पराक्रमाला स्मारकाच्या माध्यमातून सन्मान देण्याची मागणी विविध सामाजिक व इतिहास संशोधन संस्था, शिवप्रेमी संघटना आणि लोकप्रतिनिधींकडून सातत्याने होत होती. त्या मागणीची दखल घेत हा निर्णय घेण्यात आला.

### अजित पवार यांना मरणोत्तर 'पद्मविभूषण' प्रदान करावे



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिवंगत अध्यक्ष व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान "पद्मविभूषण" मरणोत्तर प्रदान करण्यात यावा, अशी मागणी पक्षाच्या सर्व आमदार व विधान परिषद सदस्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभेतील मुख्य प्रतोद चेतन विठ्ठल तुपे यांनी ८ जुलै रोजी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले असून, त्यात पक्षाच्या सर्व आमदार-आमदार परिषद सदस्यांच्या वतीने ही मागणी करण्यात आल्याचे नमूद आहे. राज्य सरकारने याबाबत केंद्र सरकारकडे औपचारिक शिफारस पाठवावी, अशी विनंती या पत्रातून करण्यात आली आहे.

### राज्यातील मॉलमधील गेमिंग झोनची होणार चौकशी

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील शॉपिंग मॉल्समध्ये चालवल्या जाणार्या कमर्शियल गेमिंग झोन्समध्ये सुरक्षा आणि अग्निशमन नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात आहे का, याचा एक व्यापक राज्यव्यापी आढावा घेतला जाणार आहे. यासंदर्भात सर्व महानगरपालिका आयुक्त आणि प्रादेशिक अधिकार्यांना तातडीने तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले असून, या सुरक्षा मोहिमेचा सविस्तर अहवाल पुढील विधिमंडळ अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवला जाईल, अशी महत्त्वपूर्ण माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषदेत भाजप आमदार उमा खापरे यांनी नियम ९२ अन्वये मुंबई आणि राज्यातील मॉल्समधील सुरक्षा निकष न पाळणार्या गेमिंग झोन्सवर कडक कारवाई करण्याबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत आमदार परिणय फुके आणि अमित गोरखे यांनीही सहभाग घेऊन गर्दीच्या मनोरंजनाच्या ठिकाणी असणार्या सार्वजनिक सुरक्षेच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त केली. विरोधकांच्या या प्रश्नांना उत्तर देताना उद्योगमंत्र्यांनी शासकीय पातळीवर सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

## आरटीओ अधिकारी रवींद्र भुयारांसह तिघे सक्तीच्या रजेवर : सरनाईक

### परिवहन विभागातील भ्रष्टाचारावर राज्य सरकार लावणार चाप



**मुंबई, ९ जुलै**

परिवहन विभागातील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराविरोधात राज्य सरकारने अत्यंत कठोर भूमिका घेतली असून, कोणत्याही भ्रष्ट अधिकाऱ्यांला पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानसभेत दिला. आरटीओ विभागातील कथित गैरव्यवहारांप्रकरणी सखोल चौकशी सुरू असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना चौकशीच्या प्रक्रियेवर प्रभाव पाडता येऊ नये, म्हणून तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठविण्याची घोषणा त्यांनी सभागृहात केली.

विधानसभेत काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी परिवहन विभागातील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा लक्षवेधीद्वारे उपस्थित केला होता आणि संबंधित संशयित अधिकाऱ्यांविरूद्ध त्वरित निलंबनाची किंवा कडक कारवाईची मागणी केली होती. विरोधी पक्षाच्या या मागणीला उत्तर देताना मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की, आरटीओ विभागातील कथित आर्थिक गैरव्यवहारांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सखोल चौकशी सुरू आहे. या प्रकरणातील आरोपांची आणि गांभीर्याची दखल घेऊन, प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, मोटार वाहन निरीक्षक योगेश मोरे आणि मोटार वाहन निरीक्षक गणेश विघ्ने या तिघांना आजपासूनच तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी पूर्णपणे निष्पक्ष, पारदर्शक आणि दबावामुक्त वातावरणात व्हावी, यासाठी एका उच्चपदस्थ आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याची माहितीही परिवहन मंत्र्यांनी सभागृहाला दिली. या कारवाईमुळे चौकशीत कोणताही अडथळा येणार नाही आणि संपूर्ण सत्य समोर येण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परिवहन विभागात भ्रष्टाचाराला 'झिरो टॉलरन्स' असून गैरव्यवहार करणार्यांची गय केली जाणार नाही, असे नमूद करत प्रताप सरनाईक म्हणाले की, ही सक्तीची रजा केवळ प्राथमिक पाऊल आहे.

**भ्रष्टाचाराविरोधातील मोहीम थांबणार नाही**

चालू असलेल्या या उच्चस्तरीय चौकशीअंती जे कोणी अधिकारी किंवा कर्मचारी दोषी आढळतील, त्यांच्यावर कोणतीही दया न दाखवता थेट बडतर्फीसह अत्यंत कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई केली जाईल. राज्याच्या परिवहन व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जनतेचा विश्वास अबाधित ठेवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, भ्रष्टाचाराविरोधातील ही मोहीम भविष्यातही अशीच तीव्रपणे सुरू राहील, असेही त्यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

## रविकांत तुपकरांचे आंदोलन

# विधानभवनात घुसण्याचा प्रयत्न



**मुंबई, ९ जुलै**

शेतकर्यांच्या विविध मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी आज मुंबईत विधानभवनाबाहेर आंदोलन केले. राज्यातील सर्व शेतकर्यांना विनाअट सरसकट कर्जमुक्ती मिळावी, पीकविमा आणि शेतमालाला योग्य हमीभाव मिळावा, या प्रमुख मागण्यांसाठी रविकांत तुपकर शेतकर्यांसह थेट विधानभवनाच्या दिशेने धडकले. आंदोलकांनी विधानभवनात घुसण्याचा प्रयत्न केला. या वेळी शेतकर्यांनी सातबार्यांच्या प्रती विधानभवनाच्या दिशेने भिरकावल्या.

गुरुवारी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास हे आंदोलन सुरू झाले. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला आणि शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्यासह क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या शंभरहून अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. मात्र, तुपकरांना ताब्यात घेतल्यानंतर, मंत्रालयासमोरील दोन उंच झाडांवर संघटनेचे चार कार्यकर्ते गळ्यात फासाची दोरी अडकवून चढले, तर दुसरीकडे काही शेतकरी मरीन ड्राईव्ह येथे थेट समुद्रात उतरले. जोपर्यंत सरकार कर्जमाफीच्या विषयावर ठोस बैठक घेत नाही आणि लेखी आश्वासन देत नाही, तोपर्यंत झाडावरून खाली उतरणार नाही, असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतल्यामुळे पोलिस आणि प्रशासनाची चांगलीच धावपळ झाली. (तभा वृत्तसेवा)

# अयोध्येतील श्रीराम मंदिर दर्शन व्यवस्थेत बदल

### २२ जुलै रोजी होणाऱ्या ट्रस्टच्या बैठकीत अंतिम निर्णय



**अयोध्या, ९ जुलै**

श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट राम मंदिरातील दर्शन पद्धती, पूजाविधी, नैवेद्य, नैवेद्य व्यवस्थापन, सुरक्षा आणि भक्तांसाठीच्या सुविधांमध्ये २२ जुलैनंतर मोठे बदल लागू होण्याची शक्यता आहे. रामानंदीय परंपरेतील संत आणि विद्वानांच्या सूचनांच्या आधारे ही व्यवस्था लागू केली जाईल.

२२ जुलै रोजी श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची महत्त्वाची बैठक होणार आहे. यावेळी दर्शन आणि इतर व्यवस्थेत बदल करण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यानंतर नवीन व्यवस्था निश्चित केली जाऊ शकते. बैठकीत ट्रस्टचे नवीन सरचिटणीस आणि इतर पदांसाठी नवीन सदस्यांची निवड होऊ शकते. दर्शन पद्धती, नैवेद्य, पूजाविधी, भक्तांसाठीच्या सुविधा आणि प्रशासकीय प्रणाली अधिक पद्धतशीर व पारदर्शक बनवण्यासाठी ट्रस्ट विचारमंथन करत आहे. अयोध्येतील रामानंदीय परंपरेतील संत आणि विद्वानांच्या सूचनांचाही यात समावेश केला जात आहे. रामानंद परंपरेनुसार पूजा पद्धती अधिक सुव्यवस्थित करणे, राग-भोगची व्यवस्था सुधारणे आणि भक्तांची सोय सुनिश्चित करणे यासंदर्भात अनेक बाबींचा विचार केला जात आहे. दर्शन प्रणाली अधिक सुलभ करणे, अर्पण व्यवस्थापन अधिक पारदर्शक करणे आणि मंदिराची प्रशासकीय प्रणाली आधुनिक व उत्तरदायी बनवणे हे ट्रस्टचे उद्दिष्ट आहे. ट्रस्टचे खजिनदार गोविंद देवगिरी महाराज यांनी संतांच्या सूचनांचा गांभीर्याने विचार केला जात असून व्यवस्थेत सुधारणा करण्यात येणार असल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले. (वृत्तसंस्था)

## डॉक्टरला मारहाण करणाऱ्या नगरसेवकाला दिली समज

**मुंबई, ९ जुलै**

ठाणे जिल्ह्यातील एका रुग्णालयात महिला डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर कथितरीत्या हल्ला केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फटकारले आहे, अशी माहिती राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी दिली.

एका व्हायरल व्हिडीओमध्ये म्हात्रे एका डॉक्टरच्या कानशिलात लगावताना, त्यांना ठोसे मारताना आणि त्यांच्या डोक्यावर रजिस्टर आपटताना दिसत आहेत. तसेच, ते एका महिला डॉक्टरच्या हातावरही मारताना दिसत आहेत. आमच्या पक्षाची भूमिका अगदी स्पष्ट आहे. महिला डॉक्टरला मारहाण करणे अयोग्य आहे. शिवसेनेतील अनेकांनी, तसेच राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनीही अशा प्रकारची मारहाण चुकीची असल्याचे अधोरेखित केले आहे, असे सामंत म्हणाले. उपमुख्यमंत्र्यांनी त्या शिवसेना नगरसेवकाला फटकारले आहे, असेही त्यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

## वरवडेकर, कडकाले यांना क्रीडा पत्रकार पुरस्कार

**मुंबई, दि. ९ जुलै-**

महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेने आपल्या २६व्या कबड्डी दिनाचे औचित्य साधत क्रीडा पत्रकार मंगेश वरवडेकर व अलताफ कडकाले यांना ज्येष्ठ क्रीडा पत्रकार पुरस्कार जाहीर केला असून त्याचबरोबर आपल्या विविध पुरस्कारांचीही घोषणा केली. कबड्डीसाठी आयुष्य झिजवणारे दिनकर पाटील (सांगली) आणि शकुंतला खटावकर (पुणे) यांना प्रतिष्ठेच्या कबड्डी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. ज्येष्ठ खेळाडू, पंच, प्रशिक्षक, कार्यकर्ते, पत्रकार आणि गुणवंत कबड्डीपटूंवर यंदा पुरस्कारांचा अक्षरशः वर्षाव करण्यात आला आहे. येत्या १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता रत्नागिरीतील सावरकर नाट्यगृहात रत्नागिरी जिल्हा कबड्डी संघटनेच्या वतीने हा दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती राज्य कबड्डी संघटनेने पत्रकाद्वारे दिली आहे. ज्येष्ठ खेळाडू पुरस्कार म्हणून सोलापुरचे मदन गायकवाड यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

**सोलापूरच्या मदन गायकवाड यांचा ज्येष्ठ खेळाडू पुरस्काराने गौरव**

# लाखोंच्या उपस्थितीत खामेनेईंना अखेरचा निरोप



**तेहरान, ९ जुलै**

इराणचे दिवंगत सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचा दफनविधी गुरुवारी मशहद येथील इमाम रझा दर्ग्यात झाला. यावेळी लाखो नागरिकांची उपस्थिती होती. अखेरचा निरोप देण्यासाठी लाखो नागरिकांचा जनसागर लोटला होता. काळे कपडे घालून छाती बडवून शोक व्यक्त करणाऱ्या गर्दीने अमेरिका आणि इस्त्रायलविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

दफनविधीपूर्वी खामेनेई यांचे पार्थिव इराकचे पवित्र शहर नजफ येथे आणले. यावेळी इमाम अली यांच्या दर्ग्याजवळ मोठी गर्दी जमली होती. त्यानंतर शवपेटी नजफहून कर्बला येथे रस्त्याने आणण्यात आली. यावेळी लोकांनी इराणी झेंडे फडकवत खामेनेई यांचे फोटो हातात धरले होते. मोठ्या संख्येने सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले होते आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी वैद्यकीय पथकेही उपस्थित होती. कर्बला येथून मशहद येथील इमाम रझा दर्ग्यात त्यांचे पार्थिव आणण्यात आले आणि तिथे त्यांचा अन्त्यविधी पार पडला. अन्त्यविधी सोहळ्यास ३ जुलैपासून सुरुवात झाली. शंभरपेक्षा अधिक देशांच्या प्रतिनिधींची अन्त्यसंस्कार सोहळ्यात उपस्थिती होती. अन्त्ययात्रा इराण आणि शिया समुदायासाठी विशेष महत्त्व असलेल्या धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांमधून गेली. या प्रवासाला तेहरानमधून सुरुवात झाली, इराणच्या पवित्र शहरांना भेट दिल्यानंतर इराकमधील नजफ आणि कर्बला येथे हा प्रवास झाला. त्यानंतर शवपेटी इराणला परत आणली आणिन गुरुवारी त्यांच्या मूळ गावी मशहदमध्ये त्यांच्यावर अन्त्यसंस्कार करण्यात आले. (वृत्तसंस्था)

## भीमा खोऱ्यातील पावसाची उघडीप

# सर्व धरणांतील विसर्ग बंद दौंडचा विसर्ग घटला

### उजनीची पन्नास टक्क्यांकडे वाटचाल

**तभा वृत्तसेवा, टेंभुर्णी, दि. ९ जुलै -**

भीमा खोऱ्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने धरणांमध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवकात घट झाली आहे. त्यामुळे भीमा नदीवरील बहुतांश धरणांमधून सुरू असलेले विसर्ग बंद करण्यात आले असून दौंड येथून उजनी धरणाकडे सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गातही सातत्याने घट होत आहे. प्रत्येक तासाला विसर्ग कमी होत असल्याने नदीपात्रातील पाण्याचा प्रवाहही मंदावला आहे.

गुरुवारी (९ जुलै) सायंकाळी ७ वाजेपर्यंत दौंड येथून उजनी धरणात ५३ हजार ५३,७१७ क्यूसेक्स इतका विसर्ग सुरू होता. पावसाची उघडीप कायम राहिल्यास या विसर्गात आणखी घट होण्याची शक्यता जलसंपदा विभागाकडून व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, उजनी धरणातील पाणीसाठ्यात मात्र समाधानकारखी वाढ सुरू असून धरणाची पातळी हळूहळू वाढत आहे. ९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत उजनी धरणातील एकूण पाणीसाठा ८४.१४ टीएमसी इतका झाला असून उपयुक्त पाणीसाठा २०.४८ टीएमसी नोंदविण्यात आला आहे. धरण भरावाची टक्केवारी ३८.२३% टक्क्यांवर पोहोचली आहे.

भीमा खोऱ्यात पुन्हा दमदार पावसाला सुरुवात झाल्यास उजनी धरणातील पाणीसाठ्यात वेगाने वाढ होऊन धरणाची वाटचाल पन्नास टक्क्यांच्या दिशेने होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या मात्र पावसाची उघडीप आणि घटलेला विसर्ग यामुळे जलसाठ्यात वाढीचा वेग काहीसा मंदावला असला, तरी आगामी पावसावरच उजनीच्या पुढील भरावाची दिशा अवलंबून राहणार आहे. मात्र उजनी धरणावर अवलंबून असलेले शेतकरी उजनी धरण ५० टक्के कडे वाटचाल करू लागल्याने अनेक शेतकरी ऊस लागवड करण्यासाठी धावपळ करू लागले आहेत

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# शांततेच्या शत्रूंची शिरजोरी

जागतिक स्तरावर आर्थिक आणि भू-राजकीय अस्थिरता माजविणाऱ्या इराण-अमेरिका युद्धाचे ढग तात्पुरते निवळल्यावर जगाने टाकलेला निःश्वास पूर्ण होण्याआधीच पुन्हा एकदा या दोन देशांनी परस्परांविरोधात सुरू केलेल्या लष्करी कारवायांचे पडसाद जगभर उमटू लागले आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यातील तात्पुरत्या युद्धविरामाचा फुगा फुटल्यानंतर बुधवारी उभे जग अक्षरशः हादरून गेले. हा संघर्ष पुन्हा एकदा टोकाला पोहोचला असून, युद्धाचे ढग गडद झाले आहेत. जागतिक व्यापारक्षेत्राची जीवनवाहिनी असलेल्या 'होर्मुझ सामुद्रधुनी'वरील कब्जाच्या संघर्षाने जागतिक भू-राजकारण आणि अर्थकारणाला एका मोठ्या संकटाच्या उंबरठ्यावर आणून उभे केले आहे. बुधवारी अमेरिका आणि इराणमध्ये वार-पलटवार सुरू झाले आणि पश्चिम आशियामधील तणावाची जुनी स्थिती पुन्हा गडद झाली. इराणसोबतचे युद्ध थांबविण्याच्या तात्पुरत्या समझोत्याची मुदत संपल्याचे अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तुर्कियेमधील अंकारा येथे नाटो परिषदेत जाहीर करताच जगभराच्या अर्थक्षेत्राला हादरे बसू लागले. येत्या काही दिवसांत युद्धाची कारवाई अधिक तीव्र करण्याचे आणि आर्थिक नाड्या आवळण्याचे संकेतही ट्रम्प यांनी दिले आणि लगेचच अमेरिकेच्या सैन्याने होमुर्झच्या सामुद्रधुनीमधून होणाऱ्या वाहतुकीकडे मोर्चा वळविला. इराणच्या सैनिकी तळांवर जोरदार हवाई हल्ले चढविले आणि जगभरातील अर्थक्षेत्र घायाळ झाले. अमेरिकेकडून मारले गेलेले इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह खामेनेई यांच्यावर इराणमध्ये अन्त्यसंस्कार सुरू असतानाच सूडाच्या या भावनेने उचल खाल्ली आणि आता प्रत्यक्ष युद्धाच्या भडक्यात होरपळण्याची वेळ जगावर येऊन ठेपली आहे.

अमेरिकेने इराणी लष्करी तळांवर हल्ले केल्यानंतर इराणने कुवैत आणि बहरीनवर हल्ले चढवून अमेरिकी तळांना लक्ष्य केले आणि इराणच्या तेलावरील अमेरिकेचे निर्बंध पुन्हा जारी झाले. जगातील सुमारे २० टक्क्यांहून अधिक खनिज तेलाची आणि द्रवरूप वायूची वाहतूक करणाऱ्या होर्मुझच्या सामुद्रधुनीत पुन्हा एकदा वाहतूक संकट निर्माण झाल्याने जागतिक पुरवठा साखळी कोलमडण्याची चिन्हे दिसू लागली आहेतच, पण भारतासह जगभरातील अनेक देशांच्या उंचावणाऱ्या विकासदराचे आलेख पुन्हा एकदा मान टाकताना दिसू लागल्याने जागतिक आर्थिक वृद्धीचे अगोदरचे सारे अंदाज पुन्हा कोलमडणार आहेत. विशेषतः, आपल्या एकूण गरजेच्या ८५ टक्क्यांहून अधिक कच्च्या तेलासाठी आयातीवर अवलंबून असलेल्या भारताच्या अर्थचक्राची पूर्वपदावर येणारी घडी पुन्हा विस्कळीत होणार आहे. देशातील ९० टक्के एलपीजीची आयात होर्मुझ सामुद्रधुनीतून होते. हा वाहतूक मार्ग सुरक्षित राहिलेला नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. युद्धविरामाच्या तात्पुरत्या करारानंतर तेल आणि गॅसपुरवठा सुरळीत होऊन परिस्थिती पूर्वपदावर येण्याच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. आता त्या मावळत चालल्या असून हा पुरवठा खंडित झाल्यास काही महिन्यांपूर्वीप्रमाणे पुन्हा घरगुती गॅस सिलेंडरच्या किमती भडकतील, कदाचित टंचाईच्या भीतीने जनजीवन विस्कळीत होईल आणि व्यावसायिक क्षेत्रावरील ताण वाढून मंदीच्या लाटा तडाखे देऊ लागतील. गेल्या काही महिन्यांत भारतीय रुपयावरील दबाव वाढत असल्याने त्याचे अवमूल्यन सुरू आहे. साहजिकच, आयात कराव्या लागणाऱ्या वस्तूंसाठी मोठी किंमत मोजावी लागणार असून याच परिस्थितीचे परिणाम शेअर बाजारावर दिसू लागले आहेत. जागतिक अनिश्चिततेमुळे परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून काढता पाय घेण्यास सुरुवात केली, तर बाजारात कशी पडझड होऊ शकते याची एक लहानशी चुणूक बुधवारी शेअर बाजाराला अनुभवायला मिळाली. बाजारातील अस्थिरतेचे हे लक्षण अर्थक्षेत्राच्या उभारीच्या आत्मविश्वासास नख लावणारे ठरले, तर अमेरिका-इराण संघर्षाचा मोठा फटका भारताला थेटपणे बसणार हे स्पष्ट असल्याने, नव्या संकटाचे संधीत रूपांतर करण्याचे नवे आव्हान भारतासमोर उभे राहिले आहे.

हे युद्ध सुरू झाल्यानंतर लगेचच भारतात त्याचे परिणाम दिसू लागताच राजकीय मुत्सद्देगिरी आणि आर्थिक लवचीकतेच्या उपाययोजनांमुळे युद्धस्थितीच्या पहिल्या टप्प्यात अर्थव्यवस्थेची पुरती वाताहत रोखण्यात भारताला यश आले होते. ऊर्जासंकटातून तोडगा काढण्यासाठी रशियाकडून कच्च्या तेलाची आयात वाढवितानाच, देशांतर्गत ऊर्जा स्रोतांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे धोरण भारताने स्वीकारले. त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आणि जागतिक संकटाचा हा फटका भारताच्या दृष्टीने बराचसा सौम्य झाला. या युद्धकाळातही भारताने अमेरिकेशी असलेले धोरणात्मक संबंध आणि इराणशी असलेले ऐतिहासिक ऋणानुबंध यामध्ये कमालीचा समतोल साधला आहे. भारताच्या जहाजांचे संरक्षण करण्यासाठी नौदलाने 'ऑपरेशन संकल्प' सक्रिय ठेवले आहे. तरीही, पश्चिम आशियातील ही तात्पुरती शस्त्रसंधी किंवा तणाव निवळावा ही सद्यःस्थितीची गरज असली, तरी भारतासाठी हा एक मोठा धडा आहे. भविष्यात स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी भारताला ऊर्जेच्या गरजेसाठी आखाती देशांवर अवलंबून न राहता पर्यायी ऊर्जाक्षेत्रांच्या स्वावलंबनाचे नवे प्रयत्न सुरू करावे लागतील. इंधनाचे पर्यायी साठे निर्माण करावे लागतील, हरित ऊर्जा आणि जलविद्युत, सौरऊर्जा यांसारख्या स्रोतांच्या उभारणीचा वेग वाढवावा लागेल. त्यामुळे पुन्हा डोके वर काढलेले हे संकट म्हणजे भारताच्या 'आत्मनिर्भर' बनण्याच्या प्रवासातील एक कठीण परीक्षा ठरणार आहे. जागतिक युद्धाच्या छायेत स्वतःचे हितसंबंध जपत आर्थिक गती कायम राखणे, हेच भारताच्या आगामी काळातील परराष्ट्र आणि आर्थिक धोरणाचे खरे यश असेल. कारण, भारताची भौगोलिक आणि आर्थिक परिस्थिती पाहता, तेलाच्या किमतींमधील किरकोळ चढ-उतारही देशाच्या विकासाचा वेग बदलू शकतात. कच्चे तेल महाग झाले की पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढून वाहतूक खर्चात होणाऱ्या वाढीमुळे भाजीपाला, अन्नधान्य, दुधापासून ते कारखान्यांमध्ये तयार होणाऱ्या प्रत्येक वस्तूची किंमत वाढते. ही महागाई नियंत्रणात राखण्यासाठी व्याजदर वाढल्यास गृहकर्जे, व्यावसायिक कर्जे महाग होऊन काटकसर आणि बचतीचे पर्याय स्वीकारावे लागतात आणि चलनवलन थंडावल्याने मंदीचा वेग वाढतो.

त्यामुळे, हा चक्रव्यूह भेदण्यासाठी आत्मनिर्भरता हाच सध्याच्या स्थितीत एकमेव पर्याय असल्याने त्याकरिता दीर्घकालीन योजना आखणे ही भारताच्या दृष्टीने पहिली गरज ठरणार आहे. पेट्रोल-डिझेलसारख्या इंधनाची आयात कमी करण्यासाठी उसाच्या चिपाडापासून किंवा धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा वापर वाढविण्याच्या पर्यायास प्राधान्य दिले जात असताना, त्या धोरणाभोवती वादाची वलये उमटू लागली आहेत. वाहतुकीवर खर्च होणाऱ्या इंधनाची बचत करण्यासाठी विजेवर चालणाऱ्या स्वयंचलित वाहनांचा वापर वाढविण्याची गरज जनतेच्या गळी उतरविण्यात अपेक्षित गती साध्य झालेली दिसत नाही. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि ग्रीन हायड्रोजनसारख्या भविष्यातील इंधनावर सुरू केलेल्या गुंतवणुकीचे लाभ मिळविण्यासाठी काही कालावधी द्यावा लागणार आहे. त्यामुळे, जोवर भारत ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत नाही, तोपर्यंत जागतिक स्तरावर घडणाऱ्या घडामोडी भारताच्या आर्थिक गतीवर प्रभाव टाकत राहतील, हे वास्तव स्वीकारलेच पाहिजे. देशाच्या अर्थकारणाचा डोलारा जर केवळ कच्च्या तेलाच्या अर्थकारणावर अवलंबून असेल, तर आज उद्भवलेल्या स्थितीचे आव्हान स्वीकारावे लागेल. युद्ध हा शांतता प्रस्थापित करण्याचा मार्ग नसतो. युद्धातून शांतता प्रस्थापित करणे हा वर्चस्ववादी मार्ग असतो. सध्याच्या युद्धस्थितीत वर्चस्ववादाचा मुद्दा अधिक गडद झालेला असल्याने, तोडग्यासाठीच्या संवादाचे मार्ग संकुचित झाले आहेत. ही स्थिती जागतिक शांततेसाठी धोकादायकच असल्याने, भारताने अधिक सतर्कतेने आत्मनिर्भरतेच्या धोरणास गती देण्याची गरज आहे. ■

## अर्थविशेष

हितेश पारसे

# टीसीएस आणि आयकराचे नियम

आजकाल उच्च शिक्षण, नोकरी किंवा व्यवसायासाठी अनेक भारतीय विद्यार्थी व युवक परदेशात वास्तव्यास आहेत. त्यांच्या शिक्षणाचा खर्च, राहणीमान, वैद्यकीय खर्च किंवा इतर गरजांसाठी पालकांकडून नियमितपणे पैसे पाठविले जातात. मात्र, ''परदेशात पैसे पाठविल्यावर आयकर लागतो का?'', ''टीसीएस म्हणजे काय?'', ''किती रकमेपर्यंत कर नाही?'' असे अनेक प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण होतात. चला, हे नियम सोप्या भाषेत समजून घेऊया.

परदेशात मुलगा किंवा मुलीला पैसे पाठवता येतात का?

होय. भारतातील निवासी व्यक्तीला रिझर्व्ह बँकेच्या उदारीकृत प्रेषण योजना (एलआरएस) अंतर्गत परदेशात विविध कारणांसाठी पैसे पाठविण्याची परवानगी आहे.

यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो -

उच्च शिक्षणासाठी, राहणीमान व दैनंदिन खर्चासाठी, वैद्यकीय उपचारासाठी, भेट (गिफ्ट) म्हणून, गुंतवणूक करण्यासाठी, प्रवासासाठी, जवळच्या नातेवाईकांच्या देखभालीसाठी.

सध्या एका आर्थिक वर्षात एका निवासी भारतीय व्यक्तीस २,५०,००० अमेरिकन डॉलर्स (सुमारे २ कोटींपेक्षा अधिक) पर्यंत रक्कम एलआरएस अंतर्गत पाठविण्याची परवानगी आहे.

मुलगा किंवा मुलीला मिळालेली रक्कम करपात्र असते का?

नाही. जर आई-वडिलांनी आपल्या मुलगा किंवा मुलीला पैसे पाठविले असतील तर ती रक्कम भेट म्हणून गणली जाते.

आयकर कायद्यानुसार आई-वडील हे जवळचे नातेवाईक असल्यामुळे अशा भेटीवर कोणताही आयकर लागत नाही.

म्हणजेच, पालकांनी पैसे पाठविले, मुलाने किंवा मुलीने ते स्वीकारले...

...यावर भारतात कोणताही भेटवस्तू कर किंवा आयकर लागत नाही.

मात्र त्या पैशातून पुढे व्याज, भाडे, शेअर्सवरील नफा किंवा इतर उत्पन्न मिळाल्यास त्या देशातील कर कायद्यानुसार कर लागू शकतो.

टीसीएस म्हणजे नेमके काय? परदेशात पैसे पाठविताना अनेकांना वाटते की टीसीएस म्हणजे अतिरिक्त कर भरावा लागतो. परंतु हे पूर्णपणे चुकीचे आहे. टीसीएस (स्रोतावर गोळा केलेला कर) म्हणजे बँक किंवा अधिकृत डीलर तुमच्या वतीने आगाऊ कर गोळा करतो. हा अतिरिक्त कर नसून पुढे आयकर विवरणपत्र (आयकर विवरणपत्र) भरताना त्याचा पूर्ण क्रेडिट मिळतो. जर तुमच्यावर कर देय नसेल तर ही रक्कम परत (परतावा) देखील मिळू शकते.



टीसीएस कधी लागू होतो? सध्याच्या नियमांनुसार एका आर्थिक वर्षात एलआरएस अंतर्गत एकूण रुपये १० लाखांपर्यंत परदेशात पैसे पाठवल्यास टीसीएस लागत नाही. मात्र १० लाखांपेक्षा जास्त रक्कम पाठविल्यास, त्या व्यवहाराच्या स्वरूपानुसार लागू असलेल्या दराने टीसीएस आकारला जातो.

**शिक्षणासाठी पैसे पाठविताना** : जर मुलाच्या किंवा मुलीच्या परदेशातील शिक्षणासाठी पैसे पाठविले जात असतील तर शिक्षणाशी संबंधित व्यवहारांवर आयकर कायद्यात विशेष तरतुदी आहेत. काही प्रकरणांमध्ये (शिक्षण कर्जाद्वारे) रक्कम पाठविल्यास टीसीएसचा दर सवलतीचा असू शकतो. राहणीमानासाठी पैसे पाठविताना भाडे, जेवण, होस्टेल, दैनंदिन खर्च किंवा इतर देखभालीसाठी पाठविलेली रक्कम देखील एलआरएस अंतर्गतच येते. जर एका आर्थिक वर्षातील एकूण रक्कम १० लाखांच्या मर्यादेपेक्षा जास्त झाली, तर टीसीएसचे नियम लागू होतात.

**भेट म्हणून पैसे पाठविल्यास** : पालकांकडून मुलाला किंवा मुलीकडे पाठविलेली रक्कम गिफ्ट म्हणून आयकरमुक्त असली, तरी एलआरएसअंतर्गत एकूण रक्कम १० लाखांपेक्षा जास्त झाल्यास टीसीएस लागू होऊ शकतो. म्हणूनच भेटवस्तू कर आणि टीसीएस या दोन पूर्णपणे वेगळ्या बाबी आहेत.

टीसीएसचे दर काय आहेत? १ एप्रिल २०२६ पासून लागू असलेल्या नियमांनुसार, एलआरएस अंतर्गत एका आर्थिक वर्षात एकूण १० लाखांपर्यंत परदेशात रक्कम पाठविल्यास कोणताही टीसीएस लागू होत नाही. मात्र, १० लाखांपेक्षा जास्त रक्कम पाठविल्यास रेमिटन्सच्या उद्देशानुसार टीसीएस आकारला जातो. स्वतःच्या निधीतून परदेशातील शिक्षणासाठी रक्कम पाठविल्यास १० लाखांवरील रकमेवर २ टक्के टीसीएस लागू होतो. जर शिक्षणासाठीची रक्कम निर्दिष्ट वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या शैक्षणिक कर्जातून पाठविली जात असेल, तर टीसीएस लागू होत नाही. त्याचप्रमाणे, परदेशातील वैद्यकीय उपचारासाठी पाठविलेल्या रकमेवर १० लाखांवरील भागावर २ टक्के टीसीएस आकारला जातो. मात्र, मुलगा किंवा मुलीच्या राहणीमानाचा खर्च, देखभाल, भेट , गुंतवणूक किंवा इतर सर्वसाधारण एलआरएस व्यवहारांसाठी १० लाखांवरील रकमेवर २० टक्के टीसीएस लागू होतो. परदेशी टूर पॅकेज खरेदी केल्यास संपूर्ण रकमेवर २ टक्के टीसीएस आकारला जातो. येथे एक बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे की १० लाखांची मर्यादा ही एका आर्थिक वर्षात एलआरएसअंतर्गत केलेल्या सर्व परदेशी रेमिटन्सची एकत्रित मर्यादा आहे. तसेच, टीसीएस हा अतिरिक्त कर नसून आगाऊ कर संकलन आहे. आयकर विवरणपत्र भरताना या टीसीएसचा पूर्ण कर म्हणून लाभ मिळतो आणि कर देय नसल्यास संबंधित रक्कम परताव्याच्या स्वरूपातही मिळू शकते.

**टीसीएसची रक्कम परत मिळते का?**

होय. ज्या व्यक्तीच्या पॅनवरून पैसे पाठविले जातात, त्या व्यक्तीला -

आयकर भरताना टीसीएसचा क्रेडिट मिळतो, अंतिम करातून समायोजन करता येते, किंवा कर देय नसल्यास परतावा मिळतो.

**पैसे पाठविताना कोणती कागदपत्रे आवश्यक असतात?**

सामान्यतः बँक खालील कागदपत्रे मागते - पॅन कार्ड, फॉर्म ए २

एलआरएस घोषणा, शिक्षणासाठी प्रवेशपत्र, फीची पावती, पासपोर्ट, व्हिसा (लागू असल्यास), केवायसी (कागदपत्रे)

उदाहरण : समजा एका आर्थिक वर्षात पालकांनी -

शिक्षण शुल्कासाठी ८ लाख, राहणीमानासाठी ५ लाख

अशी एकूण १३ लाख रक्कम परदेशात पाठविली.

एकूण रक्कम १० लाखांपेक्षा जास्त झाल्यामुळे, लागू असलेल्या नियमांनुसार अतिरिक्त रकमेवर टीसीएस आकारला जाऊ शकतो.

**लक्षात ठेवाव्यात अशा महत्त्वाच्या गोष्टी** : मुलगा किंवा मुलीला पाठविलेली रक्कम भारतात आयकरपात्र नाही. पालकांकडून मिळालेली भेट पूर्णपणे करमुक्त असते. टीसीएस म्हणजे अतिरिक्त कर नव्हे; तो फक्त आगाऊ कर संकलन आहे. पैसे पाठविताना स्वतःचा पॅन वापरणे आवश्यक आहे. बँकेची पावती, एलआरएस कागदपत्रे आणि फीची कागदपत्रे जतन करून ठेवा. वर्षभरात पाठविलेल्या एकूण रकमेवर लक्ष ठेवा.

**निष्कर्ष** : परदेशात शिक्षण किंवा नोकरी करणाऱ्या मुला-मुलींना आर्थिक मदत करणे ही आज अनेक भारतीय कुटुंबांची गरज बनली आहे. आयकर कायद्यानुसार अशा मदतीवर मुलाच्या किंवा मुलीच्या हातात कर लागत नाही. मात्र, परदेशी रक्कम पाठविताना एलआरएस आणि टीसीएसचे नियम समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य नियोजन, आवश्यक कागदपत्रे आणि आयकर विवरणपत्रामध्ये टीसीएसचा योग्य लाभ घेतल्यास अतिरिक्त आर्थिक भार न पडता परदेशात निधी पाठविणे शक्य होते. ■

९०९६३२३२५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# भाषा, गुन्हे आणि फेन्या

एखादी भाषा 'बोलण्यावरून' आणि 'वाचण्यावरून' सध्या आपल्याकडे बराच धुरळा उडाला आहे. विशिष्ट भाषा बोलण्याचा हा आग्रह आता दुराग्रह बनतो आहे. आपल्या संस्कृतीप्रमाणेच आपली भाषाही सर्वसमावेशक आहे आणि म्हणूनच कालौघात आलेले बदल स्वीकारून ती अद्ययावत होत राहिलेली आहे. आता युवा पिढीने मातृभाषेत एक नवीच बाराखडी जोडून, अलगद जेन झी भाषा अस्तित्वात आणली. पण, जागतिक इतिहासात सगळ्याच भाषांची जडणघडण कदाचित इतकी सोपी नव्हती. रशियाच्या तुरुंगात फेन्या नावाची भाषा कैद्यांनी जन्माला घातली आणि आज ती सायबर गुन्हेगारांच्या संवादाचे माध्यम बनली आहे. अभिजाततेच्या आजच्या टप्प्यावर फेन्याच्या विकासातील टप्प्यांचा वेध घेण्याचा हा प्रयत्न!

सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पार्टीचे महासचिव जोसेफ स्टॅलिन यांच्या गुलाग तुरुंगांमध्ये फेन्याचा जन्म झाला. ही सांकेतिक भाषा तुरुंगातील गार्ड्सना गोंधळात टाकण्यासाठी वापरली जात असे. फेन्याचा प्रसार होण्यामागे स्टॅलिनचा काळ आणि गुलाग व्यवस्थाच कारणीभूत ठरली. म्हणूनच ही भाषा जगातील सर्वाधिक पसरलेल्या गुप्त भाषांपैकी एक बनली. ही गुन्हेगारांची भाषा शेकडो वर्षांपासून अंडरवर्ल्डमधील लोक इतरांना गोंधळात टाकण्यासाठी, अटक टाळण्यासाठी किंवा पळवाटा शोधण्यासाठी वापरत आहेत. पूर्वी ही भाषा तुरुंगातील रक्षकांना गोंधळात टाकण्यासाठी वापरली जात होती तसेच, आता हीच भाषा इंटरनेटवर सायबर गुन्हेगार आपले हेतू लपवण्यासाठी आणि अधिकाऱ्यांना गोंधळात टाकण्यासाठी वापरत आहेत. उदाहरणार्थ, रशियन भाषेत मायकॉप म्हणजे साधारणपणे कचरा असा अर्थ होतो. पण, फेन्या भाषेत आज त्याचा अर्थ पोलिस असा घेतला जातो. एका लोकप्रिय पण वादग्रस्त सिद्धांतानुसार, या भाषेची सुरुवात ओफेनी नावाच्या रशियाभर पायी फिरून धार्मिक वस्तू विकणाऱ्यांपासून झाली. सतराव्या शतकात एका धार्मिक वादानंतर विक्रेत्यांच्या वस्तूंना धर्मविरोधी ठरवण्यात आले. त्यामुळे या भटक्या विक्रेत्यांनी संवाद साधण्यासाठी बोलण्याची गुप्त पद्धत विकसित केली. फेन्या भाषेत सुमारे १० ते २७ हजार शब्द आहेत. झारशाहीच्या अखेरच्या काळात, समाजातील सुशिक्षित आणि बुद्धिजीवी लोकांना गुन्हेगारांच्या या गुप्त जगाविषयी खूप कुतूहल, आकर्षण वाटू लागले. याच आकर्षणातून व्हॅगाबॉण्ड म्युझिक हा संगीतप्रकार लोकप्रिय झाला. १९२२ मध्ये रशियन गृहयुद्ध जिंकून सोव्हिएत संघाची स्थापना केल्यानंतर बोल्शेविकांनी तुरुंग छावण्यांचा विस्तार केला. या छावण्यांमध्ये गुन्हेगारांसोबत सामान्य लोकांनाही ठेवल्यामुळे अनेकांना फेन्या प्रत्यक्ष ऐकण्याची आणि शिकण्याची संधी मिळाली. १९५३ मध्ये सामूहिक माफी जाहीर झाल्यामुळे १० लाखांहून अधिक कैदी तुरुंगातून मुक्त झाले. हे छोटे गुन्हेगार मोठ्या संख्येने गुलागमधून बाहेर पडले आणि ते आपल्या घरी परतले. ते फेन्या भाषा आपल्यासोबत घेऊन आले. १९९१ मध्ये सोव्हिएत संघाचे विघटन होईपर्यंत, फेन्या ही भाषा लोककथेचा भाग बनून रुजली होती. गंमत म्हणजे, तुरुंगांमध्ये फेन्या भाषा बोलण्यावर बंदी होती, परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी स्वतः मात्र याच भाषेत बोलणे सुरू ठेवले. २१व्या शतकाच्या सुरुवातीला फेन्या दैनंदिन भाषेत मिसळली आणि त्याच वेळी डिजिटल क्रांतीमुळे तिचा एका नव्या क्षेत्रातही विकास झाला. त्यांच्या मुद्दामहून केलेल्या चुकीच्या स्पेलिंग्स आणि रचनांमधून पडोंकी नावाची नवी स्लँग भाषा तयार झाली. दर महिन्याला लाखो लोक ऑनलाईन ही भाषा वापरतात. त्यामुळे अनेक रशियन लोकांना ही भाषा समजते, पण त्यापैकी सगळेच गुन्हेगार नसतात. ही भाषा मुद्दाम रशियन भाषेचे संकेत मोडते. इंग्रजीमधून घेतलेले शब्दही वापरले जातात, पण त्यांचे अर्थ बदलून वेगळ्या अर्थाने वापरले जातात. जेव्हा फेन्या भाषेतील शब्द सायबर जगतात दिसतात, तेव्हा त्यामागे एक वेगळाच एकत्रित प्रभाव असू शकतो. फेन्या भाषा आणि सायबर गुन्हेगारांची बोलीभाषा मिळून एक गुंतागुंतीचे आणि समजायला कठीण असे भाषिक जाळे तयार होते. या सगळ्या पृष्ठभूमीवर आपल्याला 'तयार' मिळालेल्या समृद्ध मायमराठीची जपणूक करणेही जमणार नसेल तर... ■

९२२३७००२७७

## दखल


डॉ. हेमंत जांभेकर

# इथेनॉल मिश्रित पेट्रोल आणि तथ्य

सध्या संपूर्ण देशात इथेनॉल मिश्रित पेट्रोलसंबंधी चुकीच्या बातम्या सातत्याने येत आहेत व सामान्यजनाच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा व त्यातून देशातील नेतृत्वाची छबी बिघडविण्यासाठी अनेक मंडळी प्रयत्न करीत आहेत. वस्तुस्थिती खरंच काय आहे हे कळावे म्हणून हा लेखनप्रपंच.

हायड्रोकार्बनची सुरुवात मिथेनपासून होते. ज्याचा उपयोग सीएनजीमध्ये इंधन म्हणून करण्यात येतो. पेट्रोल हे याचेच मोठ स्वरूप आहे. ऑक्टेन म्हणजे सी८एच१८ हा घटक आपल्या पेट्रोलचा बहुतांश हिस्सा आहे. पुढे कार्बन नंबर वाढला की सी१२-सी१४ हे डिझेल म्हणून वापरले जाते.

देशातील बहुतांश इंधन आपण विदेशातून विकत घेतो. ज्यासाठी आपल्या विदेशी मुद्रा वापरण्यात येतात व देशावर आर्थिक ताण पडतो. यासाठी देशात २०१४ नंतर आपण इथेनॉल नावाचा घटक सी२एच५ओएच पेट्रोलमध्ये टाकण्यास सुरुवात केली. इथेनॉल व पेट्रोल हे सहज एकरूप होतात. त्यामुळे इंधन टाकीत एकत्र राहतात व कार किंवा स्वयंचलित वाहनाच्या कार्बोरेटर, जेथे इंधनाचे ज्वलन होते तेथे एकत्र असतात.




मी माझी हिरो होंडा स्कूटर प्रयोगासाठी वापरली व २००८ ते २०११ पर्यंत ई-५, ई-१०, ई-२० आणि ई-३५ पर्यंत प्रयोग केले. तसेच २०११ ते २०१८ पर्यंत माझी कार (मारुती ८००) ही पण ई-३० म्हणजे ३० टक्के इथेनॉल टाकून चालवली. आजही २५ वर्ष जुनी (२००१-चे पासिंग आहे) अजूनही सुस्थितीत आहे.

माझी स्कूटर किंवा कार संपूर्ण कालावधीत कधीच बंद पडली नाही किंवा खराब झाली नाही. तसेच स्कूटर (होंडाच्या) टाकीत किंवा कारच्या टाकीत कधीच पाणी जमा झाले नाही. ती कार मी अजूनही चालवत आहे. पेट्रोल व इथेनॉल ई-२०चे मिश्रणात कधीच पाणी नसते. इथेनॉल (हायग्रोस्कोपिक) पाणी शोषून घेणारे द्रव्य आहे. त्यामुळे हवेतील पाणी ओढू शकते. पण ते प्रमाण अत्यल्प असते. त्यामुळे आज होत असलेले आरोप जाणून केले जात आहेत.

ब्राझील, बँकॉक इत्यादी देशांत हे प्रयोग यशस्वी झाले आहेत. आपण आपल्या देशाची आर्थिक स्थिती यामुळे सुदृढ करीत आहोत. तसेच इथेनॉल हे उसापासून बनते. त्यामुळे येथील शेतकरी समृद्ध होत आहेत.

आजचे गढूळ वातावरण खोट्या बातम्या प्रसारित करून देशाचाच नव्हे तर शेतकऱ्यांचा पण घात करीत आहे. सोबतच इथेनॉल मिश्रित इंधन हे प्रदूषण कमी करण्यास मदत करते असे आढळून आले आहे. यातील अनेक प्रयोग देशातील प्रख्यात केंद्रासोबत मी स्वतः केले आहेत. त्यामुळे आज सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न करू नये, तसेच ज्यांना या संबंधात शंका असतील त्यांनी माझी स्कूटर किंवा कार स्वतः चालवून पाहावी व नंतर निर्णय करावा व बातम्या प्रसारित कराव्या ही विनंती. ■

## डिजिटल जागृती

सीए अभय सगदेव

# डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा

**(तुमची वैयक्तिक माहिती : डीपीडीपी कायदा प्रत्येक नागरिकासाठी का महत्त्वाचा आहे?)**

हा अगदी नेहमीसारखा दिवस होता. सकाळी राजेश डॉक्टरांकडे गेला. दुपारी त्याने मोबाईल ॲपवरून किराणा मागवला, मुलीची शाळेची फी ऑनलाईन भरली, यूपीआयद्वारे पैसे पाठवले, रेल्वेचे तिकीट आरक्षित केले आणि रात्री मित्रांशी सोशल मीडियावर संवाद साधला. दिवस संपेपर्यंत त्याने नकळत आपली वैयक्तिक माहिती अनेक संस्थांशी शेअर केली होती.

आता स्वतःलाच एक साधा प्रश्न विचारा. ही माहिती कोणाकडे गेली? ती का गोळा करण्यात आली? ती किती काळ जपून ठेवली जाणार? ती इतरांना दिली जाऊ शकते का? गरज संपल्यावर ती दुरुस्त किंवा हटविण्याची मागणी आपण करू शकतो का? या सर्व प्रश्नांच्या केंद्रस्थानी डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा, २०२३ (डीपीडीपी ॲक्ट) आहे.

आजचे जीवन डिजिटल झाले आहे. डॉक्टरांकडे नोंदणी, शाळेत प्रवेश, बँक व्यवहार, ऑनलाईन खरेदी, वीज बिल भरणे, टॅक्सी बुक करणे किंवा विमा घेणे-प्रत्येक ठिकाणी आपली वैयक्तिक माहिती वापरली जाते. डिजिटल सुविधा आपले जीवन सोपे करतात परंतु त्यासाठी आपण माहिती हाताळणाऱ्या संस्थांवर विश्वास ठेवतो. डीपीडीपी कायदा संस्थांना वैयक्तिक माहिती गोळा करण्यास मनाई करत नाही. आजच्या काळात ते शक्यही नाही. मात्र हा कायदा सांगतो की माहिती योग्य कारणासाठी गोळा करावी, ती का घेतली जाते हे स्पष्ट करावे, योग्य सुरक्षा उपायांनी तिचे संरक्षण करावे आणि तिचा जबाबदारीने वापर करावा.

सुरुवातीलाच एक महत्त्वाची गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. डीपीडीपी कायदा हा मुख्यतः डिजिटल वैयक्तिक माहितीचा कायदा आहे. तो संकेतस्थळे, मोबाईल ॲप्स, सॉफ्टवेअर, ई-मेल, इलेक्ट्रॉनिक नोंदी आणि क्लाऊड प्रणाली याद्वारे गोळा किंवा वापरल्या जाणाऱ्या वैयक्तिक माहितीला लागू होतो. एखादी माहिती प्रथम कागदावर घेतली असली, पण नंतर ती संगणक, एक्सल शीट, क्लिनिक मॅनेजमेंट सिस्टिम किंवा इतर कोणत्याही डिजिटल नोंदीमध्ये टाकली गेली, तरीही हा कायदा लागू होऊ शकतो. मात्र, पूर्णपणे कागदी स्वरूपात ठेवलेल्या आणि कधीही डिजिटल न केलेल्या फाईल्स किंवा रजिस्टरवर हा कायदा सामान्यतः थेट लागू होत नाही. तरीही अशा कागदी नोंदींबाबत इतर कायदे, व्यावसायिक गोपनीयतेची कर्तव्ये आणि संस्थेच्या जबाबदाऱ्या लागू राहू शकतात.

या लेखमालेत काही तांत्रिक संज्ञा वारंवार येतील. डाटा प्रिंसिपल (ज्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती प्रक्रिया केली जाते ती व्यक्ती), डाटा फिडीशिअरी (वैयक्तिक माहिती कोणत्या उद्देशासाठी आणि कशी वापरायची हे ठरवणारी व्यक्ती किंवा संस्था), कन्सेंट (योग्य त्या प्रसंगी माहिती प्रक्रिया करण्यासाठी दिलेली संमती) आणि नोटीस (माहिती का व कशी वापरली जाणार आहे याची पूर्वकल्पना देणारी सूचना). या सर्व संज्ञा आपण पुढील लेखांत सोप्या उदाहरणांद्वारे समजून घेऊ.

हा कायदा केवळ मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांसाठी नाही. बँका, रुग्णालये, दवाखाने, शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक, गृहनिर्माण संस्था, स्वयंसेवी संस्था आणि ऑनलाईन व्यवसाय - हे सर्व डिजिटल वैयक्तिक माहितीवर काम करतात. त्यामुळे हा कायदा प्रत्येक नागरिकाशी तसेच प्रत्येक संस्थेशी संबंधित आहे.

या लेखमालेचा उद्देश एकच आहे - कायदा सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत सांगणे. आवश्यक त्या ठिकाणी कायद्यातील तांत्रिक शब्द वापरले जातील परंतु त्यांचा सोपा अर्थ कंसात दिला जाईल. प्रत्येक लेखात आपल्या दैनंदिन जीवनातील उदाहरणे असतील.

डिजिटल गोपनीयता हा आता केवळ वकील किंवा तंत्रज्ञान तज्ज्ञांचा विषय राहिलेला नाही. स्मार्टफोन वापरणाऱ्या, यूपीआयद्वारे पैसे भरणाऱ्या, डॉक्टरांकडे जाणाऱ्या, ऑनलाईन खरेदी करणाऱ्या प्रत्येक नागरिकाशी तो संबंधित आहे. आपल्या हक्कांबरोबरच जबाबदाऱ्या समजून घेतल्या तर आपण अधिक सुरक्षित डिजिटल भविष्य घडवू शकतो.

**दैनंदिन जीवनातील डीपीडीपी** : तुम्ही दवाखान्यात जाता. स्वागत कक्षावर तुमचे नाव, मोबाईल क्रमांक, पत्ता, वय आणि ई-मेल विचारले जाते. आपण कधी विचार करता का की ही प्रत्येक माहिती का आवश्यक आहे? डीपीडीपी कायदा संस्थांनी पारदर्शकपणे माहिती मागावी आणि नागरिकांनीही माहितीचा वापर कसा होणार आहे याबाबत जागरूक राहावे, असा संदेश देतो.

**लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे** : डीपीडीपी कायदा डिजिटल सेवांना अडथळा निर्माण करण्यासाठी नसून वैयक्तिक माहितीचा जबाबदारीने वापर सुनिश्चित करण्यासाठी आहे.

- हा कायदा नागरिक आणि माहिती प्रक्रिया करणाऱ्या संस्था दोघांनाही लागू होतो.

- कायद्यातील काही मूलभूत संकल्पना समजल्या तर आपल्या हक्कांची जाणीव वाढते.

- जागरूकता ही डिजिटल गोपनीयतेच्या संरक्षणाची पहिली पायरी आहे.

**विचार करा...** : पुढच्या वेळी कोणी तुमचा मोबाईल क्रमांक, आधारची माहिती किंवा वैद्यकीय माहिती मागितली तर एक क्षण थांबा आणि स्वतःला विचारा- ही माहिती का आवश्यक आहे आणि तिचे संरक्षण कसे केले जाणार आहे? हाच प्रश्न डीपीडीपी कायद्याचा मूलभूत विचार आहे. ■

## वाचक पत्र

### अवतार मेहेर बाबांच्या १०१ व्या मौनदिनानिमित्त

प्रत्येकाच्या हृदयात सुप्त असलेले ईश्वरी प्रेमाचे बीज जागृत करण्यासाठी मेहेरबाबांनी १० जुलै १९२५ पासून महामौनास प्रारंभ केला. ३१ जानेवारी १९६९ पर्यंत अर्थात भौतिक शरीर त्यागेपर्यंत अखंड ४४ वर्षे मौन पाळले. मौन ही ईश्वराचा मूळ स्वभाव आहे. या संपूर्ण विश्वामध्ये अखंड ४४ वर्षे मौन राहून जगाला मौनामध्ये किती प्रचंड शक्ती साठविली असल्याची जाणीव करून दिली. मेहेरबाबांचे मौन सर्वार्थाने अलौकिक होते. साधक हा स्वतःकरिता आध्यात्मिक दृष्टीने मौन पाळतो. परंतु, अवतार हा संपूर्ण विश्व कल्याणार्थ मौन पाळतो. या अवतार काळात वैखरी वाणीचा उपयोग केला नाही. आता दिलेले उपदेश आचारणामध्ये आणण्याची आज गरज आहे. एका संदेशात बाबा म्हणतात, मी शिकविण्याकरिता नसून जागृत करण्याकरिता आलो आहे. भगवद्गीतेत मौन मी आहे. ज्ञानीजनामध्ये ज्ञान मी आहे. भगवान श्री कृष्णाने गीतेमध्ये मौन हे सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे संत ज्ञानेश्वर महाराज सांगतात. 'म्हणोणी माझी वैखरी मौनाचेही मौन करी.' ईश्वराला जाणण्याचा मार्ग मौनच आहे. मौन हे ऊर्जास्रोताचे भरपूर भांडार आहे. मौनास प्रमाणिकपणे सुरुवात केली तर विचाराला तिथे थाराच नसतो. प्रत्येकाने थोड्या प्रमाणात का होईना १० जुलैला अवतार मेहेरबाबांच्या दैवी आनंदाचा लाभ घ्यावा. अवतार मेहेरबाबांच्या मौन दिनानिमित्त कोटी कोटी प्रमाण. ■

**अरुण पोथे**/संयोजक, मेहेर सत्संग वर्धा

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# खासदार ओमराजे निंबाळकरांचा आवाज उद्याच्या डिपीसी बैठकीत घुमणार का?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक शनिवार, ११ जुलै रोजी दुपारी २ वाजता नियोजन भवन येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहात होईल. दरम्यान, डिपीसीमध्ये कडक आवाजाचे आणि अधिकारी अन् सत्ताधाऱ्यांना विविध प्रश्नी धारेवर धरणारे नेते म्हणून ओळख असलेले खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर हेही सत्तेत गेले असल्याने जनतेच्या विविध प्रश्नांबाबत त्यांचा आवाज आता डिपीसी बैठकीत घुमेल का? असा सवाल राजकीय वर्तुळातून चर्चिला जात आहे.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी या बैठकीसंदर्भातील परिपत्रक जारी केले आहे. बैठकीत मागील बैठकीच्या इतिवृत्तांतास व त्यावरील कार्यवाहीच्या अहवालास मान्यता देण्यात येणार आहे. धाराशिव असो वा सोलापूर जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत नेहमीच खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर हे जनतेचे प्रश्न पोटतिडकीने मांडताना दिसायचे. शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून त्यांचा सध्या सर्वत्र लौकिकही आहे. खा. ओमराजेंनी आजतागायत अनेक सामान्यांची कामे तातडीने केल्याने त्यांनी जनतेत लोकप्रियताही मिळविली आहे. मात्र त्यांनी नुकताच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने तेही आता सत्तेत गेले आहेत. त्यांचा शेती, शेतकरी, शेतमजूर, कामगार, जिल्हा प्रशासनासह इतर विविध विषयांचा सर्वांगीण अभ्यास असल्याने त्यांनी पूर्वीप्रमाणेच जनहिताच्या कामासाठी आक्रमकच राहावे. त्यांच्याकडून आता राज्य अन् केंद्र सरकारकडून विकासकामांसाठी मोठा निधी मिळून जनहिताची कामे होतील. मात्र सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत नेहमीप्रमाणे त्यांनी आवाज उठवितच राहिले पाहिजे, अशा भावनाही सर्वसामान्य नागरिकांच्या आहेत.



जिल्ह्यातील जनतेच्या विविध प्रश्नी खा. प्रणितीताई शिंदे, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आ. राजू खरे, आ. उत्तमराव जानकर, आ. अभिजित पाटील, आ. बाबासाहेब देशमुख, आ. दिलीपराव सोपल हेही आवाज उठवितात मात्र खासदार ओमराजे हे सत्तेत गेल्याने आता त्यांचा 'करारी आवाज' डिपीसी बैठकीत घुमणार का साधाळणार? अशीही चर्चा सध्या सोलापूर, धाराशिव जिल्ह्यातील राजकीय गोटातून रंगत आहे.

या बैठकीत जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना, सन २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्यास मान्यता, जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना यांच्या कामांच्या प्रारूप आराखड्यावर मान्यता दिली जाणार आहे. या बैठकीस संबंधित अधिकाऱ्यांनीच उपस्थित रहावे, अशा सूचना जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिल्या आहेत.


## ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर.

नोंदणीकृत कार्यालय : ११३-अ, सिध्देश्वर पेठ, जिल्हा परिषदेसमोर, सोलापूर - ४१३ ००१.
मुख्य कार्यालय : जी प्लॉट, प्लॉट नं.९७, श्री सिध्देश्वर मार्केट यार्ड, रविवार पेठ, सोलापूर - ४१३ ००५.
फोन : ०२१७-२७४४९३०, २७४३२७२, ८६६९९२११०४, ८६६९९२११०५
Email : bmsb.support@bms.bank.in / bmsb.ceo@bms.bank.in Website : www.bms.bank.in

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या बँकेची सन २०२५-२०२६ यावर्षाची **५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे चेअरमनसो यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दि.२५.०७.२०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता बँकेच्या बी.एम.आय.टी.कॅम्पस बेलाटी शाखा (सोलापूर-मंगळवेढा रोड) येथे** खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात येत आहे. सदर सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१) मागील दिनांक २९.०६.२०२५ रोजी झालेल्या मा. ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२०२६ सालाचा अहवाल, लेखापरीक्षीत ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.
३) सन २०२५-२०२६ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे व तो स्विकृत करणे.
४) सन २०२४-२०२५ मध्ये झालेल्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालास अनुसरून केलेली दोष दुरुस्ती माहितीस्तव व स्विकृतीसाठी.
५) मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२०२६ सालाकरीता नफा वाटणीस मंजूरी देणे.
६) सन २०२६-२०२७ साला करिता मा.संचालक मंडळाने तयार केलेले खर्च व उत्पन्नाचे अंदाजपत्रक मंजूर करणे. व सन २०२५-२०२६ सालात बजेटपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
७) बँकेचे सन २०२७-२०२८ या सालाच्या वार्षिक व्यवसाय आराखड्यास (ABP) मंजूरी देणे.
८) सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता बँकेच्या वैधानिक लेखा परिक्षणासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांची नियूक्ती करणे व मानधन ठरवणे.
९) सन २०२६-२०२७ सालाकरीता सतत व समवर्ती लेखापरिक्षक यांच्या नेमणूकीस मंजूरी देणे.
१०) संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जाची माहिती माहितीस्तव.
११) बँकेनी अहवाल सालात बँकींग व्यवसायाकरिता अधिग्रहीत केलेल्या जागा/इमारतीस कार्योत्तर मंजूरी देणे व बांधकामास परवानगी देणे.
१२) बँकेनी अहवाल सालात सभासद/संचालक व कर्मचारी यांना दिलेल्या प्रशिक्षणाबाबतची व पुढील वर्षाच्या नियोजनाबाबतची कार्यालयीन टिप्पणी माहितीस्तव व मंजूरीस्तव.
१३) सन २०२६-२७ सालाकरिता बाहेरुन कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे.
१४) वसुल भाग भांडवल खात्यातील तफावत व एमएससी बँकेचे पडताळणी पत्रकातील प्रलंबीत नोंदी निर्लेखित करणे बाबत.
१५) ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या गैरहजेरीस मान्यता देणे.
१६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

सोलापूर.
दिनांक : १०/०७/२०२६

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून
विनोद रमाकांत कुलकर्णी
व्यवस्थापक

**सूचना :**
१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर घेतली जाईल. त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) दिनांक ३१.०३.२०२६ रोजी संपलेल्या वर्षाचा बँकेचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या नोटीस बोर्डावर सर्वांच्या माहितीसाठी लावण्यात आलेला आहे.
३) दिनांक ३१.०३.२०२६ अखेरच्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकासंबंधी काही माहिती, स्पष्टीकरण विचारावयाचे असल्यास त्यांनी दिनांक २०.०७.२०२६ च्या आत बँकेच्या मुख्य कार्यालयात बँकेच्या वेळेत व्यवस्थापकांकडे लेखी कळवावे म्हणजे माहिती देणे सोईचे होईल. मुदतीनंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
४) ज्या सभासदांनी लाभांश व शेअर्स सर्टिफिकेट अद्याप नेले नाहीत त्यांनी कृपया बँकेतून घेऊन जावे.
५) ज्या सभासदांनी ३ वर्षापुर्वीचे म्हणजे सन २०२२-२३ या वर्षाचे लाभांश (डिव्हीडंड) अद्याप नेले नाही त्यांनी दि.३०.०९.२०२६ पर्यंत घेऊन जावे अन्यथा बँकेच्या पोटनियमानुसार असे लाभांश फॉरफीट करण्यात येऊन रिझर्व्ह फंडास वर्ग करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
६) सहकारी कायद्यानुसार सभासदांना शेअर्स खात्याबाबत वारस (नॉमिनी) म्हणून नांव सुचविण्याचा हक्क आहे. आपण असे नांव सुचविले नसल्यास यासंबंधीचा छापील फॉर्म बँकेकडे जमा करावा.
७) ज्या सभासदांच्या भागाची पुर्ण दर्शनी किंमत रु.१०००/- अथवा त्या पटीत जमा केलेली नाही अशा सभासदांनी यातील फरकाची रक्कम जमा करावी.
८) मा.भारतीय रिझर्व्ह बँकेने शेअर्ससह सर्व खात्यांस केवायसी कागदपत्रे फोटो, आयडीप्रुफ व अॅड्रेसप्रुफ दाखल करणे व ठरावीक कालांतराने पुन्हा सदर केवायसी कागदपत्रे दाखल करणे अनिवार्य केलेले आहे. ज्या सभासदांनी सदरप्रमाणे केवायसी कागदपत्रे सुरुवातीस दाखल व ठरावीक कालांतराने अपडेट केलेले नाहीत त्यांनी कागदपत्रे दाखल अथवा अपडेट करावीत.

स्नेह आणि विश्वास...... कुटुंबासारखा......



## जाहीर नोटीस
### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ६२/२०२६

१. प्रतिक सतिश जाधव -- **अर्जदार**
रा. सौंदरे ता. बार्शी जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील घाडगे एम आर)
विरुद्ध
२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा -- **गैरअर्जदार**
ग्रामपंचायत अधिकारी ग्रा. प. सौंदरे

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. सौंदरे ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे सौंदरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जुन २००३ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन २००३ रोजी मौजे सौंदरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

**(सही)**
**(एफ.आर.शेख)**
**तहसिलदार बार्शी**



## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंगचे काम**

निविदा नोटीस क्र. SUR-N-T-2026-27-24, दिनांक: 07.07.2026

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे खालील कामांसाठी सक्षम, नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे:-

अ.क्र.: १ कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील ''दौंड वाडी टीबीआर चे ट्रॅक नूतनीकरण काम, कुर्डुवाडी-लातूर टीबीआर आणि टर्नआऊट डीप स्क्रीनिंग शी संबंधित सिग्नलिंगचे काम. निविदा क्रमांक: SUR-N-T-2026-27-24 कामाची अंदाजीत किंमत: रु. २,१६,२२,८५१.८५ निविदा फॉर्मची किंमत: निरंक बयाणा रक्कम : रु. ४,३२,५०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने निविदा बंद होण्याचा दिनांक आणि वेळ: ०५/०८/२०२६ रोजी दुपारी १५:३० वाजल्यानंतर. सविस्तर तपशील ireps च्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. यामध्ये काही शुद्धिपत्रक/दुरुस्ती असल्यास ते केवळ वरील ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइटवरच अपलोड केले जाईल. फक्त ऑनलाइन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल, फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बिडर्सना (कंत्राटदारांना) विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट प्राप्त करावे आणि त्याची नोंदणी www.ireps.gov.in वर करावी.

बयाणा रक्कमेचा भरणा नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारला जाईल. मूळ बँक गॅरंटी ही निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याकडे बिड (निविदा) सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी प्रत्यक्ष जाऊन देणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**डीआरएम (एस अँड टी)**
**सोलापूर, मध्य रेल्वे**

३०

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.



## CHANGE IN NAME

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Patil Omprakash** HAS BEEN CHANGED TO **Omprakash Adalingappa Patil**
Resi. - Plot No.32, Jawahar Nagar, Shelgi, Solapur - 413006

**KINDLY NOTE**
**THE SAME.(1804 Dtd.06.07.2026)**



## सोलापूर महानगरपालिका सोलापूर
पत्ता- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
विभागीय कार्यालय क्र.३ , मंगळवार बाजार,सोलापूर.
email :- smczone333@gmail.com

### सोलापूर महानगरपालिका
**जाहीरप्रसिध्दीकरणाचा मसुदा**

प्र क्र ११ कीर्ती नगर भरमशेट्टी घर ते स्वामी घरापर्यंत क्रॉंकीट रस्ता करणे.
सो.म.पा संकेतस्थळ अनु.क्र.- ६३४०
वर नमूद कामाचे टेंडर सो.म.न.पा.च्या www.solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर दि :-०९-०७-२०२६ ते दि:- १७-०७-२०२६ दुपारी ०१:०० वाजेपर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

**(सही)**
**विभागीय अधिकारी**
**विभागीय कार्यालय क्र. ३**



## जाहीर प्रसिद्धीकरण
दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३१ /२०२६
नि.नं. ५

### बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात

१) राहिबाई दिगंबर काशीद, वय- ७८ वर्षे,
धंदा- वयोवृद्ध, रा. कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) श्री. दशरथ दिगंबर काशीद, वय- ४७ वर्षे, -- **अर्जदार**
धंदा- खाजगी नोकरी, रा. सुभाष नगर,
मिरज, ता. मिरज, जि. सांगली
३) श्री. प्रभाकर दिगंबर काशीद, वय- ४५ वर्षे,
धंदा- खाजगी नोकरी, रा. सदर
**विरुद्ध**
कोणी नाही -- **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल दिगंबर धर्मा काशीद हे दि. २२/०३/२०२६ रोजी धाराशिव येथे मयत झालेले आहेत. मयत दिगंबर धर्मा काशीद यांचे नावे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा बार्शी येथे बचत खाते क्र. २५०३०६७६००१ असून सदर खात्यावर र.रु. २,५९,८६२ (अक्षरी दोन लाख ऐकोणसाठ हजार आठशे बासष्ट रु.) इतकी रक्कम जमा आहे, सदरची रक्कम मिळणेकामी अर्जदार नं. १ ते ३ हे मयत दिगंबर धर्मा काशीद यांचे कायदेशीर वारस आहेत असे जाहीर होवून मिळणेकामी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार नं. १ ते ३ यांचे शिवाय मयत दिगंबर धर्मा काशीद यांचेसी इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. ७/८/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रांनिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील मयत मयत भगवान कृष्णाजी लोहार यांचे कायदेशीर वारस ठरवण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले तारीखः २५/६/२०२६

**सही/-** **सही/-**
**क.लिपिक** **सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**



## श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था, सोलापूर
### (श्री नीलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान)
१९१, साखर पेठ, सोलापूर

**वार्षिक सर्वसाधरण व आमसभा सूचना**

श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था (श्री नीलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान) १९१, साखर पेठ, सोलापूर या संस्थेची सभासदांची व समाज बांधवांची आमसभा रविवार दिनांक : २६/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. श्री नीलकंठेश्वर मल्लिकार्जुन देवस्थान, १९१, साखर पेठ येथे आयोजित केले आहे. तरी सर्व सभासदांनी व समाज बांधवांनी सभेस उपस्थित रहावे. ही विनंती.

**सभेपुढील विषय सूची -**

**विषय क्र. (१)** मागील दिनांक १३/०७/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
**विषय क्र. (२)** संस्थेचे सन २०२५-२६ सालाचे प्रमाणित लेखापरिक्षण, हिशोब पत्रके, उत्पन्न खर्च पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे.
**विषय क्र. (३)** सन २०२६-२७ सालाचे अंदाज पत्रक मंजूर करणे.
**विषय क्र. (४)** सन २०२६-२७ सालाकरीता स्थानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
**विषय क्र. (५)** आगामी श्रावण मासाचे यजमान पद व वर्षभरातील विविध उत्सव पूजाचे यजमानपद लिलावद्वारे जाहिर करणे.
**विषय क्र. (६)** दि. २५.४.२०२६ रोजीच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत ठराव क्र. ११अन्वये मंजुरी दिलेल्या प्रेसिडेंट व प्रसिध्दीप्रमुख या पदास वार्षिक सर्वसाधारण तभा आमसभेची मंजुरी घेणे.
**विषय क्र. (६)** मा. अध्यक्ष महोदय यांचे पूर्वपरवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे.

दिनांक : ०९/०७/२०२६
ठिकाण : सोलापूर

सही/- सही/-
प्रसाद पु. बिच्चल बालाजी र. मुटकिरी
सचिव अध्यक्ष
श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था, सोलापूर

**टिप :**
१) गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्धातासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही याची नोंद घ्यावी.
२) संस्थेचे हिशोब पत्रके माहितीस्तव नोटीस बोर्डावर लावलेले आहे.
३) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे आहे त्यांनी दिनांक : २२/०७/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात लेखी पत्राने कळवावे.



## जाहीर समन्स
एच.एम.पी.नं. ९५/२०२५
पु.ने.ता. ०३/०८/२०२६
नि. ९

### बार्शी येथील मे. दिवाणी न्यायालय व स्तर यांचे न्यायालयात

**प्रताप गिरीधर गायकवाड**, वय-४५ वर्षे,
धंदा-मजुरी, रा. पाथरी, ता.बार्शी, -- अर्जदार
जि. सोलापूर
**विरुद्ध**
**सौ. रेखा प्रताप गायकवाड,**
वय-३२ वर्षे, धंदा-घरकाम, द्वारा- रामलिंग -- सा.वाली
उर्फ बब्रुवान तुळशीराम लगाडे,
रा. रत्नापूर, ता. कळंब, जि. उस्मानाबाद,

ज्याअर्थी, अर्जदाराने आपणाविरुद्ध बार्शी कोर्टात प्रस्तुतचा अर्ज वैवाहिक संबंध विच्छेदन होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. आपणास वरील पत्त्यावर अनेकवेळा समन्स काढून त्याची बजावणी होत नाही. आपला सदर पत्त्यावर आढळ होत नाही आपल्या नमूद पत्त्यावर सदर प्रकरणाच्या समन्सची बजावणी डकवून करण्याकरीता प्रयत्न केला असता सदरचे समन्स घरावर डकविण्यास अडथळा केलेला असल्याने डकवून बजावणी करता आलेली नाही. आपला कायमचा पत्ता वरील पत्त्याशिवाय अर्जदाराकडे नाही.

तरी आपणास या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, हे जाहीर समन्स प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसात अथवा दि ०३/०८/२०२६ या तारखेस सदर दाव्यात आपण आपले प्रतिनिधी अथवा जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता अर्जात हजर करावा.

वरील प्रमाणे आपण अर्जात हजर न झाल्यास अर्जदाराच्या अर्जातील मागणीप्रमाणे तुमच्या विरोधात अर्जदाराच्या हक्कात अर्जाचा हुकूमनामा होईल. कळावे याची नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स आमच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि.४/७/२०२६

**सही/-**
**सहा. अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी**



## सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India
**Central Bank of India**
REGIONAL OFFICE SOLAPUR : Sai Ved Divine, Near Shivdare Arts and Commerce College, Jule Solapur, Dist.Solapur, (MH) Pin-413004
Phone No.0217-2728133 E-mail : recvsolaro@centralbank.bank.in

### ताबा नोटीस नियम ८ (१) अंतर्गत सरफेसी नियम

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ ( २००२) अंतर्गत आणि नियम ३ अन्वये सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ मधील प्राप्त अधिकारांचा वापर करून सेंट्रल बँक ऑफ इंडिया, सोलापूर शाखा येथील प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कर्जदार श्री. विकास अंबादास रोटे (कर्जदार) आणि श्रीमती प्रज्ञा विकास रोटे (सह-कर्जदार) यांना एक मागणी नोटीस दिनांक ३०.१०.२०२४ रोजी जारी केली होती. सदर नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम रु. २७,०७,६०७/- (रुपये सत्तावीस लाख सात हजार सहाशे सात मात्र) (जी दिनांक ३०.१०.२०२४ पर्यंत मुद्दल आणि अधिक व्याज व इतर शुल्काचे प्रतिनिधित्व करते) अधिक त्यापुढील व्याज आणि इतर शुल्क हे सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत भरण्याचे आवाहन कर्जदारांना करण्यात आले होते.

कर्जदार बँकेची संपूर्ण थकबाकी भरण्यास अपयशी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, खाली स्वाक्षरी करणाऱ्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना मिळालेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा आज ७ जुलै २०२६ रोजी घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये. या मालमत्तेसोबत केलेला कोणताही व्यवहार सेंट्रल बँक ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या रु. २७,०७,६०७/- (रुपये सत्तावीस लाख सात हजार सहाशे सात मात्र) (३०.१०.२०२४ पर्यंतचे मुद्दल अधिक व्याज) आणि ३१.१०.२०२४ पासून पुढील व्याज व इतर शुल्कांच्या बोजाच्या अधीन राहील.

तारण ठेवलेली मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सरफेसी कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्ता :-**
चतुःसिमेसह स्थावर मालमत्ता, जमीन आणि इमारत यांचे संपूर्ण तपशीलवार वर्णन आणि मालकी हक्काच्या दस्तऐवजाचा तपशील:

**तारण सुरक्षा : -**
सिटी सर्व्हे नंबर ८३९२/६ वरील रोटे अपार्टमेंट मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. एफ-७ असणारी सर्व मालमत्ता आणि तिचा हिस्सा, ज्याचे बांधकाम क्षेत्र ४८.७९ चौ. मीटर आहे. ज्याचा म्युनिसिपल हाऊस नं. १४५/१ ते ७ आहे. ही मालमत्ता रेल्वे लाईन्सजवळ, सोलापूर महानगरपालिका हद्दीत, सोलापूर, तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूर येथे स्थित असून तिचे मालक श्री. विकास अंबादास रोटे आणि श्रीमती प्रज्ञा विकास रोटे हे आहेत.

**फ्लॅटच्या चतुःसिमा : -**
पूर्वः फ्लॅट नं. एफ-८ | दक्षिणः रस्ता
पश्चिमः खुली जागा | उत्तरः प्रवेश रस्ता/पॅसेज

**दिनांकः-०७.०७.२०२६**
**ठिकाणः- सोलापूर**
शिक्का
**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी,**
**सेंट्रल बँक ऑफ इंडिया**



## सोलापूर महानगरपालिका सोलापूर
पत्ता- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
विभागीय कार्यालय क्र.७ , डफरीन चौक ,सोलापूर / :-

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
**विभागीय कार्यालय क्र. ७**
**पहिली जाहीरप्रसिध्दीकरण निविदा**

प्र क्र १४ ड मधील परशुराम ठाकूर घर ते इलियास चौधरी घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे.
सो.म.पा संकेतस्थळ अनु.क्र.- ६३२३
वर नमूद कामाचे टेंडर सो.म.पा.च्या www.solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर दि :-०८-०७-२०२६ ते दि:- १५-०७-२०२६ दुपारी ०१:०० वाजेपर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

**(सही)**
**विभागीय अधिकारी**
**विभागीय कार्यालय क्र.०७**



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे- वांगरवाडी हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या खरेदीपूर्व नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन :-** डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे- वांगरवाडी हद्दीतील शेतजमीन, याचा गट नं. ९५/२ याचे क्षेत्र ०५ हे. ४९ आर. + पो. ख. ०० हे. ०२ आर., याचे एकुण क्षेत्र ०५ हे. ५१ आर., आकार १८ रु. २७ पैसे ही मिळकत रियाज इलाही करमाळकर, शफीक मुसा करमाळकर, आरिफ मुसा करमाळकर, साजिद मुसा करमाळकर रा. बार्शी, व नजमा आरिफ तांबोळी, रा. पुणे यांचे सामाईक मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची वारसा हक्काने आलेली मिळकत असून, मिळकतीचे हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईट्सला त्यांचे नावाची नोंद आहे. त्यापैकी रियाज इलाही करमाळकर, शफीक मुसा करमाळकर, आरिफ मुसा करमाळकर, रा. बार्शी व नजमा आरिफ तांबोळी, रा. पुणे यांनी त्यांचे हिश्श्याचे संपुर्ण क्षेत्र म्हणजेच **पुर्व बाजूचे क्षेत्र ०४ हे. ०० आर. + पो.ख. ०० हे. ०२ आर., एकुण क्षेत्र ०४ हे. ०२ आर., याचा आकार १३ रु. ३० पैसे,** येणे प्रमाणे वर्णनाची बागायती शेतजमीन, आतील दगड-माती, झाड-झुडुपे, वगैरे तदंगभूत वस्तूंसह, मालकी, कब्जे वहिवाटीचे हक्कासह विभक्तपणे आमचे अशिलांना योग्य त्या बाजारभाव किमतीस विक्री करण्याचे ठरविले असून, त्यास साजिद मुसा करमाळकर, रा. बार्शी यांनी मान्यता दिलेली आहे व इसारादाखल आमचे अशिलांनी मिळकत धारकांना रक्कम देऊन इसार पावतीचा दस्त मिळकत धारकांनी आमचे अशिलांचे हक्कात लिहून दिलेला आहे.

२) वर नमुद मिळकत ही वहिवाटीची निर्वेध, निजोखमी व बिन-बोजाची असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलांचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी, वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क-हितसंबंध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह विधीज्ञांचे खालील नमुद पत्त्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिन-बोजाची आहे, असे समजुन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलांचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १०/०७/२०२६.

**सही/-** **सही/-**
**अशिल** **अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. प्रशांत पांडुरंग एडके**
**कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,**
**खेडकर बिल्डींग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**मो. नं. ७३८५११०१८४ / ९८२२८१६४७८**



## सोलापूर महानगरपालिका सोलापूर
विभागीय कार्यालय क्र.५, गुरुनानक चौक,
साधु वासवानी उद्यान, सोलापूर.

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
**विभागीय कार्यालय क्र.५**
**पहिली जाहीरप्रसिध्दीकरण निविदा**

प्र क्र २० ड मधील निराला दुकान ते इनामदार पोलीस घर कॉंक्रीट करणे.
सो.म.पा संकेतस्थळ अनु.क्र.६३३४- वर नमूद कामाचे टेंडर सो.म.पा.च्या www.solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर दि.०८/०७/२०२६ ते दि.१६/०७/२०२६ दुपारी ०१:०० वाजेपर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.
क. दि. ०९/०७/२०२६.

**(सही)**
**विभागीय अधिकारी**
**विभागीय कार्यालय क्र.०५**



## जाहीर प्रसिद्धीकरण
पुढील नेमली तारीखः १०/८/२०२६
दि.कि.अ.नं. ४१/२०२६
नि. ५

### बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात

१. श्रीमती रिंपी मनीष पाटील
वयः ४० वर्षे, व्यवसायः गृहिणी
स्वतःसाठी व अर्जदार नं. २ व ३ साठी)
२. प्रियाल मनीष पाटील
वयः १५ वर्षे, अल्पवयीन अ.पा.क. - अर्जदार क्र. १)
३. अद्विका मनीष पाटील -- **अर्जदार**
वयः १० वर्षे, अल्पवयीन अ.पा.क. - अर्जदार क्र. १)
सर्वजण खालील पत्त्यावर राहणारेः
प्लॉट क्र. १६३, फ्लॅट क्र. ३०३, ए विंग, तिसरा मजला,
साई सिमरन को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी,
करंजडे, सेक्टर ४ पनवेल - ४१०२०६
**विरुद्ध**
कोणी नाही. -- **सा.वाला**

ज्याअर्थी तुकडी सोलापूर पोट तुकडी तालुका करमाळा यांचे कार्यक्षेत्रातील आणि जिल्हा परिषद सोलापूर, पंचायत समिती करमाळा यांच्या हद्दीतील गाव मौजे राजुरी येथील भूमापन क्रमांक व उपविभाग (गट नं) १६७, हिस्सा नं. २, :१६७/२) यांसी क्षेत्र ०२ हे ६३ आर आकार ०३.७० पैसे पैकी अविभक्त हिस्श्यातील संपूर्ण क्षेत्र हि मिळकत यांसी चतुः सिमा पूर्वेस : मांजरगाव शिव, दक्षिणेस : गट नं १६८, पश्चिमेस : गट नं १७८ व १७९, उत्तरेस : गट नं १६४ व १६५.

वर नमूद केलेली मिळकत अज्ञान अर्जदार नं. २ व ३ यांचे अपाक आई श्रीमती रिंपी मनीष पाटील यांचे मालकी कब्जे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत असून सदर मिळकत अज्ञान अर्जदाराचे अ.पा.क. आईनी अज्ञान अर्जदाराचे भविष्यातील शिक्षण व गरजा याचा विचार करुन सदर मिळकत विक्री करणेचे ठरवले व योग्य किंमत आलेने सदर व्यवहार अज्ञानाचे हिताचा आहे तथापि, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरची कृती योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अज्ञान अर्जदाराचे वतीने तिचे पालनकर्ते आईनी म्हणजेच अर्जदार नं. १ यांनी या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी संबंधाने कोणाचे काही हरकती असल्यास वा अन्य कोणाचे काही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख १०/८/२०२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. कोर्टाचे प्रकरणी यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्धी केलेअसे. तारीखः ०८/०७/२०२६

**(सही)** **(सही)**
**कनिष्ठ लिपिक** **अधिक्षक**
**अपर जिल्हा न्यायालय, बार्शी**



# मोरोक्को एमबाप्पेला रोखू शकेल का?

**बॉस्टन, ९ जुलै**

सलग दुसऱ्या विश्वचषकात फ्रान्सचा सामना करताना ही बाब निर्णायक ठरू शकते; यावेळी हा सामना उपांत्यपूर्व फेरीच्या टप्प्यावर होत आहे. चार वर्षांपूर्वी कतारमध्ये झालेल्या उपांत्य सामन्यात फ्रान्सने २-० असा विजय मिळवून लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिना विरुद्धची अंतिम फेरी गाठली होती.

या स्पर्धेत दिदिएर देशॉम्प्स यांचा फ्रान्स संघ उत्कृष्ट खेळ करीत आहे आणि एमबाप्पेने आक्रमक फळीत चमकदार कामगिरी करीत पाच सामन्यांत सात गोल केले आहेत. यामुळे 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत तो नॉर्वेच्या एर्लिंग हॉलंडच्या बरोबरीवर आला आहे व मेस्सीपेक्षा एका गोलने मागे आहे.

'अंतिम-१६' च्या सामन्यात फ्रान्सने पॅराग्वेचा पराभव केल्यानंतर, एमबाप्पेला एका पॅराग्वेयन सिनेटरच्या अपमानास्पद वागणुकीचा सामना करावा लागला. त्या सिनेटरने फ्रान्सच्या कर्णधाराचा उल्लेख "वसाहतवादी कॅमेरूनियन" असा केला होता, ज्यावर एमबाप्पेने त्यांना "नीच" आणि "वर्णद्वेषी" असे संबोधले.



ब्राहिम डियाझ व किलियन एमबाप्पे

आता त्याचे लक्ष पुन्हा जिलेट स्टेडियमवरील सामन्याकडे असेल, जिथे विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवण्याची संधी पणाला लागली आहे.

फिफा जागतिक क्रमवारीत माजी विश्वविजेता फ्रान्स अव्वल स्थानावर आहे, तर मोरोक्को सहाव्या क्रमांकावर आहे. फ्रान्स हा अशा दोन संघांपैकी एक आहे. ज्यांनी विश्वचषक स्पर्धेतील सर्व सामने जिंकले आहेत (दुसरा संघ अर्जेंटिना आहे); या प्रवासात त्यांनी एकूण १४ गोल केले आहेत. विशेष म्हणजे, एकाही सामन्यात त्यांना पिछाडीवर पडावे लागले नाही. सेनेगलविरुद्धच्या पहिल्या सामन्यात सुरुवातीला लय मिळविण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला, मात्र शेवटच्या ३० मिनिटांत त्यांनी आक्रमक खेळ करीत ३-१ असा विजय मिळवला. त्यानंतर इराक (३-०) व नॉर्वे (४-१) संघांचा पराभव करून त्यांनी 'गट आय' मध्ये अव्वल स्थान पटकावले.

स्वीडनविरुद्धच्या 'अंतिम-३२' फेरीतील विजयात (३-०) एमबाप्पेने स्पर्धेतील त्याचे पाचवे व सहावे गोल नोंदविले. त्यानंतर, 'अंतिम-१६' मधील चुरशीच्या लढतीत पॅराग्वेविरुद्ध पेनॉल्टीद्वारे त्याने आपला सातवा गोल केला आणि संघाला १-० असा विजय मिळवून दिला.

'आफ्रिका कप ऑफ नेशन्स'च्या विजेत्या मोरोक्कोने ब्राझीलविरुद्ध १-१ अशी बरोबरी साधत स्पर्धेची सुरुवात केली; यात इस्माईल सायबारीने हवेतून मारलेला गोल विशेष चर्चेचा विषय ठरला. त्यानंतर मोरोक्कोने 'गट सी' मधील पुढील दोन सामने जिंकले. त्यांनी स्कॉटलंडविरुद्ध १-० व हैतीविरुद्ध ४-२ गोलने विजय नोंदविला व गटात दुसरे स्थान मिळवत पुढील फेरी गाठली.

### आजचा उपांत्यपूर्व सामना

**फ्रान्स वि. मोरोक्को**
**वेळ :** शुक्रवारी रात्री १.३० वाजतापासून
**स्थळ:** जिलेट स्टेडियम, बॉस्टन
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५) वर

त्यानंतर 'अंतिम- ३२' मध्ये नेदरलँड्सविरुद्धचा सामना झाला. १-१ अशा बरोबरीनंतर, बचावपटू इस्सा डियोपने ९१ व्या मिनिटाला बरोबरी साधणारा गोल करून सामना अतिरिक्त वेळेत नेला. अखेरीस पेनॉल्टी शूटआउटद्वारे निकालाचा निर्णय लागला आणि मोरोक्कोने ३-२ असा विजय मिळविला. त्यानंतर, 'अंतिम-१६' मध्ये ह्युस्टन येथे झालेल्या सामन्यात त्यांनी सह-यजमान कॅनडाचा ३-० असा पराभव करून त्यांना स्पर्धेतून बाहेर काढले; या सामन्यातील त्यांचे तिन्ही गोल उत्तरार्धात झाले होते. ◂ (वृत्तसंस्था)



अकादमीत युवकांना मार्गदर्शन करताना मुख्य प्रशिक्षक सिल्वेरिया नेडिओ

# केप वर्देच्या उदयोन्मुख खेळाडूंची मोठी स्वप्ने

**प्राया, ९ जुलै**

फिफा विश्वचषकातील नेत्रदीपक पदार्पणानंतर मायदेशी परतणाऱ्या राष्ट्रीय फुटबॉल संघाचे स्वागत करण्यासाठी केप वर्डेच्या राजधानीत हजारो चाहत्यांनी गर्दी केली होती; विमानतळावरून बाहेर पडताना खेळाडूंना चाहत्यांनी वेढा घातला. प्राया हे केप वर्दे म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या काबो वर्दे प्रजासत्ताकाची राजधानी आहे.

आमच्या या द्वीप-राष्ट्राचे खेळातील एका महाशक्तीमध्ये होणाऱ्या रूपांतराची ही केवळ सुरुवात आहे, असे केप वर्देचा अवघ्या नऊ वर्षांचा फुटबॉलपटू म्हणाला. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या देशाची एक प्रतिष्ठित प्रशिक्षण अकादमी आहे.

शक्तिशाली स्पेनविरुद्धच्या सुरुवातीच्या साखळी सामन्यातील बरोबरीपासून ते गतविजेत्या अर्जेंटिनाकडून नॉकआउट फेरीत ३-२ अशा निसटत्या फरकाने झालेल्या पराभवापर्यंत, केप वर्दे संघाने जगातील सर्वोत्तम स्ट्रायकर्सना जेरीस आणले आणि स्वतःची गोल करण्याची क्षमताही सिद्ध केली; त्यांनी लिओनेल मेस्सीच्या संघाला 'अतिरिक्त वेळे'पर्यंत झुंजायला भाग पाडले. बलाढ्य स्पेनला एकही गोल करू न देणारा गोलरक्षक वोझिन्हा जगप्रसिद्ध झाला.

पश्चिम आफ्रिकेजवळील सुमारे ५ लाख लोकसंख्या असलेल्या — आणि विश्वचषकाच्या नॉकआउट फेरीपर्यंत पोहोचलेला सर्वात कमी लोकसंख्येचा देश असलेल्या — आपल्या संघाने जगाच्या कमी अपेक्षांना खोडून काढल्याचे पाहून मला प्रचंड आनंद झाला, मला सर्वात जास्त अभिमान या गोष्टीचा वाटतो की, आमच्या राष्ट्रीय संघामुळे तरुणांमध्ये फुटबॉल खेळण्याची अधिक इच्छा निर्माण होईल, असे केप वर्दे संघाचा समर्थक रेनाटो रिबेरो म्हणाला.

**यशाचे शिखर गाठण्याचे तरुण खेळाडूंचे स्वप्न**

'केप वर्दे' संघाच्या दमदार कामगिरीची प्रेरणादायी झलक प्रैया येथील 'बोला प्रा फ्रेंटे' (अर्थः 'बॉल फॉरवर्ड' किंवा 'चेंडू पुढे') अकादमीमध्ये आधीच दिसून येत आहे. २०१० मध्ये स्थापन झालेली ही अकादमी अल्पावधीतच देशातील एक प्रमुख विकास केंद्र म्हणून नावारूपाला आली आहे.

केप वर्देमधील फुटबॉलचे भविष्य- मग ते महिलांचे असो वा पुरुषांचे अत्यंत उज्ज्वल आणि आशादायक आहे, असे अकादमीच्या आणि महिला राष्ट्रीय संघाच्या मुख्य प्रशिक्षक सिल्वेरिया नेडिओ यांनी सांगितले.

२०२६ च्या पुरुष विश्वचषक संघातील अनेक खेळाडूंसाठी ही अकादमी सुरुवातीच्या प्रशिक्षणाचे ठिकाण ठरली आहे. यामध्ये डिफेंडर जोआओ पाउलो फर्नांडिस आणि मिडफील्डर केविन पिना यांचा समावेश आहे; पिनाने उरुग्वेविरुद्धच्या साखळी सामन्यात केप वर्देसाठी विश्वचषकातील पहिला गोल नोंदविला होता. ◂ (वृत्तसंस्था)

# फ्रान्स संघ जबरदस्त लयीत

**बॉस्टन, ९ जुलै**

दिदिएर देशॉम्प्स यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रान्सचा संघ सध्या जबरदस्त लयीत आहे. यापूर्वीच्या स्पर्धांमध्ये फ्रान्स आपल्या व्यावहारिक खेळशैलीसाठी ओळखला जात असे. मात्र, आतापर्यंतचा फ्रान्सचा खेळ अधिक मुक्त आणि धोकादायक राहिला आहे. या आक्रमक फळीत अर्थातच एमबाप्पेचे स्थान अग्रगण्य आहे. त्याने आतापर्यंत सात गोल केले असून तो 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत मेस्सी आणि हॉलंड यांना टक्कर देत आहे; शिवाय त्याच्याभोवती आक्रमक खेळाडूंची एक जबरदस्त फळी आहे.

पॅराग्वेविरुद्धचा 'अंतिम-१६'चा सामना कटुता व गोंधळाने भरलेला होता व त्यात विजय मिळविण्यासाठी फ्रान्सला एमबाप्पेच्या पेनॉल्टीची गरज भासली. पॅराग्वेविरुद्धचा विजय तितकासा सहज किंवा प्रवाही नव्हता, तरीही तो प्रभावी होता. चिथावणी मिळूनही भावनिक संयम राखणे व संघाच्या उत्कृष्ट आक्रमक कौशल्यासोबतच जिद्द व चिकाटी दाखवणे, हे त्या विजयाचे वैशिष्ट्य ठरले.

मोरोक्कोविरुद्धच्या सामन्यात उस्मान डेम्बेले, ब्रॅडली बार्कोला आणि मायकल ओलिसे यांना



सराव करताना फ्रान्सचे फुटबॉलपटू

सुरुवातीच्या फळीत स्थान मिळण्याची शक्यता आहे आणि हे तिघेही उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत. ओलिसेचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे.

इतर अनेकांपैकी, हे एक असे संयोजन असेल ज्याला रोखायचे आहे. ओलिसेवर या सामन्यात निलंबनाची जोखीम असेल. त्याला शेवटच्या १६ च्या सामन्यात मिळालेल्या पिवळ्या कार्डाविरुद्ध फ्रान्स अपील करत आहे, परंतु जर ते अयशस्वी ठरले आणि बायर्न म्युनिकच्या या विंगरला आणखी एक पिवळे कार्ड मिळाले, तर तो उपांत्य फेरीसाठी अनुपलब्ध होईल. बारकोला आणि मनु कोने हे देखील बंदीपासून फक्त एक पिवळे कार्ड दूर आहेत. डेशॅम्प्स यांना खेळाडूंच्या दुखापतींची फारशी चिंता नाही. ऑरेलियन शुआमेनी दुखापतीमुळे पॅराग्वेविरुद्धचा सामना खेळू शकला नाही व त्याच्या खेळण्याबद्दल अजूनही शंका आहे. इंटरचा मार्कस थुरम देखील पोटरीच्या समस्येमुळे त्या सामन्यात खेळू शकला नव्हता, परंतु त्यानंतर तो सरावासाठी परतला आहे आणि उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

जर शुआमेनी खेळू शकला नाही, तर ॲड्रियन रॅबिओसोबत कोने मिडफिल्डमध्ये आपले स्थान कायम ठेवेल अशी अपेक्षा आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# नेमारचे भविष्य अनिश्चित

**रिओ डी जनेरियो, ९ जुलै**

ब्राझीलचे विश्वचषकातील 'अंतिम-१६' मधील आव्हान संपुष्टात आल्यानंतर, 'सँटोस' क्लबने नेमारला त्याच्या भविष्याबाबत विचार करण्यासाठी सुट्टी दिली आहे, असे वृत्त ब्राझिलियन प्रसारमाध्यमांनी दिले.

ब्राझीलसाठी सर्वाधिक गोल करणाऱ्या या खेळाडूचा 'सँटोस'सोबतचा करार संपण्यास अजून सहा महिने शिल्लक आहेत; मात्र आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेतल्यानंतर तो कोणत्याही स्तरावर खेळणे सुरू ठेवेल की नाही, याबद्दल स्थानिक प्रसारमाध्यमांनी शंका उपस्थित केली आहे.

सुट्टीच्या कालावधीनंतरच नेमारच्या 'सँटोस'मधील भविष्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे या वृत्तात म्हटले आहे. तसेच, हा आक्रमक खेळाडू आणि त्याचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा करण्यासाठी 'सँटोस' क्लब एका "संकेताची वाट पाहत" असल्याचेही 'शिन्हुआ'च्या वृत्तात नमूद केले आहे.

नेमार सध्या आपल्या कुटुंबासोबत अमेरिकेत असून त्याला किमान १० दिवसांची सुट्टी मिळाली आहे. न्यू यॉर्क-न्यू जर्सी स्टेडियमवर रविवारी नॉर्वेविरुद्ध झालेल्या सामन्यात २-१ अशा पराभवानंतर या ३४ वर्षीय खेळाडूने ब्राझीलच्या संघाकडून निवृत्ती जाहीर केली. या पराभवामुळे १९९० नंतर पहिल्यांदाच या दक्षिण अमेरिकन संघाचे विश्वचषकातील आव्हान इतक्या लवकर संपुष्टात आले. ◂ (वृत्तसंस्था)

# मोरोक्कोचा सायबरी बाहेर

**बॉस्टन, ९ जुलै**

फिफा विश्वचषक २०२६ मध्ये फ्रान्ससारख्या बलाढ्य संघाविरुद्ध होणाऱ्या महत्त्वपूर्ण उपांत्यपूर्व सामन्यापूर्वी मोरोक्कोला मोठा धक्का बसला आहे. त्यांचा प्रमुख आक्रमक खेळाडू इस्माईल सायबारी दुखापतीमुळे या सामन्यातून बाहेर पडला आहे.गुरुवारी झालेल्या सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत मोरोक्कोचे मुख्य प्रशिक्षक मोहम्मद ओहाबी यांनी सायबारीच्या अनुपस्थितीची पुष्टी केली. ओहाबी यांच्या मते, कॅनडाविरुद्धच्या 'अंतिम-१६' मधील विजयादरम्यान पायाच्या दुखापत झाल्यामुळे हा आक्रमक खेळाडू वेळेत तंदुरुस्त होऊ शकला नाही. मात्र, संघाने उपांत्य फेरीत धडक मारल्यास हा २५ वर्षीय खेळाडू तंदुरुस्त होईल, अशी आशा प्रशिक्षकांनी व्यक्त केली आहे. तो खेळण्यासाठी सज्ज नाही, पण ही त्याच्यासाठी स्पर्धेची अखेर ठरू नये अशी मला आशा आहे," असे ओहाबी यांनी सांगितले.

चालू स्पर्धेत आफ्रिकन संघासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंपैकी सायबारी एक आहे. त्याने गट फेरीतील तिन्ही सामन्यांत गोल केले होते आणि 'अंतिम-३२' मध्ये नेदरलँड्सविरुद्धच्या निर्णायक शूटआउटमध्ये पेनॉल्टीवर गोलही केला होता. ◂ (वृत्तसंस्था)

# अश्वथ एस. ९८ वा ग्रॅण्डमास्टर

## अभिजित गुप्ता पुणे बुद्धिबळ विजेता

**पुणे, ९ जुलै**

भारताचा अव्वल मानांकित ग्रॅण्डमास्टर अभिजीत गुप्ता याने येथे झालेल्या 'पुणे आंतरराष्ट्रीय ग्रॅण्डमास्टर राऊंड रॉबिन बुद्धिबळ स्पर्धेत' ७.५ गुणांसह विजेतेपद पटकावले. कन्याकुमारीचा अश्वथ एस. याने सात गुणांसह उपविजेतेपद मिळविले आणि याच कामगिरीच्या जोरावर त्याने आपला तिसरा व अंतिम 'ग्रॅण्डमास्टर नॉर्म' पूर्ण करून भारताचा ९८ वा ग्रॅण्डमास्टर होण्याचा मान मिळवला.

ग्रॅण्डमास्टर कुशाग्र मोहन याने ६.५ गुणांसह तिसरे स्थान पटकावले, तर पुण्याच्या 'फिडे मास्टर' अद्विक अग्रवाल याने पाच गुणांची कमाई करत आपला दुसरा 'आंतरराष्ट्रीय मास्टर नॉर्म' पूर्ण केला. नवव्या आणि अंतिम फेरीत, अभिजीतने श्रीलंकेचा आंतरराष्ट्रीय मास्टर एल.एम.एस.टी. डी. सिल्वा याचा पराभव करून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. अश्वथने अमेरिकेच्या फिडे मास्टर वैद्यनाथन कन्ननवर मात केली, तर



आंतरराष्ट्रीय मास्टर अक्षय बोरगावकर याने नितीश बेलुरकरवर महत्त्वपूर्ण विजय मिळवला. अश्वथ व वैद्यनाथन यांच्यातील निर्णायक सामना या फेरीतील सर्वात रोमांचक ठरला. अश्वथने अविस्मरणीय विजय नोंदवित आपले ग्रॅण्डमास्टर पद निश्चित झाले. विजेत्या अभिजीतला विजेतेपदाची ट्रॉफी आणि १ लाख रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले, तर उपविजेता अश्वथ याला ट्रॉफी आणि ७५ हजार रुपये देऊन गौरवण्यात आले. अद्विक अग्रवालला त्याचा दुसरा 'आंतरराष्ट्रीय मास्टर नॉर्म' पूर्ण केल्याबद्दल २५ हजार रुपयांचे विशेष रोख पारितोषिक देण्यात आले. ◂ (तभा वृत्तसेवा)

# दिल्लीत महाराष्ट्राचा डंका; शालेय स्पर्धेत विजेतेपदाची हॅटट्रिक

## करंडक आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे सुपूर्त

**तभा वृत्तसेवा**
**पुणे, दि. ९ जुलै-**

भारतीय शालेय स्पर्धा महासंघाच्या शालेय क्रीडा स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपदाची हॅटट्रिकचा पराक्रम महाराष्ट्राने केला आहे. विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला आहे. नुकत्याच दिल्लीत संपन्न झालेल्या भारतीय शालेय स्पर्धा महासंघाच्या



वार्षिक सर्वसाधारण सभेत महाराष्ट्राला विजेतेपदाच्या करंडकाने गौरविण्यात आले.

शालेय खेळ महासंघाचे अध्यक्ष दिपक कुमार यांच्या हस्ते उपसंचालक संजय सबनीस, उपसंचालक उदय जोशी, सहाय्यक संचालक चंद्रशेखर साखरे व क्रीडा अधिकारी अरुण पाटील यांनी राज्याचा वतीने विजेतेपदाचा करंडक स्वीकारला. याप्रसंगी देशभरातील राज्य प्रतिनिधी उपसथित होते. याबरोबरच महाराष्ट्र राज्याने शालेय आशियाई व्हॉलीबॉल स्पर्धे साठी भारतीय संघाच्या निवड चाचणीचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल ही राज्याचा गौरव करण्यात आला.

गतविजेत्या महाराष्ट्राने अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करीत ६९ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतही महाराष्ट्राने सर्वसाधारण विजेतेपदाचा पराक्रम केला आहे. हरियाणा ,दिल्ली या बलाढ्य संघांना मागे टाकून महाराष्टाने सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपदाला गवसणी घातली आहे. १८७ सुवर्ण, १६९ रौप्य, १९0कांस्य अशी एकूण ५४६ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने अव्वल स्थानाचे शिखर सर केले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राचे २५२८ क्रीडापटू सहभागी झाले होते. ४२ खेळातील १५५ क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंच्या यशाचा डंका देशभरात वाजला आहे.

पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक सेवा संचलनालय आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडें सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी यांनी सूपूर्त केला आहे. यावेळी उपसंचालक संजय सबनीस, क्रीडा अधिकारी अरुण पाटील उपस्थित होते.

# 'देख ले! इंडिया' या माहितीपटाचे सादरीकरण

## सोलापुरच्या गंगा कदम हिचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्याकडून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

भारताच्या अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या अत्यंत प्रेरणादायी आणि ऐतिहासिक प्रवासावर आधारित 'देख ले! इंडिया' या विशेष माहितीपटाचे मुंबईतील लोक भवन येथे महाराष्ट्राचे राज्यपाल महामहीम जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत सादरीकरण करण्यात आले. या माहितीपटाच्या माध्यमातून अंध महिला क्रिकेटपटूंचा संघर्ष आणि त्यांची जिद्द जगासमोर आणण्यात आली असून, यामध्ये सोलापूरची कन्या आणि भारतीय अंध महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार गंगा संभाजी कदम हिच्या विशेष प्रवासाचे व आत्मविश्वासाचे राज्यपालांनी अत्यंत गौरवपूर्ण शब्दांत कौतुक केले. यावेळी चित्रपट निर्माते मुकुंद मूर्ती, शांती मोहन उपस्थित होते, ज्यांनी या अंध महिला क्रिकेट संघाच्या उल्लेखनीय प्रवासाच्या चित्रीकरणाचे अनुभव मांडले. यावेळी संघातील प्रिया कीर आणि सुषमा पटेल यांचीही यावेळी उपस्थिती होती.

### अफाट जिद्द, मर्यादांऐवजी त्यांचे उत्कृष्ट नेतृत्व

राज्यपाल वर्मा म्हणाले की, ''दिव्यांग व्यक्तींची सर्वसमावेशकता हा आपल्या रोजच्या जगण्याचा भाग बनला पाहिजे. हा माहितीपट खेळाडूंच्या अपंगत्वावर नव्हे, तर त्यांच्यातील अफाट जिद्द, मर्यादांऐवजी त्यांचे उत्कृष्ट नेतृत्व आणि परावलंबित्वाऐवजी सन्मान मिळवण्यासाठी सुरू असलेली धडपड दाखवतो.'' समाजाने दिव्यांग भगिनींना सहानुभूतीच्या नजरेतून न बघता, त्यांच्यातील क्षमता, सन्मान आणि सकारात्मकतेच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

**स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक मुलीची गोष्ट**

माहितीपटाच्या सादरीकरणानंतर राज्यपाल आणि खेळाडूंमध्ये रंगलेल्या संवादात सोलापूरची सुकन्या व संघाची उपकर्णधार गंगा संभाजी कदम हिने आपले मनोगत व्यक्त केले. गंगा म्हणाली, ''क्रिकेटने मला केवळ आत्मविश्वास आणि ध्येय दिले नाही, तर माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी दिली. हा माहितीपट केवळ आमची कहाणी नसून, आयुष्यातील प्रत्येक आव्हानाचा धैर्याने सामना करून काहीतरी भव्य साध्य करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक मुलीची गोष्ट आहे.'' पालकांनी आपल्या मुलींवर विश्वास ठेवून त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी पाठबळ द्यावे, अशी इच्छाही उपकर्णधार गंगा हिने यावेळी व्यक्त केली.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## गुंडांना जिल्हा पोलिस अधीक्षकांची तंबी; शांतता राखण्याची सूचना

**बार्शी दि. ९ जुलै -**
सोलापूर जिल्ह्यामध्ये दि. १९ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत दरम्यान संतांचा पालखी सोहळा व आषाढी वारी पार पडत आहे. त्यापार्श्वभुमीवर जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी जिल्ह्यातील गुंडांना याकाळात शांतता राखण्याची कडक तंबी दिली आहे. यात्रा कालावधीत बंदोबस्तासाठी सोलापूर ग्रामीण पोलिस व बाहेर जिल्ह्यातून मागणी केलेले एकूण सुमारे दहा हजार पोलिस व्यस्त राहणार आहेत. या कालावधीत सराईत गुन्हेगार, दोन व दोनपेक्षा जास्त गुन्हे दाखल असणारे गुन्हेगार तसेच हिस्ट्री सीटर व क्रिमिनल गुंडांची जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना सोलापूर येथील पोलिस मुख्यालयात येथे पाचारण केले होते. यावेळी अक्कलकोट, बार्शी, मंगळवेढा या भागातील सुमारे २७२ गुन्हेगार हजर होते. पोलिस अधीक्षकांनी त्यांना शांतता राखण्याबाबत आवाहन केले. या पुढील काळात कोणताही दखलपात्र गुन्हा होणार नाही याची दक्षता घेण्याची सूचना दिली. तसेच त्यांच्याकडून चांगल्या वर्तणुकीचा हमीपत्र लिहून घेण्यात आले आहे. यावेळी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण विजय कबाडे, पोलीस निरीक्षक सानेगुनी शाखा संजय जगताप व त्यांचे सहकारी हजर होते.



## माळशिरस बस स्थानकात मॉकड्रिल

**माळशिरस, दि. ९ जुलै -**
आषाढीवारीच्या अनुषंगाने एसटी स्टँड माळशिरस येथे दहशतवादी हल्ल्याबाबत मॉकड्रिल घेण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, डी.वाय.एस.पी. संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. दशरथ वाघमोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही रंगीत तालीम केली. माळशिरस बस स्थानकातून माळशिरस पोलिसांना बस स्थानकात संशयित व्यक्ती व संशयित बॅग असल्याचा फोन आला. तात्काळ माळशिरस पोलीस घटना स्थळी पोहचले. त्यांनी त्वरित सोलापूर कंट्रोल,आर.सी.पी, दहशतवाद विरोधी पथक यांना माहिती दिली. बॉम्बनाशक पथकास बोलावून घेण्यात आले. पथकांनी संशयित दोघांना ताब्यात घेतले.बॅग असलेल्या ठिकाणच्या प्रवाशांना बाजूला केले. बॅग ताब्यात घेऊन बॉम्बनाशक पथकाने सुरक्षित ठिकाणी नेली. एवढी मोठी पोलीस यंत्रणा पाहून नागरिकात गोंधळ उडाला.काय झाले कोणाला समजेना .बस स्थानकात बॉम्ब होता. पथकाने बॉम्ब असलेली बॅग नेली हे समजल्यावर त्यांना धीर आला. सर्व प्रकारानंतर ही रंगीत तालीम असल्याचे समजल्यावर सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला, मॉकड्रिलसाठी माळशिरस पोलिस ठाण्याकडील १ अधिकारी, १८ पोलीस अंमलदार, सुरक्षा शाखा सोलापूर ग्रामीणकडील १ अधिकारी, १ अंमलदार, एटीसी सोलापूरकडील ३ अंमलदार, क्यू आर टी पथकाचे ७ अंमलदार, आरसीपी पथकाचे १४ अंमलदार व बीडीएस पथकाचे ५ अंमलदार व १ श्वान, जिल्हा वाहतूक सोलापूर ग्रामीणकडील १ अधिकारी, ४ पोलीस अंमलदार, ग्रामीण रुग्णालय माळशिरसकडील १ सुसज्ज ॲम्ब्युलन्स व नगरपंचायत माळशिरसकडील फायर ब्रिगेडचे १ वाहन उपस्थित होते.

## मंथन स्पर्धा परीक्षेचा रविवारी केंद्रस्तरीय पारितोषिक वितरण समारंभ

**सांगोला, दि.९ जुलै -**
मंथन स्पर्धा परीक्षेचा केंद्रस्तरीय पारितोषिक वितरण सोहळा रविवार दि.१२ जुलै रोजी सकाळी १० वाजता सदानंद मल्टीपर्पज हॉल, मिरज रोड, सांगोला येथे पार पडणार असल्याची माहिती शालेय स्पर्धा परीक्षा समन्वयक समाधान केदार यांनी दिली. सदर सोहळा सोलापूर जि.प.चे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या अध्यक्षतेखाली व सूर्योदय परिवाराचे अनिल इंगवले, पोलीस उपनिरीक्षक संदीप गुरव, माजी नगरसेवक गजानन भाकरे, पो.सचिन काळेल, लायन्स क्लबचे प्रशांत रायचुरे यांच्याहस्ते तर केंद्रप्रमुख मिथुन सोडळ, विजयसिंह घाडगे, हेमंत निळकंठ, राहुल चंदनशिवे, ज्ञानेश्वर करांडे, नितीन माळी, बाबुराव घाडगे व रुबाब ॲकॅडमीचे संचालक दीपक गोडसे यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे, असे आवाहन मंथन बुक स्टॉलच्या संचालिका प्रियांका केदार यांनी केले आहे.

## 'सह्याद्री'त थेट द्वितीय वर्ष बी. फार्मसीसाठी मोफत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

**सांगोला, दि.९ जुलै -**
सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे थेट द्वितीय वर्ष बी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया अर्ज सुविधा केंद्र म्हणून महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळाल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले यांनी दिली. सुविधा केंद्रामध्ये विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व मूळ कागदपत्रे पडताळणी, अर्ज निश्चिती होणार आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पालक व विद्यार्थ्यांच्या असणाऱ्या विविध शंका व अडचणी याबाबत मोफत सखोल मार्गदर्शन या महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापकांमार्फत उपलब्ध होणार आहे, असे संस्था विश्वस्त विश्वजीत इंगवले यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी प्रा.एस.पी.जोकार (७२१९५१५९९८), प्रा.एम.आय.मुजावर (९७६६१५९२९८), प्रकाश पाटील (९८८१४३३६५८), पी.एस. लोखंडे (९८२३१०७३७१) यांच्याशी संपर्क साधण्यास प्राचार्यम नोजकुमार पाटील यांनी सांगितले. केंद्रात डी.फार्मसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे थेट द्वितीय वर्ष बी.फार्मसी पदवी प्रवेशकरिता ऑनलाईन अर्ज दि.९ ते १९ जुलै दरम्यान स्वीकारले जातील.

# उजनी धरणातील जैवविविधता व उपजिविकेसाठी 'मित्रा'कडून १६ कोटींचा निधी

मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**
उजनी धरणातील जैवविविधता संवर्धन तसेच परिसरातील स्थानिकांच्या उपजीविकेसाठी 'मित्रा' संस्थेकडून १६ कोटी रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून देणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित उजनी धरणातील विविध प्रश्नांवरील आढावा बैठकीत श्री. परदेशी बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, वनविभागाचे रेंज ऑफिसर रोहित कुमार गारगडे, बीएचएनएस ट्रस्टचे डॉक्टर उन्मेश काटवटे, मत्स्य व्यवसायिक भरत मालव तसेच मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री. परदेशी पुढे म्हणाले की, उजनी धरणात आफ्रिकन कॅट फिश माझ्यमुळे मोठ्या प्रमाणावर स्थानिक माशांच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. मंगुर, सकर माउत यासारख्या कॅटफुश मुळे उजनी धरणातील जैवविविधतेला धोका निर्माण झालेला आहे. कॅट फिश खाण्यास हानिकारक आहेत, तसेच त्यामुळे कॅन्सर सारख्या गंभीर आजाराचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढू शकतो त्यामुळे अशा आफ्रिकन कॅट फिश माशांच्या बीज उत्पादन करण्यास बंदी घातलेली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन तसेच मत्स्य व्यवसाय विभागाने स्थानिक माशांच्या बीज उत्पादनास प्रोत्साहन देण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच उजनी धरण क्षेत्रातील मासेमारी करणाऱ्या नागरिकांचे प्रबोधन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

उजनी जलाशयातील जैवविविधता संवर्धनासाठी मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल. तसेच स्थानिक माशांच्या बीज उत्पादनास प्रोत्साहन देण्याबरोबरच स्थानिक मासेमारी करणाऱ्या नागरिकांना बंदी असलेल्या आफ्रिकन कॅट फिश चे उत्पादन घेऊ नये याबाबत प्रबोधन केले जाईल, असे मत्स्य व्यवसाय विकास विभागाच्या आयुक्त प्रेरणा देशभ्रतार यांनी म्हटले.

उजनी धरणातील जैवविविधता टिकवण्यासाठी प्रशासनाच्या वतीने उचित कार्यवाही करण्यात येईल. तर १६ कोटींच्या निधीतून' स्थानिक माशांच्या संवर्धन व प्रजनन केंद्रांसह मच्छीमारांच्या उपजीविकेशी संबंधित प्रकल्प राबवले जाणार असल्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सांगितले.

यावेळी बी एन एच एस ट्रस्टचे डॉक्टर उन्मेश काटवटे यांनी या संस्थेमार्फत उजनी धरण येथील जैवविविधता तसेच आफ्रिकन कॅट फिश व स्थानिक माशाबाबतच्या केलेल्या अभ्यासात आलेली आकडेवारी बैठकीत सादर केली.

ट्रस्टच्या वतीने मासेमारी करणाऱ्या नागरिकांचे प्रबोधन करण्यात येत असून आफ्रिकन कॅट फिश उत्पादन व पैदास करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. स्थानिक माशाच्या बीज उत्पादनास प्रोत्साहन दिले जात आहे. मागील ३० ते ४० वर्षाचा अभ्यास केला असता उजनी धरणातील स्थानिक ३० ते ३५ माशांच्या प्रजाती कायमच्या नष्ट झालेले आहेत तर ४० प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उजनी धरण परिसरात मासेमारी करणारे श्री भरत मालाव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व सकरमाऊथ माशामुळे स्थानिक माशावर मोठा प्रघात झाला असून हे मासे मासेमारीच्या जाळ्याही फाडतात तसेच स्थानिक माशांनाही खातात असे त्यांनी सांगितले.

या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे मत्स्य व्यवसाय विभागाच्या आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, पुण्यातील प्रादेशिक उपायुक्त विजय शिखरे, सोलापूर मत्स्य व्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त भीमाशंकर पाटील, मत्स्य विकास अधिकारी राजेश पाटील हे उपस्थित होते.

# कॉरिडॉरबाधितांना तिहेरी लाभ : देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ जुलै -**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्वाकांक्षी पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्प पंढरपूर नगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आज सादर करण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी कॉरिडॉरमधील बाधितांना तिहेरी लाभ मिळतील. नागरिकांचे पुर्ण समाधान झाल्याशिवाय काम होणार नाही, असे आश्वासन दिले.

नगराध्यक्ष डॉ.प्रणिता भालके, नगरसेवक आणि पालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि.९) पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्प प्राथमिक स्तरावर सादर करण्यात आला. नगरसेवकांनी प्रकल्पाबाबत विविध सूचना केल्या, मागण्या मांडल्या आणि काही शंका उपस्थित त्यांचे निरसन करुन घेतले.

एकुण सहा हेक्टरचे भूसंपादन होणार आहे. संपुर्ण प्रकल्पामध्ये ८७० इमारती ताब्यात घेऊन ५५ हजार ९३४ चौरस मीटर जागा संपादित होणार आहे. मंदिर परिसरातील ४०० घरे पाडणार आहेत. बाधितांना पुनर्वसन धोरणानुसार मोबदला आणि शंभर चौरस फुटाचे दुकान देणार आहे. चौफाळा ते महाद्वार घाटापर्यंत कॉरिडोर करणार असून विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या दोन्ही बाजूला शंभर चौरस मीटर जागा संपादित करणार आहे. घरांसाठी २० हजार रुपये चौरस फुट तर व्यवसायीक जागांसाठी ४० हजार रुपये चौरस फुट दर देणार आहे. सहा महिन्यात भूसंपादन सुरु होणार असून जागा रिकामी करण्यासाठी ७ ते १० महिन्यांचा कालावधी असेल. बांधकाम ११ ते २८ महिने, हस्तांतरण ३० महिने तर पुर्ण कॉरिडोर प्रकल्प पाच वर्षात पुर्ण होणार आहे. या प्रकल्पात एकुण निवासी बाधितांची संख्या ४६६. व्यवसायिक बाधितांची संख्या ७०० आणि भाडेकरुंची संख्या २०० च्या आसपास आहे.

### काम व त्यासाठीची आर्थिक तरतूद

नगरप्रदक्षिणा मार्गाचा विकास करण्यासाठी १६३.७४कोटी, नदी घाट सुशोभीकरण ४४८.३९कोटी, वाहनतळ व व्यापारी संकुल यासाठी ६८.४८कोटी,शहराला जोडणारे २२रस्ते १४७ कोटी, पुरातन इमारती, दुरुस्ती व संवर्धन यासाठी २०कोटी,स्वच्छता कर्मचारी आवास योजना ५६ कोटी,यमाई तलाव, पद्मावती बाग सुशोभीकरण , हिंदू स्मशानभूमी दुरुस्ती यासाठी ५५ कोटी, स्वागत कमानी(१५) ३७.५०कोटी,शाळा दुरुस्ती (१५)१५ कोटी, हेलिपॅड व रस्ते यासाठी १२७.६० कोटी, पालखी तळ विकास यासाठी १० कोटी, पालखी मार्ग सुशोभीकरणासाठी १५० कोटी असे एकूण १३८७.९१कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### कोण काय म्हणाले

हा प्रकल्प केवळ रस्त्याचे रुंदीकरण नाही. २२ रस्त्यांचे मजबुतीकरण आणि परिसराचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने राबविला जात आहे.
**संतोषकुमार देशमुख.** उपजिल्हाधिकारी.

मी देखील या प्रकल्पात बाधित होणार आहे. आमचा शाश्वत विकास कसा होणार. आम्हाला मोबदला रेडीरेकनर प्रमाणे की बाजारभावा प्रमाणे मिळणार. बाधितांना मोबदला आणि पुनर्वसनाचा प्रत्यक्ष लाभ मिळत नाही तोपर्यंत शासन पाडकाम आणि नवीन बांधकाम करणार नाही याची लेखी हमी देणार का?
**भागवत महाजन बडवे,** नगरसेवक

पंढरपूरला ८०० वर्षांहून अधिक परंपरा लाभली आहे. कॉरिडॉरमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सर्व शंकांचे समाधान झाल्यानंतरच या प्रकल्पाची अंमलबजावणी करावी.
**राहुल शिंदे-नाईक,** नगरसेवक.

मंदिर परिसरातील नागरिक अनेक वर्षापासून तेथे वास्तव्यास आहेत. त्यांच्या चौथ्या पिढीपर्यतचा वारसा या भागाशी जोडलेला आहे. यापूर्वीही देखील या भागातील अनेक जण रस्ते रुंदीकरणात बाधित झाले आहेत. त्यामुळे कॉरिडॉरमधील प्रत्येक बाधित नागरिकांचे योग्य पुनर्वसन आवश्यक आहे.
**डॉ. प्रणिता भालके,** नगराध्यक्ष



## पंढरपूर शहर पोलिसांची अवैध वाळूवर कारवाई

**१६ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ जुलै -**
येथील शहर पोलिसांनी रात्रगस्त दरम्यान पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीतील इसबावी रोड जुना अकलूज रस्त्यावर एक हायवा टिप्पर (क्र. एम एच ४५ एएक्स २३७४ )या वाहनावर कारवाई करून एकूण तीन ब्रास वाळू व हायवा टिपर असा एकूण १६ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कारवाई दरम्यान या वाहन चालक आकाश चव्हाण ( वय २२, रा.इसबावी, पंढरपूर ) याचे व गाडीमालक याचे विरुद्ध पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता बी एन एस कायदा कलम ३०३,३०५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय.मुजावर, पोलीस उपनिरीक्षक नितीन जगताप, पोलीस हवालदार नवले, पोलीस कॉन्स्टेबल, ठाकर, पाटील आणि वाघमोडे यांच्या पथकाने केली.




## उच्च ध्येयाने प्रेरित झाल्यास यश निश्चित; डॉ. कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि.९ जुलै -**
महामानवांचा आदर्श व उच्च ध्येयाने प्रेरित होऊन अभ्यास केल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी केले.

श्रीपूर येथील थोरला राजवाडा, मिलिंद नगर, मंडळाच्या वतीने चंद्रशेखर विद्यालयातील विद्यार्थ्यांना सुमारे ३५ हजार रुपयांचे दप्तर व वह्या वाटप करण्यात आल्या. यावेळी डॉ. कुलकर्णी बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अकलूज येथील डॉ. एम. के. इनामदार उपस्थित होते. यावेळी उपमुख्याध्यापक गवळी, डॉ.सुहास बनसोडे, पत्रकार बी.टी.शिवशरण, थोरला राजवाडा मंडळाचे अध्यक्ष किशोर आठवले उपस्थित होते. डॉ. इनामदार यांनी मंडळाच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

## शिवसेनेचा शनिवारी मेळावा

**अक्कलकोट, दि. ९ जुलै**
एसआयआर आढावा बैठक व अक्कलकोट मतदारसंघातील शिवसैनिकांचा मेळावा ११ जुलै रोजी सकाळी १० वाजता येथील कांतामाता विजयसिंहराजे भोसले मंगल कार्यालयात होत असल्याचे माजीमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी सांगितले. उद्योगमंत्री उदय सामंत, खा.ज्योती वाघमारे, जिल्हा संपर्कप्रमुख धर्यशील माने यांच्या प्रमुख उपस्थिती असेल. सर्वांना उपस्थितीचे आवाहन केले आहे.

# बार्शीत काढणी पश्चात तंत्रज्ञानावर कार्यशाळा

**बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे आयोजन**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ९ जुलै -**
शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा, काढणी पश्चात नासाडी कमी व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे आणि कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने बाजार समिती कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा झाली.

कार्यशाळेला ३०० हून अधिक शेतकऱ्यांनी उपस्थिती दर्शवली. उद्घाटन बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड यांच्या हस्ते केले. प्रास्ताविकात तळेगाव दाभाडेचे व्यवस्थापक रमेश घुले यांनी संस्थेच्या २० वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. भारतात दरवर्षी सुमारे ४०% फळे, भाजीपाला आणि अन्नधान्याची काढणी पश्चात नासाडी होते, असे ते म्हणाले.



डॉ. भिसे विषय तज्ञ, फलोत्पादन, कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर यांनी द्राक्ष व आंबा उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन केले. द्राक्षात घडाची प्रतवारी, बंच थिनिंग आणि गॅप फीलिंग यामुळे दर्जा सुधारतो, असे ते म्हणाले. गणेश पाटील यांनी सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान व कृषी विभागाच्या योजना सांगितल्या. ओसवाल, फळ व भाजीपाला प्रक्रिया तज्ञ, पुणे यांनी फळे आणि भाजीपाल्याची प्रक्रिया व मूल्यवर्धन या विषयावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

संतोष डोईफोडे, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे यांनी शेतकऱ्यांनी आता केवळ उत्पादनावर भर न देता काढणी पश्चात व्यवस्थापन आणि मूल्यवर्धनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तळेगाव दाभाडे मार्फत आम्ही परदेशी भाजीपाला लागवड तंत्रज्ञान, अन्न प्रक्रिया, पॅकेजिंग आणि परवाना यावर प्रशिक्षण देतो, असे सांगितले. यतिन गुंडेकर यांनी संस्थेच्या प्रयोगशाळा, प्रशिक्षण सुविधा आणि उद्योजकता विकास कार्यक्रमांची माहिती दिली.

सभापती विजय गरड यांनी शेतमालाला योग्य भाव मिळावा आणि काढणीनंतर होणारी नासाडी थांबावी यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी नेहमीच प्रयत्नशील आहे. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे यांच्या सहकार्याने आयोजित केलेली ही प्रशिक्षण कार्यशाळा त्याच दृष्टीकोनातून घेण्यात आल्याचो नमूद केले. सचिव तुकाराम जगदाळे यांनी बाजार समितीच्या वतीने आम्ही अशा उपयुक्त प्रशिक्षणांचे आयोजन पुढेही करत राहू आणि शेतकऱ्यांना तांत्रिक तसेच बाजारपेठेच्या दृष्टीने सर्वतोपरी सहकार्य करु, असे सांगितले.

कार्यशाळेनंतर शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.अशा प्रकारच्या तांत्रिक मार्गदर्शनपर कार्यशाळा भविष्यातही नियमितपणे घेण्यात याव्यात अशी मागणी केली. यावेळी बाजार समितीचे संचालक रामेश्वर पाटील, प्रविण गायकवाड, भरतेश गांधी, गजेंद्र मुकटे, सुरेश गुंड, प्रभाकर डमरे, यशवंत माने, अभिजीत कापसे, रविकांत साळुंखे, संजयकुमार माळी, नेताजी घायतिडक, अजित बारंगुळे, सतीश हनुमंते, सचिन बुरगुटे, मनिषा ताकभाते, सुमन पाटील आणि सचिव तुकाराम जगदाळे उपस्थित होते.

## महत्वाचे...

### अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेवर प्राचार्य डॉ. सोनगे यांचे उद्या मार्गदर्शन

**सोलापूर, दि. ९ जुलै-**



बारावी (विज्ञान) उत्तीर्ण विद्यार्थी तसेच त्यांच्या पालकांसाठी ''अभियांत्रिकी क्षेत्रामधील संधी आणि प्रवेश प्रक्रिया'' या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन शनिवार, ११ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे केले आहे. या चर्चासत्रात ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे 'अभियांत्रिकी शिक्षणातील विविध संधी, बदलते तंत्रज्ञान आणि करिअरच्या नव्या दिशा' याविषयी मार्गदर्शन होईल. तसेच करिअर डेव्हलपमेंट उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास एस. मेतन विद्यार्थ्यांना 'करिअर नियोजन व रोजगाराच्या विविध संधींबाबत' सविस्तर माहिती देतील. याशिवाय, प्रथम वर्ष विभागप्रमुख डॉ. एस. डी. जाधव हे अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया, केंद्रीभूत प्रवेश, आवश्यक कागदपत्रे, प्रवेशाच्या विविध फेऱ्या तसेच विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या शंकांचे निरसन करतील. बारावी (विज्ञान) उत्तीर्ण विद्यार्थी, पालक तसेच अभियांत्रिकी शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या सर्वांनी या चर्चासत्रास आवर्जून उपस्थित राहून तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे व आपल्या प्रवेश प्रक्रियेसंबंधी सर्व शंकांचे निरसन करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. सोनगे यांनी केले आहे.

### वारकऱ्यांसह पोलिसांना रेनकोट, आरोग्यसेवा व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

पंढरपूर वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध सामाजिक उपक्रमांचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. या अभियानांतर्गत सुमारे पाच लाख जीवनावश्यक वस्तू, तीन लाखांहून अधिक उपयुक्त पिशव्या, ५० हजार पावसाळी घोंगड्या, ज्येष्ठ वारकऱ्यांसाठी आधारकाठ्या तसेच मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. वारी व्यवस्थापनासाठी कार्यरत पोलिसांना रेनकोट, विशेष जॅकेट्स, स्वयंसेवकांना टी-शर्ट व टोप्यांचे वाटप तसेच हरित वारीचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण आणि कचरापेट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.हा उपक्रम फिनोलेक्स आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असून,त्यासाठी प्रकाश पी.छाब्रिया आणि रितू पी.छाब्रिया यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

### डुक्कर आडवा आल्याने दुचाकीवरून पडलेल्या इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

डुक्कर आडवा आल्याने दुचाकीवरून पडून जखमी झालेल्या तांदुळवाडीच्या वृद्ध इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी मध्यरात्री मृत्यू झाला. अर्जुन भीमराव राऊत (वय ८० वर्ष, रा. तांदुळवाडी, ता वाशी , जी धाराशिव ) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे. ते दोन जुलै रोजी रात्री दुचाकी वर मागे बसून वाशी कडून तांदुळवाडी कडे निघाले असताना अचानक दुचाकी समोर डुक्कर आडवा आला. त्यामुळे दुचाकी स्लिप होऊन खाली पडल्याने मार लागून जखमी झाले होते. त्यांना धाराशिव येथील सरकारी दवाखान्यात प्रथम उपचार करून मुलगा भाऊसाहेब याने येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा बुधवारी मध्यरात्री बारा वाजता मृत्यू झाला.

### तोल जाऊन पडलेल्या संजवाडच्या वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

घरात तोल जाऊन पडल्याने जखमी झालेल्या एका ६५ वर्षीय इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज गुरुवारी पहाटे चार वाजता मृत्यू झाला. शरणप्पा शंकरेप्पा बिराजदार ( वय ६५ वर्ष, रा. संजवाड, दक्षिण सोलापूर) असे त्या मयत इसमाचे नाव असून ते सहा जुलै रोजी संध्याकाळी घरामध्ये दारूच्या नशेमध्ये पडून जखमी झाले होते. त्यामुळे त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात मुलगा शंकरप्पा याने बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज पहाटे मृत्यू झाला.

### श्री विश्वराजा गणपती मंदिरात श्री गणेशाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठाना

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

श्री विश्वराजा गणपती मंदिर, पिठ्ठा नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर येथे श्री गणेशाचे मुर्ती प्राणप्रतिष्ठाना करण्यात आली. श्री विश्वराजा गणपती मंदिर, पिठ्ठा नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर श्री गणेश मुर्ती व श्री कुर्म मुर्ती प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रम सोमवार ६ जुलै ते बुधवार ९ जुलै या चार दिवसीय प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रम पार पडला.

सोमवार दि. ६ जुलै रोजी महोत्सवारंभ, अखंड दिपाराधना, ध्वजारोहण, श्री गणेशाराधना, पुण्याहवाचन, अंकुरारोपण, नक्षत्र मंडल, नवग्रह आदि प्रत्यादि, अष्टदिकपालक, सप्तमातृका, षोड्शमातृका, सवेतोभद्र मंडल, लिंगतोभद्र मंडल, क्षेत्रपाल मंडल, ईशान्य कलश, सहित या सर्व देवतांना आवाहन, स्थापन, पुजन आणि मुर्ती यंत्र शोधनम् सर्व यंत्राचे मुलमंत्र जप, अग्नी (स्थापना) होमहवनारंभ, महाभोग व आरती आदी कार्यक्रम झाले. मंगळवार दि. ७ जुलै रोजी नित्योउपचार पुजा, ओमहवन, महाभोग व आरती मुर्ती पंचामृताधिवास व जलाधिवास तर बुधवार दि. ८जुलै रोजी नित्योउपचार पुजा, होमहवन, मुलमंत्र आहुती, प्राणप्रतिष्ठापना, पुर्ण आहुती, महाभोग व श्रींची महाआरती व महाप्रसाद झाला. नगरसेवक प्रथमेश कोठे, नगरसेवक सतिश सिरसिल्ला, नगरसेविका उज्वला दासरी व नगरसेविका दिपिका येलदंडी आदी उपस्थित होते. गुरुवार दि. ९ जुलै रोजी नित्योउपचार पुजा व महिला भक्तांकडून १०८ जलकुंभ मिरवणुकीद्वारे श्रींना जलाभिषेक करण्यात आले. याप्रसंगी मंदिर समितीचे सर्व सभासद, कार्यकर्ते व भक्तगणांच्या सहकार्याने हा कार्यक्रम भक्तीभावाने व उत्साहाने पार पडला.

# सोलापूरच्या १३७८ कोटींच्या पाणी योजनेला गती

**▶▶ २० जुलैपूर्वी अंतिम टीपीआर सादर करा : परदेशी**

**▶▶ सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे नियोजन**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

शहराच्या भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रस्तावित १३७८ कोटी रुपयांच्या दीर्घकालीन पाणीपुरवठा योजनेला गती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री यांचे सल्लागार तथा मित्राचे प्रमुख प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत २० जुलैपूर्वी अंतिम तांत्रिक प्रकल्प अहवाल (टीपीआर) शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये निविदा प्रक्रिया सुरू करून पुढील दोन ते अडीच वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन निश्चित करण्यात आले. या बैठकीस महापौर विनायक कोंड्याल, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत अंतिम टीपीआर, जागतिक बँकेकडून प्रस्तावित कर्ज, निधी नियोजन आणि प्रशासकीय प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. टीपीआर मंजूर झाल्यानंतर नगरसेवकांच्या सहभागातून शहरातील विविध भागांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात येणार असून, त्यानंतर प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला वेग देण्यात येणार आहे.

योजनेच्या निविदा प्रक्रिया सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात सुरू करण्याचे नियोजन असून, निविदा अंतिम झाल्यानंतर कामाला तातडीने सुरुवात केली जाणार आहे. संपूर्ण प्रकल्प दोन ते अडीच वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने निश्चित केले आहे. त्यासाठी आवश्यक सर्व पूर्वतयारी वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.जागतिक बँकेकडून प्रस्तावित कर्जाबाबतही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर आर्थिक प्रक्रिया पूर्ण करून प्रकल्पाला अंतिम स्वरूप देण्याच्या दृष्टीने प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत.ही योजना पूर्ण झाल्यानंतर शहरातील जुन्या पाणीपुरवठा यंत्रणेचे आधुनिकीकरण, नवीन जलवाहिन्यांचे जाळे, जलसाठा केंद्रे आणि सक्षम वितरण व्यवस्था उभारली जाणार आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन सोलापूरकरांना दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

**सोलापूरकरांना पुरेसा पाणीपुरवठा करणे हेच प्रमुख उद्दिष्ट : महापौर विनायक कोंड्याल**

महापौर विनायक कोंड्याल म्हणाले, ''सोलापूरच्या भविष्यासाठी ही पाणीपुरवठा योजना अत्यंत महत्त्वाची आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रवीणसिंह परदेशी यांच्या सहकार्यामुळे योजनेला गती मिळाली आहे. २० जुलैपूर्वी अंतिम टीपीआर शासनाकडे सादर करून सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. सोलापूरकरांना दीर्घकालीन आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये**

- प्रकल्पाची किंमत : १३७८ कोटी रुपये
- २० जुलैपूर्वी : अंतिम टीपीआर शासनाकडे सादर
- सप्टेंबर-ऑक्टोबर : निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे नियोजन
- कालावधी : दोन ते अडीच वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट
- निधी : जागतिक बँकेच्या प्रस्तावित कर्जाचा विचार
- फायदा : आधुनिक जलवाहिन्या, जलसाठा व्यवस्था आणि दीर्घकालीन शाश्वत पाणीपुरवठा.



## शेततळ्यात पडलेल्या कोल्ह्याला मिळाले जीवदान

**वाईल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशनचे यशस्वी बचावकार्य**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

मोहोळ तालुक्यातील पोखरापूर येथील शेतकरी महेश विश्वनाथ वाघमारे यांच्या शेततळ्यात दोन दिवसांपूर्वी एक कोल्हा अपघाताने पडला होता. शेततळ्यातून बाहेर पडता न आल्याने तो तेथेच अडकून पडला होता. ही माहिती मिळताच वाईल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशन, सोलापूरचे उमेश सरगर यांना मिळताच त्यांनी संतोष धाकपाडे यांना या घटनेची माहिती दिली. WCS रेस्क्यू पथकाने त्वरित घटनास्थळी धाव घेतली.

या पथकाने आवश्यक खबरदारी घेत नियोजनबद्ध पद्धतीने रेस्क्यू मोहीम राबवून कोल्ह्याची सुखरूप सुटका केली. त्यानंतर त्याला कोणत्याही प्रकारे जखम नसल्याची त्याच्या प्रकृतीची खातरजमा करून या कोल्ह्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडून देण्यात आले. या प्रसंगी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, वन्यजीव मानवी वस्तीत अथवा संकटात आढळल्यास त्यांना कोणतीही इजा न करता त्वरित वन विभागाच्या १९२६ या टोल फ्री क्रमांकावर किंवा वन्यजीव बचाव संस्थांशी संपर्क साधावा. नागरिकांच्या जागरूकतेमुळे अशा अनेक वन्यजीवांचे प्राण वाचविणे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले. या बचाव कार्यात WCS चे अजित चौहान, सुरेश क्षीरसागर, लखन भोगे व राहुल दोरकर यांनी सहभाग घेतला.

# रद्द करा... टीईटी परीक्षा रद्द करा

## टीईटीसह अशैक्षणिक कामकाजाविरोधात शिक्षकांचा एल्गार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जुलै -**

रद्द करा... रद्द करा... टीईटी परीक्षा रद्द करा... बीएलओची नेमणूक रद्द करा... कोण म्हणतंय देत नाही, आम्हाला टीईटी आणि तुम्हाला मात्र गुवाहाटी! अशा घोषणांनी गुरुवारी सोलापूर शहर दणाणून गेले. टीईटी परीक्षा आणि मतदार यादी विशेष सघन पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेसाठी शिक्षकांवर सोपविण्यात आलेली बीएलओची जबाबदारी रद्द करण्याच्या मागणीसाठी शहर व जिल्ह्यातील हजारो शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट मोर्चा काढत सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

राज्यातील शिक्षकांवर वाढत चाललेल्या अशैक्षणिक कामांच्या निषेधार्थ आणि आम्हाला शिकवू द्या या प्रमुख मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीच्यावतीने पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाला सोलापुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चार हुतात्मा पुतळ्यापासून जिल्हा परिषदेच्या पूनम गेटपर्यंत काढण्यात आलेल्या मोर्चात हजारो शिक्षक सहभागी झाले होते. पूनम गेटवर मोर्चा आल्यानंतर मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले.

यावेळी शिक्षक नेत्यांनी सरकारवर जोरदार टीका करत, शिक्षकांकडील अशैक्षणिक कामे तातडीने रद्द करून त्यांना पूर्णवेळ अध्यापनासाठी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली. शिक्षक सहकार संघटनेचे राज्य सरचिटणीस निलेश देशमुख यांनी शिक्षकांच्या अनुभवाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व्हावा, प्रशासनाच्या इतर कामांसाठी नव्हे, असे ठामपणे सांगितले.

आंदोलनात शिक्षक समितीचे राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शामराव जवंजाळ, शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पवार, शिक्षक भारतीचे राज्याध्यक्ष नवनाथ गेंड, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष वीरभद्र यादवाड यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गुरुवारी विविध मागण्यांसाठी जिल्ह्यातील शिक्षकांनी शाळा बंद आंदोलन केले. या आंदोलनात ग्रामीण भागातील २ हजार ८२५ शाळांपैकी २ हजार ७१ शाळा बंद राहिल्या तर ७५४ शाळा सुरू होत्या. जिल्ह्यातील ८ हजार ४८८ पैकी ६ हजार ३७३ शिक्षकांनी आंदोलनात सहभाग घेतला. २ हजार ११५ शिक्षक शाळेत हजर होते. महापालिका शाळा मात्र सुरळीत सुरू होत्या. मोर्चात सहभागी व शाळेतील उपस्थित शिक्षकांचा अहवाल शासनाला सादर केला आहे. शासनाच्या आदेशानुसार योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

शिक्षकांच्या आंदोलनाची धास्ती घेऊन सरकारने शिक्षक संघटनांच्या नेत्यांशी तातडीने चर्चा केली. शालेय शिक्षण मंत्र्यांबरोबर प्राथमिक चर्चा झाली असून आता मंगळवारी पुन्हा शालेय शिक्षण मंत्री यांच्यासोबत अंतिम बैठक होणार आहे. कार्यरत शिक्षकांची टीईटीची परीक्षा स्वतंत्र घेण्यावर व येथून पुढे शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती न करण्याबाबत झालेली चर्चा ही सकारात्मक झाली आहे. याविषयी महसूल विभागाबरोबर बैठक होणार असल्याचे शिक्षक सहकार संघटनेचे राज्य सरचिटणीस नीलेश देशमुख यांनी सांगितले.

चार हुतात्मा पुतळा ते जिल्हा परिषदेचे पूनम गेट या मार्गावर काढण्यात आलेल्या मोर्चात हजारो शिक्षक सहभागी झाल्याने संपूर्ण रस्ता गर्दीने व्यापला होता. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली.

# नाला क्रमांक १ पूर्ववत करण्याचा मार्ग मोकळा

**उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती नाही**

**महापालिकेला काम सुरू ठेवण्याची मुभा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जुलै -**

होटगी रोडवरील नाला क्रमांक १ पूर्ववत करण्याच्या महापालिकेच्या निर्णयाला उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाचा दुजोरा कायम ठेवत सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे नैसर्गिक नाल्याचा प्रवाह पूर्ववत करण्यासाठी महापालिकेला आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत पुढील कामकाज सुरू ठेवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी १० ऑगस्ट रोजी असून तोपर्यंत प्रतिवादींना उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

मुलतानी बेकरी कॉर्नरपासून दक्षिण मध्य रेल्वे नाल्याच्या मिळणीपर्यंतचा नाला क्रमांक १ नैसर्गिक असल्याचे भारतीय सर्वेक्षण विभागाच्या १९७८ व २००१ च्या टोपोशीटमध्ये नमूद आहे. मात्र, लेआऊट विकासादरम्यान नाला मूळ मार्गावरून ९० अंशांनी वळवून दुसऱ्या नाल्याशी जोडल्याने वहनक्षमतेवर परिणाम झाला. सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीत नवोदयनगर, मुलतानी बेकरी परिसर, मजरेवाडी भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाल्यानंतर महापालिकेने हा विषय गंभीर मानला. टोपोशीट, भू-आकृती सर्वेक्षण, गुगल प्रतिमा, क्षेत्रीय पाहणी आणि तांत्रिक अहवालांच्या आधारे नाल्याची मूळ अलाइनमेंट निश्चित करून तो पूर्ववत करण्याचा निर्णय घेतला. हा प्रकल्प महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर १९ नाल्यांच्या योजनेतही समाविष्ट आहे. या कारवाईविरोधात नेताजी भोपळे, विलास ताकमोगे आणि मारुती ताकमोगे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र, उच्च न्यायालयाने त्या फेटाळल्या. त्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमति याचिका दाखल केली. बुधवारी न्यायमूर्ती आर. महादेवन आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस बजावत उत्तर आणि प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. मात्र, उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती किंवा जैसे थेचा आदेशास नकार दिला.

महापालिकेच्या वतीने वरिष्ठ विधिज्ञ मीनाक्षी अरोरा यांच्यासह ॲड. विश्वनाथ पाटील यांनी बाजू मांडली. याचिकाकर्त्यांतर्फे वरिष्ठ विधिज्ञ विनय नवरे यांच्यासह ॲड. सारंग आराध्ये यांनी कामकाज पाहिले.

**स्थगिती नसल्याने काय होणार?**

**नाला क्रमांक १ पूर्ववत करण्याची प्रक्रिया सुरू ठेवता येणार.**
**पूरनियंत्रण आणि नैसर्गिक जलप्रवाह सुरळीत करण्याच्या उपाययोजना सुरू राहणार**
**सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी 10 ऑगस्ट रोजी होणार.**
**तोपर्यंत प्रतिवादींकडून उत्तर व प्रतिज्ञापत्र दाखल केले जाणार.**

**स्थगिती देण्यास नकार**

सदर नोटिसा आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत बजावल्या असून सार्वजनिक हित लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशाला जैसे थे अथवा स्थगितीस नकार दिल्याचे ॲड. विश्वनाथ पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

### तीन वर्षाच्या बालकाने पिले टर्पेन ऑईल

**सोलापूर, दि.९ जुलै -**

घरात खेळताना पाणी समजून एका तीन वर्षाच्या बालकाने टर्पेन ऑइल पिल्याची घटना लोधी गल्ली येथे मंगळवारी रात्री साडेआठ वाजता घडली. शेरवान दशरथ विजापूरवाले (वय ३ वर्ष, रा. लोधी गल्ली, उत्तर सदर बाजार, सोलापूर) असे त्या बालकाचे नाव आहे. मंगळवारी रात्री घरामध्ये खेळत असताना त्याने पाणी समजून टर्पेन ऑइल पिले. त्यामुळे त्याला उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात वडील दशरथ यांनी रात्री नऊ वाजता दाखल केले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## महत्वाचे...

### महिलेचा छळ; तातडीने कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने छळ, शेतातील पिकांचे नुकसान, जीवे मारण्याच्या धमक्या देऊन मानसिक त्रास दिला जात आहे. जमिनीच्या वादातून हा त्रास सुरू असून संबंधित व्यक्तीने बेकायदेशीर गटविभाजन केल्याचाही आरोप करत या प्रकरणी तातडीने पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी अक्कलकोट तालुक्यातील उमरगे येथील अन्यायग्रस्त महिला गौराबाई बिराजदार यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. या प्रकरणी दक्षिण पोलीस ठाणे, अक्कलकोट येथे अनेक वेळा लेखी तक्रारी, तसेच ऑडिओ-व्हिडिओ पुरावे सादर करूनही आरोपीविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. २६ मे २०२६ रोजी शेतात काम करत असताना संबंधिताने जीवे मारण्याची धमकी देऊन शेतातून हाकलून लावल्याचाही आरोप त्यांनी केला.या प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करून आरोपीवर गुन्हा दाखल करावा, कुटुंबाला संरक्षण द्यावे व न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

---

### रसिक बारमध्ये बाऊन्सरकडून दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

अज्ञात कारणावरून एका बाऊन्सरने व इतरांनी मिळून दोघा जणांना मारहाण केल्याची घटना रसिक बार येथे आज बुधवारी पहाटे घडली. सुशील सुनील नंदलगावकर वय ४० वर्षे आणि किशोर नारायण शिंगे वय ४७ वर्ष दोघे राहणार वडार गल्ली बाळीवे सोलापूर अशी ती मारहाण झालेल्यांची नावे आहेत ते दोघे आज पहाटे रसिक बार येथे असताना त्यांना तेथील बॉन्सरने व इतर दोन ते तीन जणांनी मिळून मारहाण केली यात डोक्याला मार व सर्व अंगाला मुका मार लागल्याने ते दोघे उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात पहाटे अडीच वाजता दाखल झाले.

---

### गुंजेगाव येथे टिप्परला धडकून दुचाकीस्वार जागेवरच ठार

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

बहिणीला कॉलेजला सोडून प्रॅक्टिकलच्या पेपरसाठी दुचाकीवरून सोलापूरकडे जात असताना अचानक समोर थांबलेल्या टिप्परला धडकल्याने दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी होऊन ठार झाला. हा अपघात मंगळवारी सकाळच्या सुमारास गुंजेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे घडला. रेहान निजाम मुजावर (वय १९ रा. गुंजेगाव ता.दक्षिण सोलापूर. मूळ रा. वाखरी ता.पंढरपूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. तो मंगळवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास त्याची बहीण हिना हिला कंदलगाव येथील इंडियन पब्लिक स्कूल येथे सोडण्यासाठी गेला होता. त्यानंतर प्रॅक्टिकलचा पेपर असल्यामुळे तो दुचाकीवरून सोलापूरकडे निघाला होता. गुंजेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे समोरून जाणारा एमएच१३-एएक्स- ३४११ या कमांकाचा टिप्पर अचानक ब्रेक मारल्याने त्याची दुचाकी पाठीमागून धडकल्याने तो गंभीर जखमी होऊन मृत्यूमुखी पडला. अचानक टिप्पर चालकाने ब्रेक मारल्यामुळे हा अपघात घडला, अशा आशयाची फिर्याद मयत रेहानचे वडील निजाम मुजावर (रा.गुंजेगाव) यांनी मंद्रूप पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी टिप्पर चालकावर गुन्हा दाखल केला. पूढील तपास पोलिस निरीक्षक पटवारी हे करीत आहेत.

---

### एसटीच्या धडकेने पोलिस वाहनातील दोघे जखमी

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

ग्रामीण पोलिसाच्या वाहनाला पाठीमागून धडकल्याने फौजदारासह दोघेजण किरकोळ जखमी झाले. हा अपघात बोरामणी चौकाजवळ मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडला. याप्रकरणी सोलापूर तालुक्याच्या पोलिसांनी एसटीचा चालक ईश्वर तानाजी सोळुंके (रा.येणेगुर ता.निलंगा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात पोलिस शिपाई सुनील बळवंत यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. तालुका पोलिस ठाण्यातील फौजदार बागवान, पोलिस शिपाई बालाजी बांगर अशी जखमींची नावे आहेत. ते आपल्या सहकाऱ्यासोबत नाईट राउंडसाठी एमएस १३- एसी-२३१२ या पोलिस वाहनातून बोरामणीकडे निघाले होते. मंगळवारी पहाटे एक वाजेच्या सुमारास त्यांचे वाहन इंडिकेटर दाखवून बोरामणी चौकाच्या दिशेने वळत होते. त्यावेळी पाठीमागून आलेली एमएच२०-बीएल- ३३७० या क्रमांकाची एसटी बस धडकल्याने हा अपघात घडला. अपघातामधे दोघे जखमी होऊन पोलिस वाहनाच्या काचा फुटून ६० हजाराचे नुकसान झाल्याचे पो.कॉ. बळवंत यांच्या फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास सहाय्यक फौजदार अत्तार करीत आहेत.

# उड्डाणपुलासाठी केंद्र व राज्य शासनाच्या आवश्यक जागेचा ताबा त्वरित घ्या

- 'मित्रा'चे सीईओ प्रवीणसिंह परदेशी यांच्या सूचना
- खाजगी जागा भूसंपादनासाठी ९६ कोटीचा निधी खर्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

शहरातील उड्डाणपुलाचा प्रश्न मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या सर्व विभागांनी उड्डाणपुलासाठी आवश्यक असलेली जागा विनामूल्य उपलब्ध करून द्यावयाची आहे. तर केंद्र शासनाच्या विभागांना त्यांच्या मागणीनुसार आहे तसे बांधकाम इतर जागेत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने, सर्व संबंधित विभागांनी उड्डाणपुलासाठी आवश्यक असलेली जागा त्वरित प्रशासनाकडे सुपूर्द करावी, असे 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शहरातील उड्डाणपुलाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत श्री. परदेशी मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, राष्ट्रीय महामार्गाचे उपमहाव्यवस्थापक स्वप्नील कासार, विशेष भूसंपादन अधिकारी प्रवीण बास्तेवाड यांच्यासह सर्व केंद्र व राज्य शासनाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

सीईओ परदेशी पुढे म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या सर्व विभागांनी उड्डाणपुलात जाणाऱ्या त्यांच्या जागेचा ताबा त्वरित जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द करावा. राष्ट्रीय महामार्गाने उड्डाणपुलाच्या एकूण जागेपैकी ९०% जागा त्यांच्याकडे हस्तांतरित झाल्यानंतर त्वरित कामाला सुरुवात करावी. तसेच केंद्र शासनाच्या पोस्ट, बीएसएनएल व रेल्वे या विभागांच्या कंपाऊंड वॉल, गेट व इतर बांधकामे त्वरित उभी करून द्यावीत. तसेच महापालिकेने या विभागांना शासनाच्या अधिकृत बाजारमूल्यानुसार त्याच्या दुप्पट मोबदला अदा करावा, असेही त्यांनी निर्देश दिले.

त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या सर्व संबंधित विभागांनी त्वरित जागा प्रशासनाच्या ताब्यात द्यावी. राष्ट्रीय महामार्गाने राज्य परिवहन, उत्पादन शुल्क, डेअरी, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस, मेडिकल कॉलेज, जिल्हा रुग्णालय यांच्या कंपाऊंड वॉल तसेच अन्य बांधकामे उड्डाणपुलासाठी आवश्यक असतील, तर ती त्यांना इतर जागेत पुन्हा बांधून द्यावीत. तसेच वीज वितरण कंपनीचे सात रस्ता परिसरातील पूर्ण उपविभाग कार्यालय बाधित होत असल्याने, वीज वितरण कंपनीच्या इतर जागेवर त्यांना पूर्ण बांधकाम उभे करून द्यावे. यासाठी आवश्यक निधी महापालिकेने उपलब्ध करून द्यावा, अशा सूचना श्री. परदेशी यांनी दिल्या. तसेच वस्त्रोद्योग विभागाच्या जागेवरील गिरणी बंद असल्याने ही जागा त्वरित प्रशासनाने ताब्यात घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

शहरातील हा उड्डाणपूल झाल्यानंतर शहरातील वाहतूक खूपच सुरळीत होईल. तरी सर्व विभागांनी त्वरित जागा उपलब्ध करून द्यावी तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे त्वरित कार्यवाही करावी आणि विहित वेळेत हा उड्डाणपूल सोलापूरकरांसाठी उपलब्ध करावा, असे आवाहन श्री. परदेशी यांनी केले.

राष्ट्रीय महामार्गाचे उपमहाव्यवस्थापक स्वप्नील कासार यांनी उड्डाणपुलाच्या एकूण जागेपैकी ९०% जागा राष्ट्रीय महामार्गाकडे हस्तांतरित झाल्यानंतर उड्डाणपुलाच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याचे सांगितले.




### महापालिका आवश्यक निधी उपलब्ध करून देईल

शासन निर्देशांप्रमाणे बाजारमूल्यानुसार जागेचे मूल्य काढून त्याच्या दुप्पट मोबदला केंद्र शासनाच्या जागेसाठी देण्यात येणार आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या ज्या विभागांची बांधकामे या उड्डाणपुलासाठी बाधित होतील, ती बांधकामे राष्ट्रीय महामार्गाच्या माध्यमातून निर्माण करून देण्यात येतील व त्यासाठी आवश्यक निधी महापालिका उपलब्ध करून देईल.

**-डॉ. सचिन ओंबासे, महापालिका आयुक्त**

### १५ कोटीची मागणी

पुणे विभागीय आयुक्तांकडून खासगी जागेवरील निवाडा करण्याबाबतचे आदेश प्राप्त झाले आहेत. त्याप्रमाणे त्या जागेचा निवाडा घोषित करून संबंधित मिळकतदारांना भरपाई देण्याची कार्यवाही केली जाणार आहे. यासाठी विशेष भूसंपादन अधिकारी यांनी सोलापूर महापालिकेकडे १५.३३ कोटी निधीचे मागणी पत्र दिले आहे. शासनाच्या २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली राज्य शासनाची जागा विनामूल्य व आगाऊ ताब्यात घेण्यात येणार आहे.

**- एस. कार्तिकेयन, जिल्हाधिकारी**

# आदित्य नगरात दोन कुटुंबियात तुफान राडा
## परस्पर विरोधी १५ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

आदित्य नगरात दोन कुटुंबीयांमध्ये एकमेकांना हाणामारी ,धमकावणी व शिवीगाळ झाल्याची घटना सहा जुलै रोजी दुपारी घडली . दरम्यान याप्रकरणी दोन्ही कुटुंबातील एकूण १५ जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या गटातील नगनाथ गायकवाड, सुजल गायकवाड, अनिता गायकवाड, सेजल आणि पायल (सर्व रा आदित्य नगर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेली आहे आरोपींची नावे आहेत. सारिका सागर गायकवाड, (रा-से. फ्रि. कॉलनी नं २) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादी व नातेवाईक असे मिळून अरोपीच्या घरी आदित्य नगर येथे ६ जुलै रोजी दुपारी गेले होते. तेथे आरोपींनी घरी आलेल्या सर्वांना बसण्यास सांगितले व अरोपी नागनाथ गायकवाड यांने घराचे गेटला कुलुप लावले .त्यामुळे फिर्यादीची आई विठाबाई यांनी मामा अरोपीकडे विचारणा केली. तेव्हा मामाने व इतर आरोपींनी मिळून अश्लिल भाषेत शिवीगाळ करून मारहाण केल्याचे फिर्यादित म्हंटले आहे.

दुसऱ्या गटातील विठाबाई जाधव, मनिषा जाधव, मेघा जाधव, संध्या गायकवाड, कलावती गायकवाड, सारिका गायकवाड, अमृता जाधव, आकाश गायकवाड, सोमनाथ गायकवाड आणि सागर गायकवाड (सर्व राहणार सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अनिता नागनाथ गायकवाड (वय-४८ वर्षे, रा. आदित्य नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार यातील वरील अरोपी हे दि. ६ जुलै रोजी दुपारी फिर्यादीच्या घरी आले होते. आरोपींनी भूषण नगर येथील जागेच्या कारणावरून वाद करू लागले. तेव्हा फिर्यादीने पतीस फोन करून घरी बोलावून घेतले. तेव्हा आरोपींनी भूषण नगर येथील जागा व गाळा नावे कर नाहीतर ५० लाख रू दे नाहीतर तुम्हाला खल्लास करतो अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. वरील दोन्ही गुन्ह्याचा तपास फौजदार पवार हे करीत आहेत.

# कामगार चाळींचा १०० वर्षांपासूनचा प्रलंबित प्रश्न मार्गी

### अडीच टक्के रक्कम भरून रहिवासी प्रॉपर्टी नावावर होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या पालकत्वामुळे मुरारजी पेठ येथील सिव्हिल लाईन्स-रेल्वे परिसरातील ८१३ कामगार कुटुंबांच्या बी-२ (फ्रीहोल्ड) प्रश्नाला अखेर न्याय मिळाला असून, ब्रिटिशकालापासून प्रलंबित असलेला हा अत्यंत जटिल आणि संवेदनशील विषय अवघ्या वीस महिन्यांत मार्गी लागला आहे. १९८९च्या रेडीरेकनरच्या अडीच टक्के रक्कम भरून रहिवासी प्रॉपर्टी त्यांच्या नावावर होणार आहे. यामुळे या चाळीतील नागरिकांनी आपला आनंद व्यक्त केला आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या कार्यालयासमोरही जल्लोष साजरा केला.

बी २ प्रश्नाबाबत बोलताना आमदार कोठे म्हणाले की, या ऐतिहासिक निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री जयकुमार गोरे व संबंधित सर्व अधिकारी वर्गाने मला सहकार्य केले. या सर्वांमुळेच हा महत्वाचा विषय मार्गी लागला आहे.



### अशक्यप्राय, स्वप्नवत वाटणारा निर्णय

महाराष्ट्राच्या विधान भवनात देवेंद्र दादांनी पुन्हा हा विषय मांडला. याला उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या चाळी १९८९ मधील खरेदी वेळी असलेल्या रेडिरेकनर दराच्या अडीच टक्के रक्कम भरून रहिवाशांच्या नावावर करण्याची अधिकृत घोषणा केली. दोन वर्षांपूर्वीपर्यंत इथल्या कामगारांना अशक्यप्राय किंवा स्वप्नवत वाटणारा हा निर्णय आज महाराष्ट्राच्या विधानमंडळात घेण्यात आला.

**- गुरुशांत धुत्तरगांवकर, माजी नगरसेवक**

### अनेक कुटुंबांना दिलासा

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले ह्या उक्तीप्रमाणे देवेंद्र दादांनी समस्त सोलापूरकरांना दिलेला एकन एक शब्द खरा करून दाखवला. राजकारणात दिलेला शब्द न पाळणे म्हणजे राजकारण अस समीकरण कित्येक वर्ष ह्या देशाने पाहिलं आहे परंतु ह्या समीकरणाला फाटा देत राजकारण हे केवळ अर्थकारण नसून ते खरोखरीच समाजकारण आहे हे दोन्ही देवेंद्र यांनी आणि बावनकुळे यांनी दाखवून दिले. यामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला.

**- श्रीनिवास देशपांडे, स्थानिक रहिवासी.**

# डीपी प्लॅनमधील ७४ नाल्यांच्या आरक्षणाला तीव्र विरोध

### महापालिका सर्वसाधारण सभेत ठराव करणार : काळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

शहराच्या विकास आराखड्यात (डीपी प्लॅन) प्रस्तावित करण्यात आलेल्या १२० किलोमीटर लांबीच्या नवीन ७४ नाल्यांच्या आरक्षणाला नागरिकांचा तीव्र विरोध आहे. याचा मोठ्या प्रमाणात विकासाला फटका बसणार आहे. मोठ्या प्रमाणात क्षेत्र विनाकारण बाधित होणार आहे. सूचना व हरकती न मागविता केलेल्या या अतांत्रिक पद्धतीच्या आराखड्यास विरोध होत असून यासंदर्भात तातडीने येणाऱ्या महापालिका सर्वसाधारण सभेत ठराव करून तो शासनाकडे पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका सभागृह येथे नरेंद्र काळे यांनी दिली.

शहरातील नवीन ७४ नाले सूचना व शिफारशी न मागविता विकासा आराखड्यात समाविष्ट करण्यात आली आहेत या संदर्भात सभागृह येथे नरेंद्र काळे यांनी आपली सविस्तर भूमिका मांडली. यावेळी नगरसेवक अनंत जाधव उपस्थित होते. सोलापूर शहरात ७४ नाल्यांचे नियोजन करताना मॅप, लेव्हल्स व तांत्रिक निकषांचा पुरेसा विचार झालेला नसल्याचा आरोप करत, या विषयावर प्रशासनाने प्रस्ताव न आणल्यास सर्वसाधारण सभेत सभासद प्रस्ताव मांडून नाल्यांचे आरक्षण रद्द करण्याची मागणी केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### या विषयातील प्रमुख मुद्दे असे

- शहरात १२० किमी लांबीच्या नाल्यांचे प्रस्तावित आरक्षण
- ७४ नाल्यांच्या रेखांकनात तांत्रिक त्रुटी असल्याचा आरोप
- दोन्ही बाजूंना ६-६ मीटर बफर झोनमुळे ५०० एकर जमीन बाधित होईल
- दोन कोटी चौरस फूट जागेवरील विकास व कर महसूल धोक्यात
- प्रशासनाने प्रस्ताव न दिल्यास सर्वसाधारण सभेत सभासद प्रस्ताव आणणार
- जिथे आवश्यकता आहे तेथेच नाले उर्वरित ठिकाणी पुनर्सर्वेक्षणाची मागणी



शहरातील ७४ नाल्यांचे रेखांकन करताना आवश्यक तांत्रिक सर्वेक्षण झालेले दिसत नाही. अनेक ठिकाणी नाले अर्धवट असून, जिथे स्ट्रॉम ड्रेन किंवा गटाराद्वारे पावसाच्या पाण्याचा निचरा होऊ शकतो, तिथेही नाल्यांचे आरक्षण दाखविण्यात आले आहे. हे नाले बारमाही नसून केवळ पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी असल्याचा दावा त्यांनी केला. डीपी प्लॅनमध्ये नाले दाखविल्यामुळे नाल्याच्या दोन्ही बाजूंना सहा-सहा मीटर बफर झोन सोडावा लागणार आहे.

सरासरी चार मीटर रुंदीचा नाला गृहित धरला तरी जवळपास ५० फूट जागा विकासासाठी अनुपलब्ध राहणार असून, संपूर्ण शहरात सुमारे ५०० एकर म्हणजेच दोन कोटी चौरस फूट जमीन बाधित होईल, असा दावा त्यांनी केला आहे. यामुळे हजारो भूखंडधारकांचे नुकसान होईल, अनेक बांधकामांना परवानगी मिळणार नाही, महापालिकेचा भविष्यातील कर महसूल घटेल आणि शहराच्या विकासाला मोठा अडथळा निर्माण होईल, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांनी आयुष्याची पुंजी खर्च करून घेतलेले १ हजार ते २ हजार चौरस फूटांचे प्लॉटही या आरक्षणामुळे अडकण्याची शक्यता असल्याचे स्पष्ट केले.

#### पालकमंत्र्यांसह तिन्ही आमदारांशी केली चर्चा

हा विषय पालकमंत्री तसेच शहरातील तिन्ही आमदारांच्या निदर्शनास आणून दिला आहे. ज्या ठिकाणी प्रत्यक्षात नाल्यांची गरज आहे, तेथेच नाल्यांचे नियोजन करावे, उर्वरित ठिकाणी आरक्षण काढून टाकण्यासाठी पुनर्सर्वेक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाकडून प्रस्ताव न आल्यास सभासद प्रस्तावाद्वारे हा विषय सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणार असून, विशेष सभा बोलवायची की नियमित सभेतच चर्चा घ्यायची, याचा निर्णय पक्षाच्या बैठकीत घेतला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### समाज मंदिरातून सिमेंट पोती व स्टील चोरीस

**सोलापूर :** सेटलमेंट फ्रि कॉलनी नं .१ येथील एका समाज मंदिरात बांधकामासाठी ठेवलेली सिमेंट भरलेली पोती व बांधकाम साहित्य अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना आठ जुलै रोजी उघडकीस आली . दरम्यान याप्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विवेकानंद वैजिनाथ स्वामी (रा.निर्मिती गणेश प्रताप नगर रोड) यांनी फिर्याद दिली आहे. सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर एक येथील मरगु मास्तर क्रीडांगण येथे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे समाज मंदिरामध्ये उघडयावर सिमेंट पोती, बांधकाम स्टील व साहित्य ठेवलेले होते. अज्ञात चोरट्याने डाव साधून १५ जून ते ८ जुलै २०२६ दरम्यान या समाज मंदिरातील २५ हजार रुपये किमतीचे सिमेंटने भरलेली ३५ पोती व बांधकाम स्टील व साहित्य चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार जाधव हे तपास करीत आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४९७

**दुर्दर राहे पाषाणात । तया चारा कोण देत ॥**
**पक्षी, अजगर । तयां पाळी सर्वेश्वर ॥**

खरे म्हणजे मीपणा, अहंकार हा मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर असला तरी या अडसराला जवळपास सर्वच जीव कांही प्रमाणात का होईना सांभाळतात. संसारात अडकलेल्या अनेक जीवांचा मी हा एकप्रकारे प्राणच असतो. मी ला सोडून वागायचे म्हणजे आपले सर्वस्व गेले असे अनेक जीवांना वाटते. मी म्हणजे सर्वस्व म्हणणारे हे जीव खऱ्या अर्थाने खऱ्या सुख समाधानापासून दूर असतात. इतरांवर अधिकार गाजवण्यात व स्वत:ला मोठे म्हणून घेण्यात अनेक जीवांना आनंद वाटतो. मी होतो म्हणूनच हे झाले, मी आहे म्हणून हे होऊ शकले,



मी नसतो तर हे शक्यच नव्हते वगैरे वगैरे हा जीव म्हणतो. खरे म्हणजे मी म्हणजे कोण ? हेच या जीवाला समजत नाही. नाशवंत आणि पराधिन असणाऱ्या या देहाला हा जीव मी म्हणतो. या मीपेक्षा एक वेगळी शाश्वत शक्ती आहे, असे या जीवाला मान्य नसते. मी म्हणणारा हा जीवच जर सर्व कांही करतो तर मग, **दुर्दर राहे पाषाणात। तया चारा कोण देत।।** महाराजांच्या या म्हणण्याप्रमाणे पाषाणात बेडकाला पाणी, चारा कोण देते ? या प्रश्नाचे निश्चित उत्तर हे आहे की या जीवापेक्षा कोणीतरी वेगळाच पाषाणात बेडकाचे रक्षण करतो. या कोणीतरीचा शोध घेण्याचा जीवाने प्रयत्न करावा, असे सेनाजी सुचवतात. विहिर खोदताना जमीनीतून एखादा बेडूक निघतो, एखादा मोठा दगड फोडला असता त्यातून जिवंत बेडूक निघतो. ही निसर्गाची लीली समजा की भगवंताची. यावरुन आपल्यापेक्षा कोणीतरी तारणहार वेगळा आहे, असे लक्षात येते. आपण ज्या ठिकाणी जीवाची अपेक्षा करु शकत नाही, अशा ठिकाणीही अनेक जीव असल्याचे आपणालाही पहायला मिळते.

जवळपास प्रत्येकजण प्रसंगानुरुप का होईना मी मी म्हणत असतो. त्यामुळे मीपणा हा संसारात अडकलेल्या जीवाच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे, असे म्हणणे संयुक्तीक होईल. या घटकाला वगळून जगायचे म्हणजे पाण्यापासून वेगळे केलेल्या माशाप्रमाणे तडफडणे होय, असे या जीवाला वाटते. स्वत:वर कसल्याही प्रकारची सत्ता चालवता न येणारा हा जीव केवळ मीपणामुळे इतरांवर सत्ता गाजवू इच्छितो. घरातील, समाजातील बऱ्याच घटना, गोष्टी, कार्य हे जणू आपल्यावरच अवलंबून आहे किंवा आपल्यामुळेच चालू आहे असे या अहंकारी आणि अज्ञान जीवाला वाटते. मीपणाच्या अंध:कारात अडकलेल्या या जीवाला बाहेर काढण्यासाठी सेनाजींनी अत्यंत सुंदर असा दृष्टांत दिला आहे. ते म्हणतात, पक्षी, **अजगर। तयां पाळी सर्वेश्वर।।** पक्षांना, साप, अजगरांना हा जीव चारा, पाणी देत नाही, तरी ते जगतात. कारण सर्व जीवांचे रक्षण सर्वेश्वर करतो. सर्वांचा सांभाळ करणाऱ्या सर्वेश्वराला विसरून हा जीव आपणच सर्वेश्वर आहोत असे समजतो. येथेच हा जीव खऱ्या अर्थाने चुकतो. कोट्यावधी जीवाचा सांभाळ करणारा सर्वेश्वर आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे. या कोट्यावधी जीवात आपलाही समावेश आहे. याची जाण होऊन हा जीव मीतून बाहेर पडण्याची सेनाजींनी केलेली अपेक्षा रास्त आहे. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे आपणही त्यांच्या मार्गदर्शन स्वरुप पावलांवर पाय ठेऊन चालत राहीलो तर अहंकार आपोआप निघून जाऊन आनंद वाढत जाईल यात शंका नसावी. जय जय राम कृष्ण हरी।


**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. १० जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - ज्येष्ठ कृ. दशमी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- भरणी (१३.१५)**
**योग - धृती (०७.१४)**
**करण - बव (१८.५४)**
**राहू काल : शुक्रवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष :**
**१९४९: भारताचे महान क्रिकेटपटू आणि समालोचक सुनील गावसकर यांचा जन्म.**
**१९५०: प्रसिद्ध शास्त्रीय गायिका पद्मभूषण व पद्मश्री पुरस्कार विजेत्या बेगम परवीन सुलताना यांचा जन्म.**
**१९६२: जगातील पहिला व्यावसायिक दळणवळण उपग्रह 'टेलस्टार १' अंतराळात प्रक्षेपित झाला.**
**२०१४: भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना आणि नृत्यदिग्दर्शक झोहरा सहगल यांचा मृत्यू.**



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये पालक-शिक्षक सहविचार सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे पालक-शिक्षक सहविचार सभा प्र.मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली.

प्रमुख अतिथी धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, बसवराज कोरे, पालक प्रतिनिधी भारत राऊत, प्रकाश चव्हाण, कल्पना पाटील यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संगमेश्वर बिराजदार यांनी चित्रकला ग्रेड परीक्षेविषयी, आकाश खराडे यांनी आर.एस.पी.व क्रीडेविषयी परमेश्वर चांदोडे यांनी स्काऊट-गाईड विषयी, भारत राऊत व सुकेशिनी गंगौडा यांनी स्कॉलरशिप व इतर परीक्षेविषयी इ.उपक्रमाविषयी माहिती सांगितली.तसेच अमरनाथ कदारे,अनिता हौदे यांनी मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी अन्नपूर्णा जाधव,संतोष स्वामी, लक्ष्मीकांत कांबळे,सिद्धाराम यमाजी आदी पालकांनी प्रशालेतील विविध उपक्रमाचे कौतुक केले व काही सूचना सांगितल्या. या सभेस गुरुसिद्धप्पा पाटील,दत्तात्रेय अगरखेड,विद्याधर हुलगेरी, प्रतीक्षा बिडवे, प्रिया प्रसारे, सुनिता गंगौडा व पालक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. अनिता हौदे यांनी आभार मानले.

# महिला आरोग्य समित्या या समाजाच्या निरोगी भविष्यासाठी सक्षम यंत्रणा

## न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ९ जुलै-**

''महिला आरोग्य समित्या या केवळ सरकारी योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या समित्या नसून समाजाचे आरोग्य जपणाऱ्या सक्षम यंत्रणा आहेत. आपल्या परिसरातील नागरिकांपर्यंत आरोग्यविषयक माहिती पोहोचवणे, आरोग्य सेवांमधील अडचणी ओळखून त्यावर पाठपुरावा करणे आणि लोकसहभागातून आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यामध्ये महिला आरोग्य समित्या महत्त्वाची भूमिका बजावत आहेत,'' असे प्रतिपादन दिवाणी न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोलकुमार देशपांडे यांनी केले.



अनुसंधान ट्रस्टसाथी पुणे, सोलापूर महानगरपालिका आणि अस्तित्व संस्थेच्या संयुक्त विद्यमाने समाजकल्याण केंद्र, रंगभवन चौक येथे महिला आरोग्य समिती सदस्यांची दोन दिवसीय कार्यशाळा झाली. या कार्यशाळेत सोलापूर शहरातील विविध नागरी वस्त्यांमधील २०० हून अधिक महिला आरोग्य समिती सदस्या सहभागी झाल्या होत्या. यातून सोलापूर शहरातील नागरी वस्त्यांमधील आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी महिला आरोग्य समित्या सक्रियपणे कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले.

सोलापूर महानगरपालिका, अनुसंधान ट्रस्टसाथी आणि अस्तित्व संस्था यांच्या सहकार्याने शहरातील रामवाडी, विडी घरकुल, जिजामाता व दाराशा या चार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात गेल्या तीन वर्षांपासून महिला आरोग्य समिती सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमामुळे स्थानिक पातळीवर आरोग्य सेवा, जनजागृती आणि समुदाय सहभाग वाढविण्यासाठी महिलांचे प्रभावी नेतृत्व विकसित होत आहे.

कार्यशाळेत महिला आरोग्य समित्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांबरोबरच विविध शासकीय योजनांची आणि कायदेशीर हक्कांची माहिती देण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध मोफत कायदेशीर सेवांबाबत ॲड. देवयानी किणगी आणि ॲड. सरोजिनी तमशेट्टी यांनी मार्गदर्शन केले. महिला व बाल विकास विभागाच्या वन स्टॉप सेंटरच्या सेवांविषयी शुभांगी कांबळे यांनी माहिती दिली. महिलांशी संबंधित विविध कायद्यांविषयी शकुंतला भालेराव यांनी मार्गदर्शन केले, तर महात्मा फुले जनआरोग्य योजनेची माहिती पर्यवेक्षक अमोल शिंदे यांनी दिली. महिलांमध्ये वाढत्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंध, तपासणी आणि लवकर निदानाचे महत्त्व डॉ. क्षिप्रा पिंजरकर यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक अस्तित्व संस्थेचे शहाजी गडहिरे यांनी केले. यावेळी अनुसंधान ट्रस्टसाथी, पुणेचे विनोद शेंडे, रेश्मा कदम,तब्बू नगारे, पल्लवी वडणे, शिवानी बिराजदार, प्रवीण सूर्यगंध यांच्यासह विविध महिला आरोग्य समित्यांच्या सदस्या उपस्थित होत्या.



## उमाबाई श्राविका विद्यालयात पंडिता पद्मश्री सुमतीबाई शहा यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

येथील श्राविका संकुलातील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात संस्थापिका स्व.पंडिता पद्मश्री सुमतीबाई शहा यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापिका अश्विनी पंडित, उपमुख्याध्यापिका माधवी खोत, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, ज्येष्ठ शिक्षक सुकुमार वारे, प्रसन्न गाडे, अभिनंदन उपाध्ये, सोनल आळंद, कविता उपाध्ये यांच्या हस्ते पंडिता पद्मश्री सुमतीबाई शहा यांच्या प्रतिमेचे पूजन व कुसुमांजली अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. शिक्षक वैभव बारडकर यांनी पंडिता सुमतीबाई शहा यांच्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना आपल्या मनोगताद्वारे करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांनी मानले.

## खरीप पिकांसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू

**सोलापूर, दि. ९ जुलै-**

महाराष्ट्रातील २०२६ च्या खरीप हंगामासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत करण्यात येणार आहे. ही योजना सोलापूर, अकोला, धुळे, हिंगोली, जळगाव, पुणे आणि सातारा जिल्ह्यांतील कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी लागू असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे. या योजनेअंतर्गत दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, कीड, रोग तसेच इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पीक नुकसानीस विमा संरक्षण मिळणार आहे. शासनामार्फत पीक पाहणी करून नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांना भरपाई दिली जाणार आहे.शेतकऱ्यांनी संबंधित बँका,महा-ई-सेवा केंद्रे किंवा अधिकृत प्रतिनिधींकडे वेळेत नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा.

# संगमेश्वर नगरातील कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा

## पीडित महिलेची सुटका; आरोपी महिलेस अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

पोलीस आयुक्तालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने अक्कलकोट रस्त्यावरील संगमेश्वर नगर परिसरातील साक्षी रेसिडन्सी येथे बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या कुंटणखान्यावर आज बुधवारी दुपारी छापा टाकून एका महिलेला अटक केली. या कारवाईत एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली असून याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नंदिनी गोरख कांबळे (वय ५० रा. साक्षी रेसिडन्सी, संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड) असे अटक करण्यात आलेल्या त्या आरोपी महिलेचे नाव आहे. साक्षी रेसिडन्सीमधील एका फ्लॅटमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून प्रथम बोगस ग्राहक पाठवून माहितीची खातरजमा केली. त्यानंतर दुपारी संबंधित फ्लॅटवर छापा टाकण्यात आला.

अटक करण्यात आलेली आरोपी महिला ही एका महिलेला पैशाचे आमिष दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडल्याचे तसेच तिचे शारीरिक व आर्थिक शोषण करून त्या व्यवसायातून स्वतःची उपजीविका करत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या कुंटणखान्यांवर यापुढेही अशाच प्रकारे कठोर कारवाई सुरू ठेवण्यात येणार असून शहरातील अशा बेकायदेशीर धंद्यांना आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस निरीक्षक स्नेहा म्हेतर व त्यांच्या पथकाने पार पाडली आहे.



# आरटीओ कार्यालयात चालकांचे आंदोलन

## डॉ. ज्योती ठाकरे कथित वक्तव्याचा निषेध, कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहतूक संघटना संयुक्त महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांच्या नेतृत्वाखाली शेकडो चालकांनी जोरदार आंदोलन करत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील तसेच सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी मुलाणी यांना निवेदन सादर केले.

मराठी भाषा प्रमाणपत्रासंदर्भात आयोजित शिबिरामध्ये प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या डॉ. ज्योती ठाकरे यांनी धर्माच्या आधारावर भेदभाव करणारे वक्तव्य केल्याचा आरोप महासंघाने निवेदनातून केला आहे. याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच समाजात धार्मिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद म्हणाले, ''मराठी ही महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाची भाषा आहे. ती कोणत्याही एका धर्माची भाषा नाही. माझे शिक्षण मराठी माध्यमातून झाले असून माझ्याकडे महाराष्ट्र राज्य मंडळाचे प्रमाणपत्र आहे. तरीही केवळ मुस्लिम असल्यामुळे स्वतंत्र मराठी भाषा प्रमाणपत्र घेणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. हा प्रकार संविधानातील समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात असून आम्ही त्याचा तीव्र निषेध करतो.''

निवेदन देण्यापूर्वी आणि त्यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालय परिसरात शेकडो चालकांनी जोरदार घोषणाबाजी केली. ''धर्माच्या नावावर भेदभाव बंद करा'', ''मराठी सर्वांची भाषा आहे'', ''दोषींवर तात्काळ कारवाई करा'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

महासंघाच्या वतीने या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ पुरावा उपलब्ध असून आवश्यकतेनुसार तो प्रशासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सय्यद यांनी दिला. यावेळी वाहतूक संघटना संयुक्त महासंघ, महाराष्ट्र राज्यचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूरचा किल्ला इतिहासाचा नवा दृष्टिकोन मांडणारी दोन पुस्तके प्रकाशित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**

मराठा-इंग्रजांमधील अखेरची निर्णायक लढाई सोलापूरच्या किल्ल्यावर झाली. त्यामुळे 'मराठ्यांचे अखेरचे बलस्थान' म्हणून सोलापूरच्या किल्ल्याची ऐतिहासिक ओळख असल्याचा दावा ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. सत्यव्रत नुलकर यांनी पत्रकार परिषदेत केला.

पत्रकार परिषदेत त्यांनी 'शोध सोलापूरचा' आणि 'सोलापूरचा किल्ला : मराठ्यांचे अखेरचे बलस्थान' या आपल्या पुस्तकांची माहिती दिली. पीएच.डी. संशोधनाचा विषय 'सोलापूर जिल्ह्याचे पुरातत्त्व' हा होता. त्याच संशोधनावर आधारित 'शोध सोलापूरचा' हे पुस्तक तयार केले आहे. पुस्तकात शिलालेख, मंदिर वास्तुकला, मूर्तीकला, वीरगळ, सतीस्तंभ, विहिरी, तलाव आदी पुरातत्त्वीय पुराव्यांच्या आधारे सोलापूरच्या इतिहासाचा वेध घेतला आहे. केवळ पुरातत्त्वीय साधनांवर आधारित माहिती या पुस्तकात दिल्याचे सांगितले. मराठ्यांचे अखेरचे बलस्थान (सोलापूरचा भुईकोट किल्ला) या पुस्तकात मराठा-इंग्रज युद्धातील सोलापूर किल्ल्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. सोलापूरचा किल्ला ब्रिटिशांच्या ताब्यात गेल्यानंतर भारतातील सुमारे ८० टक्के भूभागावर त्यांचे नियंत्रण प्रस्थापित झाले. त्यानंतर महाराजा रणजीतसिंह यांच्या निधनानंतर शीख-इंग्रज युद्धे झाली आणि पुढे ब्रिटिशांचे संपूर्ण भारतावर वर्चस्व निर्माण झाले.ब्रिटिशांनी भारतावर २०० नव्हे तर प्रत्यक्षात सुमारे ९७ वर्षे स्थिर प्रशासन केले, असा इतिहासाकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोनही त्यांनी यावेळी मांडला. सोलापूरच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांसाठी ही दोन्ही पुस्तके उपयुक्त ठरतील, असा विश्वासही व्यक्त केला.

# लोकप्रतिनिधी, प्रशासन अन् नागरिकांनी उभारला स्वच्छतेचा आदर्श

## झाडू हाती, बदलाच्या वाटचालीतून स्वच्छतेचा निर्धार

पावसाळा सुरू झाला की शहरासमोर स्वच्छता आणि आरोग्य ही दुहेरी आव्हाने उभी राहतात. अशा काळात सोलापूर महानगरपालिकेने १ ते ९ जुलैदरम्यान हाती घेतलेली नऊ दिवसीय विशेष स्वच्छता मोहीम ही केवळ साफसफाईची मोहीम नसून, स्वच्छतेबाबत जनजागृती आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा प्रभावी उपक्रम ठरत आहे. महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ झाला आणि पहिल्याच दिवशी तब्बल १० टन कचरा व ११ ब्रास गाळ-माती हटविण्यात आली. ही आकडेवारीच प्रशासनाच्या कामाची गती आणि नियोजनाची परिणामकारकता अधोरेखित करते.

या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ आदेश देण्यापुरते नेतृत्व न राहता प्रत्यक्ष मैदानात उतरलेले लोकप्रतिनिधी आणि अधिकारी. महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्यासह नगरसेवक-नगरसेविकांनी स्वतः झाडू हाती घेत स्वच्छतेचा संदेश दिला. लोकप्रतिनिधींची ही कृती नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरली. नेतृत्व जेव्हा कृतीतून दिसते, तेव्हा समाजातील प्रत्येक घटक अधिक जबाबदारीने पुढे येतो. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाने या मोहिमेचे प्रभावी नियोजन केले आहे. सहाय्यक आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक अनिल चराटे, सफाई अधीक्षक सूर्यकांत लोखंडे, सफाई अधीक्षक (वाहन) वासुदेव नडीमेटला तसेच विविध झोनमधील आरोग्य निरीक्षक आणि शेकडो सफाई कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत मोठे योगदान दिले आहे. आठ झोनमध्ये २२२ कर्मचारी, चार जेसीबी, चार डंपर आणि ११ घंटागाड्यांच्या साहाय्याने ही मोहीम नियोजनबद्ध प्रशासनाचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल.

स्वच्छतेसोबतच जनजागृतीलाही महापालिकेने तितकेच महत्त्व दिले आहे. स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत शहरातील १५ ठिकाणी 'स्वच्छतेचा संदेश' हे लोकनाट्य सादर करून कचरा वर्गीकरण, घंटागाडीचा वापर, प्लास्टिकमुक्ती आणि Reduce, Reuse, Recycle (RRR) या संकल्पनेचा संदेश दिला जात आहे. आधुनिक युगात लोककलेच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा हा अभिनव प्रयोग निश्चितच कौतुकास्पद आहे. तुतारी, संबळ आणि दवंडीच्या गजरातून दिला जाणारा स्वच्छतेचा संदेश नागरिकांच्या मनावर सकारात्मक ठसा उमटवत आहे.

''कचरा उघड्यावर टाकू नका, घंटागाडीतच द्या आणि शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करा,'' हा संदेश प्रत्येक सोलापूरकराने मनापासून स्वीकारण्याची गरज आहे. कारण शहर कितीही स्वच्छ केले तरी नागरिकांनीच पुन्हा कचरा रस्त्यावर टाकला, तर सर्व मेहनत व्यर्थ ठरेल. घरातील ओला व सुका कचरा वेगळा करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे आणि प्लास्टिकचा वापर कमी करणे या छोट्या सवयी शहराच्या आरोग्यासाठी मोठे योगदान देऊ शकतात.

स्वच्छ सोलापूर ही केवळ महापालिकेची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक बांधिलकी आहे. प्रशासन प्रामाणिकपणे काम करत आहे; आता त्याला नागरिकांच्या सक्रिय सहभागाची जोड मिळणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक या चौघांनी




मिळून स्वच्छतेचा हा संकल्प कायम ठेवला, तर स्वच्छ सर्वेक्षणात सोलापूर निश्चितच उंच भरारी घेईल. शहर स्वच्छ राहिले तर आरोग्य सुधारेल, पर्यावरण टिकेल आणि भावी पिढ्यांसाठी अधिक चांगले सोलापूर निर्माण होईल.

स्वच्छतेसाठी झाडू हाती घेणारे लोकप्रतिनिधी, नियोजनबद्ध काम करणारे अधिकारी आणि साथ देणारे नागरिक हीच 'स्वच्छ, सुंदर आणि निरोगी सोलापूर'ची खरी ताकद आहे. या मोहिमेने प्रशासन आणि जनतेतील सहकार्याची नवी दिशा दाखवली असून, हा स्वच्छतेचा संकल्प पुढेही अशीच सातत्याने कायम राहणे हीच काळाची गरज आहे.



## महत्वाचे...

### शिवाजी बंडगर यांचे बालसाहित्य विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात




सांगोला, दि. ९ जुलै - सांगोला येथील ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक शिवाजी बंडगर यांच्या 'फुले फुलताना' या बालसाहित्य कृतीची सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या बी.ए.भाग तीनच्या मराठी अभ्यासक्रमासाठी निवड करण्यात आली आहे. मराठी अभ्यास मंडळाने तयार केलेला नवीन अभ्यासक्रम विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झाला आहे. विद्यापीठाने सदर बालसाहित्याची दखल घेतल्याबद्दल शिक्षण, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून शिवाजी बंडगर यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. साहित्यिक शिवाजी बंडगर यांनी कुलगुरू प्रकाश महानवर, प्रो-व्हिसी लक्ष्मीकांत दामा, मराठी भाषा अभ्यासक्रम मंडळाच्या अध्यक्षा प्रा.सुवर्णा गुंड-चव्हाण, अधिष्ठाता इ.जा. तांबोळी आणि अभ्यासक्रम मंडळातील सर्व सदस्यांचे आभार मानले आहेत.



### लायन्स क्लब बार्शी रॉयलचा पदग्रहण सोहळा उत्साहात

बार्शी, दि. ९ जुलै- लायन्स क्लब बार्शी रॉयलचा या वर्षाचा पदग्रहण सोहळा झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती आमदार राजेंद्र राऊत, माजी प्रांतपाल प्रभूदचंद्र झपके, झपके तसेच डॉ. किरण खोराटे व कल्याणी खोराटे, माजी प्रांतपाल व रॉयल क्लबचे मार्गदर्शक जितेंद्र दोशी, महेश नळे, रिजन चेअरमन अॅड. अमिता कारंडे उपस्थित होते. आमदार राजेंद्र राऊत यांनी नूतन अध्यक्ष मंगेश बागुल यांना शुभेच्छा देताना बागुल कृषी क्षेत्रातील तज्ञ असून आमदारांच्या शेतालाही त्यांचे मार्गदर्शन लाभल्याचे सांगितले. शपथ ग्रहण अधिकारी झपके यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. डॉक्टर किरण खोराटे यांनी नवीन सदस्यांना शपथ देऊन लायन्स क्लबच्या कार्याची माहिती दिली. नूतन अध्यक्ष मंगेश बागुल यांनी आगामी वर्षात समाजोपयोगी कार्य करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमात शेतकरी दिन, डॉक्टर दिन व सीए दिनानिमित्त डॉक्टर, शेतकरी व सीए आदींना सन्मानचिन्ह देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. जितेंद्र दोशी, महेश नळे, अमिता कारंडे, राहुल दोशी यांनी सर्व सदस्यांना व अध्यक्षांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन गणेश भंडारी व शितल भंडारी यांनी तर आभार दयानंद रेवडकर यांनी मानले.



### रावे कार्यक्रमांतर्गत सेंद्रिय शेतीवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

सोलापूर, दि. ९ जुलै - लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळाच्या कृषिदूतांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कळमण गावात सेंद्रिय शेती या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन केले. विषयतज्ज्ञ डॉ. व्ही. एस. गोरे यांनी शेतकरी व कृषी विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्व, शाश्वत शेती पद्धती आणि सेंद्रिय उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन तसेच प्रश्नांना उत्तरे दिली. व्याख्यानाला कळमण गावातील अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. उपक्रमासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, रावे कार्यक्रम समन्वयक अधिकारी डॉ. दावणे व्ही. टी. यांनी मार्गदर्शन केले. कळमण गावातील कृषिदूत सुयोग सरडे, सुचित साळुंखे, प्रणव पिसाळ, संकेत वानखेडे, सुरेश बगले, ऋषिकेश बिचुकले, विशाल धर्मशाळे यांनी उपक्रमाचे नियोजन केले.

### मंगळवेढा तालुक्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करा

**भाजप शहराध्यक्ष नागेश डोंगरे व सुदर्शन यादव यांचे पोलिसांना निवेदन**



मंगळवेढा दि. ९ जुलै - मंगळवेढा शहर आणि तालुक्यात अवैधरित्या सुरू असलेल्या मटका व जुगार व्यवसायाविरोधात भाजप पदाधिकाऱ्यांनी पोलिस ठाण्याचे दरवाजे ठोठवले आहेत. भाजप शहराध्यक्ष नागेश डोंगरे व सुदर्शन यादव यांनी मंगळवेढ्याचे पोलिस निरीक्षक यांना निवेदन देत अवैध धंद्यांवर तातडीने कारवाईची मागणी केली आहे. मात्र यामुळे प्रशासनाची कार्यपद्धती व सत्ताधारी पक्षाच्या स्थानिक नेतृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

निवेदनात शहरासह ग्रामीण भागात पानटपऱ्या, सार्वजनिक ठिकाणे आणि मोबाईलच्या माध्यमातून खुलेआम मटका व्यवसाय सुरू आहेत. अनेक हॉटेल, ढाबे आणि ग्रामीण भागात अनेक ठिकाणी जुगार अड्डे सुरू असल्याची बाब नमूद केली आहे. यापूर्वी अवैध धंद्यांची ठिकाणे प्रशासनाला कळवूनही ती माहिती गोपनीय राहिली नसल्याचा आरोप केला आहे. अशा कारवाईसाठी स्वतंत्र आणि विश्वासार्ह अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, पोलिस अधीक्षक, अप्पर पोलिस अधीक्षक आदींनाही पाठवल्या आहेत. राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता असताना, तसेच आमदार सत्ताधारी पक्षाचे प्रतिनिधी असताना, अवैध व्यवसायांविरोधात कारवाईसाठी भाजप पदाधिकाऱ्यांनाच निवेदन देण्याची वेळ का आली? अशी चर्चा होत आहे.

# बोगस बियाणे प्रकरणाची गंभीर दखल

## कृषी विभागाकडून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे

तभा वृत्तसेवा,
वैराग, दि. ९ जुलै - बार्शी तालुक्यातील सोयाबीन उत्पादकांसाठी एक अत्यंत महत्वाची बातमी समोर येत आहे. यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीनची उगवण न झाल्याने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या तक्रारींची गंभीर दखल प्रशासनाने घेतली आहे. तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने तक्रारींच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पाहणी व पंचनामे केले आहेत.

दौऱ्यांतर्गत समितीने प्रामुख्याने घोळवेवाडी, कारी आणि झाडी या गावांमधील तक्रारदार शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी दिल्या. पेरणी केलेल्या परंतु न उगवलेल्या सोयाबीन क्षेत्राची बारकाईने पाहणी केली. शेतकऱ्यांच्या बांधावर झालेल्या या प्रत्यक्ष पाहणी आणि पंचनामा मोहिमेदरम्यान कृषी क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञ आणि उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते. समितीचे अध्यक्ष, सदस्य, कृषी विज्ञान केंद्राचे अधिकारी शास्त्री, महाबीज कंपनीचे क्षेत्रीय मॅनेजिंग डायरेक्टर, सुधीर काशीद (मंडळ कृषी अधिकारी) व विलास मिस्कीन (कृषी अधिकारी, गुण नियंत्रण, बार्शी) यांचा समावेश होता. महाबीज कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आणि कृषी विज्ञानाचे तज्ज्ञ उपस्थित असल्याने बियाण्याच्या गुणवत्तेबाबत आणि उगवण न होण्याच्या तांत्रिक कारणांचा सखोल अभ्यास झाला. सर्व तक्रारदार शेतकऱ्यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने पंचनामे पूर्ण केले. प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे बार्शी तालुक्यातील पीडित सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आता योग्य तो न्याय आणि भरपाई मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.




**पुढील कारवाई शासकीय नियमानुसार**

सर्व तक्रारदार शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण झाले असून, पुढील सर्व कायदेशीर आणि प्रशासकीय कार्यवाही शासकीय नियमानुसार अत्यंत काटेकोरपणे करण्यात येत आहे, अशी माहिती कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

# यशस्वी पालखी सोहळ्यासाठी प्रशासन तयार

## गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांची माहिती

तभा वृत्तसेवा,
माळशिरस, दि. ९ जुलै - आषाढी वारीनिमित्त दिनांक १९ जुलै रोजी धर्मपुरी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे आगमन होणार आहे. माळशिरस तालुक्यातील पालखीचे स्वागत, मुक्काम आदींबाबत तालुका प्रशासन १०० टक्के तयार असल्याचे गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांनी सांगितले.

पालखी सोहळ्याच्या व्यवस्थेबाबत पांढरे पत्रकारांशी बोलत होते. माळशिरस पंचायत समिती अंतर्गत धर्मपुरी, कारंडे, मोरोची, मांडवे, सदाशिवनगर, पुरंदावडे, येळीव, पाणीवपाटी, खुडूस, विजोरी, पिसेवाडी, वेळापूर, ठाकूर बुवा उघडेवाडी, तोंडले या गावांमध्ये पालखीचे विसावे आहेत. वेळापूर येथे २१ जुलै रोजी मुक्काम आहे. तसेच



श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दि. २० जुलै रोजी आपल्या तालुक्यात आगमन होत आहे. अकलूज येथे मुक्काम आहे. ही पालखी यशवंतनगर, संग्राम नगर, माळीनगर, सवतगव्हाण, तांबवे, लवंग, बोरगाव, म ळखांबी बोंडले येथून दसुर मार्गे पंढरपूर तालुक्यात २२ जुलै रोजी मार्गस्थ होईल.

दोन्ही पालखीच्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी व सोयीसाठी वरील सर्व ग्राम पंचायतीत स्वच्छता करणे, गटर साफ करणे, पाणी शुद्धीकरण करणे, जंतुनाशक पावडर इत्यादी स्वच्छतेच्या सुविधा व पिण्याचे शुद्ध पाणी पुरवठा केला जाणार आहे. सध्या सर्व गावांमध्ये स्वच्छतेची कामे सुरू आहेत. चिखल होऊ नये म्हणून आवश्यक ठिकाणी मुरूम पसरणे व काटेरी झाडे झुडपे तोडणे, दिवाबत्तीची सोय करणे व वारकऱ्यांना मूलभूत सुविधा पुरविणे ही कामे केली जाणार आहेत

पालखीच्या स्वागतासाठी प्रत्येक ठिकाणी स्वागत कमानी व स्वागत मंडप यांची उभारणी करणार आहे. प्रत्येक ठिकाणी वारकरी सुविधा केंद्र, ए ओ सी सेंटर, आरोग्य तपासणी केंद्र, हिरकणी कक्ष, मसाज सेंटर इत्यादी सुविधा पुरवणार आहेत. मुक्कामाच्या ठिकाणी बोरगाव, सदाशिवनगर, वेळापूर येथे जर्मन हँगर मंडप उभारणार आहेत. वॉटरप्रूफ मंडप उभारणार आहेत. गावोगावी वारकऱ्यांसाठी आंघोळीची सोय स्नानगृहे तसेच शौचालय उभारणार आहेत. पाणीपुरवठ्यासाठी टँकरची सोय केली आहे. मुक्कामाच्या ठिकाणी विद्युत रोषणाई व प्रकाश व्यवस्था करणार आहे, असेही पांढरे यांनी सांगितले.

**पाच रिंगण सोहळे**

सदाशिवनगर पुरंदावडे येथे पालखीचे गोल रिंगण, खुडूस येथे रिंगण व ठाकूर बुवा येथे उभे रिंगण होणार आहे. श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे अकलूज येथे गोल रिंगण व माळीनगर येथे उभे रिंगण आहे.

# वैरागला महावितरणचा स्वतंत्र उपविभाग सुरु करा

**आमदार सोपल; बार्शी शहरात 'सी' विभाग सुरु करण्याची मागणी**

तभा वृत्तसेवा
बार्शी/ वैराग दि. ९ जुलै - बार्शी तालुक्यातील वैराग येथे महावितरणचा स्वतंत्र उपविभाग सुरु करावा. वाढत्या औद्योगिक विस्तारानुसार बार्शी शहरासाठी महावितरणचा स्वतंत्र सी विभाग सुरु करावा, अशी मागणी आमदार दिलीप सोपल यांनीकेली.

बुधवारी दि. ८ जुलै विधानसभेत बोलताना आमदार सोपल यांनी विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे या विषयाकडे लक्ष वेधले. आमदार सोपल म्हणाले की, वैराग येथे म हावितरणचा स्वतंत्र उपविभाग सुरु झाल्यास शासनाला दरवर्षी अंदाजे ४६ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होईल. बार्शी शहरात औद्योगिक विकास झपाट्याने होत असल्याम ळे बार्शी शहराचे विभाजन करुन महावितरणचा स्वतंत्र सी विभाग निर्माण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

आमदार सोपल म्हणाले की, १९८५ पासून आमदार म्हणून सभागृहाच्या कामकाजाचा मला अनुभव आहे. विधानसभेचे म जी अध्यक्ष मधुकरराव चौधरी यांनी अध्यक्षपदावर असताना सभागृहातून शासनाला दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी झाली होती. त्याचप्रमाणे आपणही बार्शी मतदारसंघाच्या विकासाशी संबंधित या महत्वाच्या म गण्यांबाबत शासनाला आवश्यक निर्देश द्यावेत. शासन त्या निर्दे शांची सकारात्मक अंमलबजावणी करेल, असा विश्वास आणि अपेक्षा असल्याचेही त्यांनी सभागृहात व्यक्त केले.

### इंगळे तंत्रनिकेतनची शिवानी भोसले ९२ टक्के गुणांसह उत्तीर्ण

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट दि. ९ जुलै - के.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी अंतिम वर्षाची विद्यार्थिनी शिवानी भोसले हिने ९२% गुणांसह उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा गौरव वाढवला असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे व देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी व्यक्त केले. शिवानी भोसले हिच्या यशाबद्दल मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी महेश इंगळे बोलत होते. मुलींनी शिक्षणात असे घवघवीत यश मिळवावे हाच आमचा उद्देश आहे. देवस्थान संचलित महाविद्यालयाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे हा आहे. शिवानीसारख्या विद्यार्थिनी या उद्देशाचे उत्तम उदाहरण आहेत. शिवानीच्या कष्टाला आणि जिद्दीला आमचे वंदन असून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तू अक्कलकोटचे नाव उज्ज्वल करशील स्वामींचा आशीर्वाद नेहमी तुझ्यासोबत आहेत अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

शिवानीच्या या यशाबद्दल देवस्थान व महाविद्यालय परिवाराकडून तिचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य नागनाथ जेऊरे, देवस्थानचे सचिव आत्म राम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, शिवानीचे पालक नंदकिशोर भोसले, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### पिलीव येथील निरा उजव्या कालव्यावरील इस्पीक ताबडतोब दुरुस्त करा



तभा वृत्तसेवा
पिलीव दि ९ जुलै - पिलीव येथील निरा उजव्या कालव्यावरील इस्पीक ताबडतोब दुरुस्त करण्याची म ागणी पिलीव गणाच्या सदस्या नम्रता पुकळे यांनी फलटण येथील निरा उजवा कालव्याचे कार्यकारी अभियंता मोरे यांच्याकडे केली आहे.

हा इस्पीक अनेक वर्षांपासून नादुरुस्त आहे. त्याम ध्ये झिजेवस्ती, कुसमोड, म ळोली, शेंडेचिंच या गावासाठी पिण्याचे, शेतीसाठी पाणी सोडतात. धरणात पाणी जास्त झाल्यानंतर या सर्व गावातील बंधारे, तळी या पाण्याने भरतात. उन्हाळ्यात या चार-पाच गावांना पाणी सोडता येते. यामुळे हा इस्पीक ताबडतोब दुरुस्त करण्याची मागणी पुकळे यांनी केली आहे. कार्यकारी अभियंता मोरे यांनी ताबडतोब सदर इस्पीकची पाहणी करुन दुरुस्तीचे आश्वासन दिले. यावेळी माळशिरस विभागाचे अभियंता काळे, शिवराज पुकळे, ठेकेदार खंडु माने यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# दुध भेसळ प्रकरणाने पिलीव परिसर हादरला

## अजुन किती मासे गळाला लागणार याची चर्चा

तभा वृत्तसेवा,
पिलीव दि. ९ जुलै- पिलीव येथील चार चिलींग प्लॅंटवर अन्न व औषध प्रशासनाने धाडी टाकुन भेसळीचा संशय व्यक्त केला आहे. न्यायालयाने यातील आरोपींना ९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. यामुळे सध्या पिलीव परिसरात खळबळ उडाली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसर हा दुध धंद्यासाठी अग्रगण्य म्हणून ओळखला जातो. कारण या भागातून निरा उजवा कॅनॉल गेल्यामुळे हा भाग बागायती परिसर आहे. या भागातील शेतकरी शेतीबरोबरच दुध व्यवसाय मोठ्या प्रमाणात करतात. सध्या या भागात खाजगी दुध संघ, चिलींग प्लॅंट तसेच डेअऱ्यांचे अक्षरक्ष: जाळे आहे. तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासनाचा कारभार हातात घेतल्यापासून अख्खा महाराष्ट्र हादरला आहे. सध्या दुध माफिया



रॅकेटने तर माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात हे लोण पोहचले आहे. या रॅकेटमध्ये पुणे जिल्ह्यातील मंचर येथील सुशांत हिंगे मुख्य सुत्रधार तर तेथीलच संदीप लोढा हा त्याचा सहायक आहे. अकलूज (ता. माळशिरस) येथील हेमंत टेके हा सोलापूर जिल्ह्यात तसेच माळशिरस तालुक्यात दुध पावडर व भेसळ करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य पुरवित असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्यासमवेत पिलीव येथील सोनु (चैतन्य) घोरपडे हाही यामध्ये असल्याचे छापेमारीत सिद्ध झाले.

पिलीव भागात अटक केलेले चारही आरोपी तालुक्यात कोणाला भेसळ करण्यासाठी आवश्यक असणारे मटेरीयल पुरवित होते, याचा उलगडा लवकरच होणार आहे. परिणामी माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात भेसळ करणारे किती दुध उत्पादक किंवा चिलींग प्लॅंट किंवा डेअरीवाले गळाला लागतील याचा उलगडा लवकरच होणार आहे. सध्या पिलीव परिसरात अनेक मासे अजुन गळाला लागतील अशी जोरदार चर्चा सुरु आहे.

# जिल्ह्यातील सर्व प्रलंबित कामांना मुख्यमंत्र्यांकडून हिरवा कंदील : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ९ जुलै- येथील होटगी रोड विमानतळ, आयटी पार्क, उजनी जलपर्यटन, बोरामणी विमानतळ, सोलापूरचे उड्डाणपूल, रे नगर आदी विषयांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर विस्ताराने चर्चा झाली. त्यांनी सर्वच प्रलंबित विषयांना हिरवा कंदील दाखविल्याने सोलापूरकरांसाठी जुलैचा पहिला आठवडा ऐतिहासिकच ठरल्याच्या भावना जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज (दि. ८) माध्यम ांशी बोलताना व्यक्त केल्या.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, सोलापूर शहरातील उड्डाणपुलाचा विषय २०१७ पासून प्रलंबित होता. ६५० कोटीचे बजेट असलेला हा पुल आता १ हजार कोटीचा झाला आहे. भूसंपादनाची प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. शासकीय जागांचाही विषय मुख्यमंत्र्यांनी मार्गी लावला आहे. लवकरच उड्डाणपुलाचा विषय मार्गी लागणार आहे.




उजनी जलपर्यटनाचा विषय मुख्यमंत्र्यांनी मनावर घेतला असून, त्यांनी पालकमंत्री गोरे आणि जलसंपदामंत्री विखे पाटील यांनी बसून हा विषय लवकर मार्गी लावावा, असे आदेशित केले आहे. इतकेच नाहीतर जल पर्यटनाचे काम कोणत्याही खात्याने केले तरी ते लवकर व्हावे, अशाही सुचना सीएम फडणवीस यांनी दिल्या आहेत. याच धर्तीवर सोलापूर विमानतळ, बोरामणी विमानतळ, आयटी पार्क आदी विषयांवरही विस्ताराने चर्चा करुन ते विषय कसे मार्गी लावायचे, याचे म ार्गदर्शन केल्याने मी एकेका विषयाची लवकरच उकल करुन जिल्ह्यातील नागरिकांचे प्रलंबित असलेले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी नमूद केले.

**रे नगर भागात गारमेंट कंपन्या**

रे नगर भागात लोकवस्ती वाढत नसल्याने या ठिकाणी विविध गारमेंट कंपन्या उभा करण्याच्या सुचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत.
- एस. कार्तिकेयन, जिल्हाधिकारी, सोलापूर.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मंगळवेढ्यात बेकायदा सावकारी करणाऱ्या तिघांच्या घरावर छापे



**मंगळवेढा, दि.९ जुलै -**
मंगळवेढ्यात येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयामार्फत अवैध सावकारीबाबत तिघांच्या घरांवर छापे टाकण्यात आले. कारवाईत सावकारीबाबत कागदपत्रे जप्त केली आहेत.

शहरातील डोरले गल्लीतील सुग्राबी दरवाजाकर यांनी केलेल्या तक्रारीनूसार सहाय्यक निबंधक विजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ७ जुलै रोजी ही कारवाई केली. सध्या जप्त केलेल्या सर्व कागदपत्रांची कायदेशीर चौकशी आणि पडताळणी सुरू आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर दोषींवर गून्हे दाखल करण्यात येणार आहेत. शहरात मोठ्या प्रमाणात महिला वर्गही सावकारीत गुंतला आहे. अवाच्या सव्वा टक्केवारी घेऊन गोरगरीबांना लुटत आहेत.

बेकायदेशीर व्याजाच्या विळख्यात अडकले असेल, तर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मंगळवेढा येथे कार्यालयात येऊन लेखी तक्रार दाखल करावी असे अवाहन सहायक निबंधक विजय वाघमारे यांनी केले आहे.



# सुखरुप वारीसाठी यंत्रणांकडून कारवायांचा धडाका

विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जुलै-**
आगामी आषाढी यात्रेच्या पार्श्वभुमीवर वारकरी व भाविकांना सुखावह अनुभव यावा, यसाठी सोलापूर जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. विविध विभागांकडून कारवायांचा धडाका लावला आहे. तसेच वारीतून पर्यावरण संवर्धनाचा वसा वारकऱ्यांमार्फत राज्यभर पोचवण्याचाही प्रयत्न होत आहे.



## पंढरपुरात साकारणार गोवा विठ्ठल-रुक्मिणी भवन

### गोव्याच्या मुख्यमंत्र्यांची घोषणा; गोमंतकीय वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी

### प्रवासासाठीही मिळणार आर्थिक मदत

**पंढरपूर,दि.९ जुलै -**
गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी पंढरपूरमध्ये गोमंतकीय वारकऱ्यांसाठी स्वतंत्र गोवा विठ्ठल-रुक्मिणी भवन उभारण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. गोमंतकीय वारकऱ्यांसाठी ही मोठी आनंदवार्ता आहे. सदर भवनासाठी जागाही निश्चित केल्याचे डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले आहे.

गोव्यातून दरवर्षी हजारो वारकरी आषाढी वारीसाठी पंढरपूरला येतात. मात्र, त्यांना कायमस्वरूपी मुक्कामी सुविधा उपलब्ध नव्हती. ही समस्या लक्षात घेत मागील वर्षी मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांनी गोवा भवन उभारण्याची घोषणा केली. याच घोषणेला मूर्त रूप देत यावर्षी गोवा भवनासाठी जमीन निश्चित केली आहे. यामुळे आता वारकऱ्यांना पंढरपूरमध्ये सुरक्षित, सुसज्ज आणि हक्काचे निवासस्थान उपलब्ध होणार आहे. पुढील वर्षीच्या आषाढी एकादशीपूर्वी हे भवन उभारण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांनी सांगितले.

गोव्यातील नोंदणीकृत वारकरी दिंड्यांना प्रवासासाठी आर्थिक सहाय्य देण्याचीही घोषणा केली आहे. यानुसार गोवा सरकारच्या कला आणि संस्कृती संचालनालयामार्फत मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते ३६ नोंदणीकृत वारकरी दिंड्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले. दिंडीतील वारकऱ्यांच्या संख्येनुसार १ लाख ते ५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत दिली जाणार आहे. ही रक्कम नोंदणीकृत दिंडींना थेटपणे वितरित केली जाईल. या योजनेअंतर्गत किमान ४0 वारकरी असलेल्या नोंदणीकृत दिंड्यांना परतीच्या बसप्रवासासाठी आर्थिक सहाय्य तसेच इतर आवश्यक सुविधा देणार आहेत. या उपक्रमाअंतर्गत सुमारे ३,५०० वारकऱ्यांची नोंदणी केली आहे. प्लास्टिकमुक्त वारीला प्रोत्साहनासाठी कापडी पिशव्या, पारंपरिक वारकरी वेशभूषा, औषधांचे संच (मेडिकल किट) तसेच वारीच्या मार्गावर निश्चित ठिकाणी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या या घोषणांमुळे गोमंतकीय वारकऱ्यांची अनेक वर्षांपासूनच्या मागण्या पूर्ण होणार आहेत.

## पंढरपुरात अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

### ६८ आस्थापनांची तपासणी; १०५ नमुने घेतले



**सोलापूर, दि.९ जुलै -**
आषाढी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर शहरात येणाऱ्या लाखो भाविकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने आज दि. ९ जुलै रोजी शहरात धडक तपासणी मोहीम राबविली.

मोहिमेत अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पंढरपूर शहरातील हॉटेल्स, मिठाई दुकाने, फरसाण केंद्रे, खानावळी, प्रसाद विक्रेते अशा ६८ आस्थापनांची अचानक तपासणी केली. तपासणीदरम्यान विविध खाद्यपदार्थांचे १०५ नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपुरात देशभरातून लाखो वारकरी दाखल होत असतात. या काळात भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचे किंवा उघड्यावरील अन्नपदार्थांमुळे भाविकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे. अन्नपदार्थ साठवणूक, स्वच्छता, वापरले जाणारे तेल, रंग व इतर घटकांची गुणवत्ता याबाबत काटेकोर तपासणी करण्यात आली.

नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निकृष्ट दर्जाचे किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ आढळल्यास संबंधित आस्थापनांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. तसेच सर्व व्यावसायिकांनी स्वच्छता, गुणवत्ता व नियमांचे पालन करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त साहेबराव देसाई यांनी केले आहे. वारी कालावधीत अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत तक्रार असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा, असेही प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.



## अनधिकृत, नियमबाह्य रिक्षांवर कारवाई

### पंढरपुरात पोलिस व परिवहन विभागाची संयुक्त कारवाई; ४ लाख 10 हजार ७00 रुपयांचा दंड वसूल

**पंढरपूर,दि.९ जुलै -**
शहरातील अनधिकृत व नियमबाह्य पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या रिक्षांना आवर घालण्यासाठी ६१ रिक्षांवर कारवाई करुन चार लाख १० हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पोलिस व परिवहन विभागाची संयुक्त तपासणी मोहिमेत कारवाई ११५ रिक्षांची तपासणी केली. यामध्ये ६१ रिक्षावर कारवाई करण्यात आली असून यापैकी ११ रिक्षा जप्त केल्या आहेत.

पंढरपूरात येणाऱ्या भाविकांच्या वाहतूक व्यवस्था सुरक्षित, सुलभ आणि सुविहित ठेवण्यासाठी तसेच क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक व निश्चित केलेल्या दरांपेक्षा भाविकांकडून जास्त भाडे आकारणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाईसाठी परिवहन विभागाकडून पथके नेमली आहेत. पंढरपूर शहर व परिसरात धावणाऱ्या रिक्षांवर संयुक्त तपासणी मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती मोटार वाहन निरीक्षक संतोष झगडे यांनी दिली.

वैध चालक परवाना व परमिट नसताना प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार आहे. रिक्षा चालकांनी वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र, विमा आणि चालक परवाना सोबत बाळगणे बंधनकारक आहे. निश्चित केलेले भाडेपत्रक प्रवाशांना स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावावे असे आवाहन मोटार वाहन निरीक्षक झगडे यांनी केले आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी नेरपगार, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, सहाय्यक प्रादेशिक परिवहन मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली परिवहन अधिकारी स्वप्निल गिरी, मोटार वाहन निरीक्षक राजन सरदेसाई, श्रेयस सरागे, नितीन गायकवाड,सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विक्रांत होनमोरे, प्रतीक्षा नारायणकर, भाग्यश्री रोडगे, कोमल डांगे, हनुमंत गेळे, सागर नलावडे तसेच पंढरपूर शहर पोलीस कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आली.

## आसनक्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतुक नको

### प्रांताधिकारी सचिन इथापे यांचे आदेश

### सूर्योदयापूर्वी व सुर्योस्तानंतर जलवाहतुक बंद ठेवा

**पंढरपूर,दि. ९ जुलै -**
आषाढी यात्रा कालावधीत कोणतीही अनुचित घडना घडू नये तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी होडी चालक, मालकांनी आसनक्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतुक करु नये यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आदेश पारीत केला आहे.

होडी चालक, मालकांनी वारी कालावधीपुर्वीच होडींची दुरुस्ती करुन घ्यावी. वेळोवेळी देखभाल करावी. योग्य आसन क्षमता प्रवासी व चालक, मालकसहित निश्चित करावी. जलप्रवासी वाहतुकीचे वेळापत्रक निश्चित करावे, सूर्योदयापूर्वी व सुर्यास्तानंतर होडीतून प्रवासी वाहतुक करू नये. जलवाहतुकी दरम्यान सुरक्षेच्या साधनांचा प्रवाशी व चालकांनी अनिवार्यपणे वापर करावा. तसेच नियमित करून दिलेल्या वेळेत जलवाहतूक करावी, असे आदेशात म्हटले आहे.

**यात्रेच्या कालावधीत भाविक नौका विहार करतात**

आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी १८ ते २० लाख भाविक पंढरपूरात येतात. भाविकांची सुरक्षा महत्वाची आहे. त्या दृष्टींने होडीचालकांनी गांभीर्याने सुचनांचे पालन करावे. आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधितावर कायदेशीर कारवाईचा इशाराही प्रांताधिकारी इथापे यांनी दिला आहे.

## दहा लाख वारकऱ्यांना देणार सीडबॉल

**सोलापूर, दि.९ जुलै**
पंढरपूर आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या १० लाख वारकऱ्यांना सीडबॉलचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली. उपक्रमासाठी माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सीडबॉल तयार केले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याबरोबरच वारकऱ्यांच्या माध्यमातून वृक्षारोपणाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे.

आषाढी एकादशीच्या आधी एक दिवस संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्यासह मानाचा पालख्या वाखरी येथे दाखल होतात. याठिकाणी वारकऱ्यांची मोठी संख्या असते. वाखरी येथे पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते सीडबॉलचे वितरण करण्यात येणार आहे. वारकरी आपल्या गावात परतल्यानंतर हे सीडबॉल मोकळ्या जागेत फेकणार असून, पावसाच्या पाण्यामुळे त्यातून झाडांची नैसर्गिक वाढ होण्यास मदत होणार आहे. सीडबॉल वाटप व इतर तयारीबाबत मुख्याध्यापकांची आढावा बैठक घेण्यात येणार आहे. यामध्ये आणखी काही सीडबॉल वाटपासह इतर नियोजनावर चर्चा होणार आहे. शिक्षण विभागाच्या या उपक्रमामुळे 'वारीसोबत पर्यावरण संवर्धन' हा संदेश राज्यभर पोहोचणार आहे. विद्यार्थी आणि वारकरी यांच्या सहभागातून हरित महाराष्ट्राच्या संकल्पनेला बळ मिळणार आहे.

सांगोला, माळशिरस, पंढरपूर येथील ४०० शाळांचे मुख्याध्यापक व विद्यार्थ्यांनी मे व जून महिन्यात सीडबॉल तयार केले आहेत. यामध्ये ५० हून अधिक झाडांच्या प्रजातीच्या बिया आहेत. तीन तालुक्यातील उपक्रमशील शिक्षक व सामाजिक संस्थांची मदत घेत सीडबॉल वाटप करण्यात येणार आहेत. राज्यभरातील वारकऱ्यांकडून गावी परतल्यावर हे सीडबॉल शेतात, मोकळ्या जागेत लावण्याची विनंती करण्यात येणार आहे.
**सचिन जगताप,**
माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर जिल्हा परिषद.




## महाआरोग्य शिबिरासाठी सदाशिव पडदुणे नोडल अधिकारी

**सोलापूर, दि. ९ जुलै-**
आषाढी वारीच्या अनुषंगाने आरोग्य विभागामार्फत पंढरपूर येथील तीन रस्ता या ठिकाणी आयोजित महाआरोग्य शिबिराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी नोडल अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. १, सोलापूर येथील सदाशिव पडदुणे यांची नियुक्ती केली आहे.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३० नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी ही निवड केली आहे. पडदुणे यांचा मोबाईल क्र. ९८९०६१३९०७ असा आहे.

आषाढी वारी काळात पंढरपुरात आरोग्य विभागामार्फत तीन रस्ता परिसरात महाआरोग्य शिबिर होत आहे. शिबिरातील कामकाज व समन्वयाची संपूर्ण जबाबदारी सदाशिव पडदुणे यांच्यावर असेल. वारी काळात भाविकांना तातडीची आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी महाआरोग्य शिबिर महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.






## बार्शी तालुका पोलिसांकडून रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ९ जुलै -**
पोलिस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी व अप्पर पोलिस अधीक्षक, सोलापूर ग्रामीणचे विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी तालुका पोलिस स्टेशनचा प्रभारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर सपोनि अक्षय सोनवणे यांनी गुन्हेगारांविरुद्ध धडाकेबाज प्रतिबंधक कारवाईची मालिका सुरु केली आहे.

आगामी आषाढीवारी तसेच विविध सण-उत्सव शांततापूर्ण, सुरक्षित व निर्विघ्न वातावरणात पार पडावेत, तसेच रेकॉर्डवरील, टू प्लस व सराईत गुन्हेगारांमध्ये सुधारणा होऊन त्यांनी कायद्याचे पालन करावे आणि पुन्हा गुन्हेगारीकडे वळू नये, या उद्देशाने कठोर प्रतिबंधक कारवाईचा धडाका सुरु करण्यात आला असून, त्याच मोहिमेअंतर्गत आज एकूण ५३ आरोपींविरुद्ध प्रतिबंधक कारवाई करण्यात आली.

ही कारवाई बार्शी तालुका पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि अक्षय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, पोलिस उपनिरीक्षक आबासाहेब शिरगिरे, ग्रेड पोलिस उपनिरीक्षक राजकुमार यावलकर, बीट अंमलदार सदाशिव गवळी, सोमनाथ खांडेकर, अरुण डुकळे, प्रदीप चौधरी, गणेश दळवी तसेच बार्शी तालुका पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.